
शनिवार । १५ ऑक्टोबर १९७७ । ७५ पैसे

# माणूस



## आणीबाणी कडून आणीबाणी कडे





## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक विसावा

१५ ऑक्टोबर १९७७

मूल्य ७५ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


# जमावशाहीचा धोका

## श्री. ग. मा.

'माणूस 'ने रायबरेली विशेषांक काढला तेव्हा काहीजणानी टीका केली, की इंदिरा गांधींच्या पुनरागमनाला इतके महत्त्व 'माणूस' विनाकारण देत आहे बाई राजकीयदृष्ट्या संपलेल्या आहेत ! उगाच धोक्याचा लाल कंदील दाखवून त्याना महत्त्व देण्याचा खटाटोप 'माणूस 'ने करावयास नको होता. पंधरवड्यापूर्वीच पुण्याला झालेल्या सभेत राजनारायण यानी आवाज फाडफाडून सांगितले, की बाई आता पुन्हा निवडून येणे अशक्य आहे. वास्तविक रायबरेलीत ७१ सालीच त्यांचा पराभव झालेला होता, पण त्या वेळी निवडणुकीत त्यानी केलेला भ्रष्टाचार उघडकीस येऊ शकला नाही, सिद्ध होऊ शकला नाही म्हणूनच त्या वाचू शकल्या; पण आता मतदार त्यांना पुन्हा बोलविण्याची शक्यता शून्याहूनही कमी आहे. राजनारायण यांचा आत्मविश्वास 'विदूषकी' म्हणून दुर्लक्ष करण्यासारखा आहे असे काहीजण म्हणू शकतील; पण अनेक मुरब्बी राजकारणी, नाणावलेले पत्रपंडितही बाईंचा अस्त गृहीत धरूनच बोलत–लिहीत होते–अगदी काल–परवापर्यंत, हे तर कुणी नाकारू शकत नाही. बाईंना वगळून कॉंग्रेस पुन्हा लोकशाही मार्गावर आणण्याची खटपटही चव्हाण–रेड्डींनी सुरू केली होती. जयप्रकाशानाही अशी इंदिरामुक्त कॉंग्रेस हवी होती. कर्नाटक हाउसमधील मेजवानीचा बेत वाया गेला, डिनर डिप्लोमसीत बाईंच्या गळाला फारसे मासे लागले नाहीत, तेव्हाही बाईंच्या सामर्थ्याविषयी चुकीचे अंदाज बांधण्याची चढाओढ पुन्हा सुरू झाली त्यांची खरीखोटी निंदानालस्ती करणारी, त्यांच्या भ्रष्टाचाराचे पाढे वाचणारी आणखी २/४ पुस्तके बाजारात येऊन, खपून, लेखक–प्रकाशकाचे खिसे गरम करून गेली. बाईंच्या पवनार–बेलछी दौऱ्याने या भयकर आत्मविश्वासाला थोडे तडे गेले कृष्ण मेनन सोसायटीतर्फे कमानी सभागृहात बाईंनी पराभवानंतरचे दिल्लीतील आपले पहिले जाहीर भाषण केले. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रानी या भाषणाला मुबलक प्रसिद्धी दिलेली पाहून ही आत्मविश्वस्त मंडळी थोडी हादरली. नंतर बाईंचे हरद्वार–कानपूर झाले. श्रीनगरला बाईंनी आणखी चढा सूर लावला. गुजरायला कदाचित त्या अशा चढ्या पण तोल सुटलेल्या स्थितीत गेल्या असत्या; पण अटकेचा गोंधळ दरम्यान झाला आणि कॉंग्रेससंघटनेच्या किल्ल्याच कमरेला अडकवून ही गुजरायची सून मोरारजींचा बालेकिल्ला सहज एकदा न्याहाळून आली. चव्हाण–रेड्डींचे मनोरथ कोसळले आणि जनता–नेत्यांचीही झोप आता थोडी फार उडाली असावी. अलाहाबादच्या तिन्हा न्यायमूर्तींनी निकालाच्या एका फटकाऱ्यानिशी बाईंचे आसन डळमळीत केले होते. दिल्लीच्या दयाळ न्यायमूर्तींनी असाच निकालाचा एक उलट फटकारा मारून बाईंचे कोसळलेले आसन पुन्हा

सावरून ठेवलेले आहे रेड्डी तर १२ विलिंग्डन क्रेसेंटकडे त्या दिवशीच धावते झाले. मिठाई, लाडू, पेढे वाटण्याचा आनंद त्यांनी सर्वांबरोबर लुटला. चव्हाण दुसऱ्या दिवशी गेले. इकडे सुब्रह्मण्यम यानी मद्रास-मध्ये घाईघाईने वार्ताहरांना बोलावून आपण शहा कमिशनसमोर बाईंच्या विरोधी साक्ष दिली असली तरी अजूनही बाईंशी कसे एक-निष्ठच आहोत याचा खुलासा करून टाकला. महाराष्ट्रातली पळापळ तर विचारूच नका. इंदिरा गांधींची काँग्रेसमधून हकाल-पट्टी झाली पाहिजे यासाठी दिल्लीत गट स्थापन करून पत्रके काढणारे आमचे विठ्ठलराव गाडगीळ एकदम पळीपंचपात्री सरसावून दिल्लीदाखल झालेसुद्धा. मुंबईत काँग्रेसशिबिरात बाईंविरुद्ध जहरी आगपाखड करणाऱ्या शरद पवारांचे अद्याप काही कळले नाही, पण दिल्लीत साहेबांचे जे धोरण ते मुंबईत पवारांचे राहील असे- समजून चालायला हरकत नाही. शिवाय बाईंच्या पराक्रमाने दिपलेले यशवंत-राव मोहिते मौजूद आहेतच. वसंतरावदादा तर विमानतळावर जाऊ-नच आपली निष्ठा अर्पण करून आले आहेत. शिवाय पत्नीच्या मार्फत जनता पक्षाशीही ते संधान बांधून आहेत. इकडे बाईंना खूष ठेवून यशवंतराव-पवार गटाला उखडून टाकण्याचे मनसुबेही पक्के करीत आहेत. आणखी एखादा रायबरेली अंक काढण्याची पाळी 'माणूस'वर न येवो म्हणजे मिळविली. पहिला अंक काढला तेव्हा धोका अस्पष्ट होता. आता तो आंधळ्यालाही दिसावा, समजावा इतका स्पष्ट झालेला आहे. सत्ता नाही तरी सत्तेची पहिली पायरी ठरू शकणारी काँग्रेस संघटनेवरील पकड बाईंच्या मुठीत आलेली आहे. काँग्रेस संघटनेत आता बाईंना आव्हान देऊ शकणारा नेता किंवा गट उरलेला नाही. कोणी डोके वर काढलेच तर आता ते उडवलेच जाण्याची शक्यता अधिक आहे.

### मुख्य जबाबदारी

या परिस्थितीची मुख्य जबाबदारी अर्थात जनता पक्षाकडेच जाते. सहा महिने सत्तेवर येऊन झाले; पण धडाडीची एकही कृती या पक्षाने करून दाखविलेली नाही. अनिश्चितता आणि गोंधळ, सत्ता-स्पर्धा आणि माऱ्यामाऱ्या यातून सहा महिने उलटले तरी हा पक्ष अद्याप जराही बाहेर पडलेला दिसत नाही. लोकशाहीची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर आणली, वृत्तपत्रांना स्वातंत्र्य परत मिळवून दिली या कामगिरीची तबकडी वाजवून वाजवून आणि ऐकून ऐकून आता गुळगुळीत झालेली आहे, हे या मंडळींच्या अजून ध्यानात कसे येत नाही? जनता लाट भाकरी आणि स्वातंत्र्य या दोन्हींसाठी होती. भाकरी की स्वातंत्र्य असा पर्याय ठेवला गेला तर बहुसंख्य समाज भाकरीचीच निवड प्रथम करतो, हे आजवर अनेक वेळा, अनेक ठिकाणी सिद्ध झालेले सत्य आहे. या भाकरीच्या आघाडी वर गेल्या सहा महिन्यात जनता पक्षाला कुठलाही पराक्रम करून दाखविता आलेला नाही आणि अशा पराक्रमाशिवाय कोण यांच्या हातात सत्ता राहू देणार आहे? या आघाडीवर कुठलाही तडाखेबंद कार्यक्रम गेल्या सहा महिन्यात नुसता जाहीरही झालेला नाही. आणीबाणीनतर दोन आठवडे उलटायच्या आतच वीस कलमी कार्यक्रम इंदिरा गांधींनी जाहीर करून टाकला होता. 'बैसवी प्रचितीचे तडाखे' हा त्यांचा खाक्या होता. दोन आठवडे सोडून द्या. जनता पक्ष नेतृत्वात म्हाताऱ्यांचा भरणा जास्त असल्याने व लोकशाही निर्णयप्रक्रिया जारी असल्याने दोन – चार महिन्यांच्या काला-वधीत तरी या आघाडीवर काही जोरदार कृती अपेक्षित होती; पण कुणी ब्रह्मचर्य आणि संयमाची पुराणे-प्रवचने झोडीत आहेत तर कुणी दारूबंदीसाठी हटून बसले आहेत. आग रामेश्वरी आणि यांचे बंब सोमेश्वरी अशी आर्थिक आघाडीवरील जनता पक्षाची सहा महिने उलटून गेल्यावरही स्थिती आहे बाई याचा फायदा का घेणार नाहीत? त्यांनी का घेऊ नये? आदर्शांची नुसती घोकपट्टी करून जनतेला आकृष्ट करून घेता येत नाही. कृती हवी आणि तीही तेजस्वी, डोळ्यात भरणारी, उठावदार आणि जहाल! लोकाना दैनंदिन जीवनात या कृतीचे परिणाम जाणवले पाहिजेत. अनुभव बदलला पाहिजे. स्थित्यंतराची काही खूण पटवाल की नाही?

अशी उठावदार व धडाडीची कृती जनता–शासन करू शकले नाही याचे कारण वैचारिकदृष्ट्या हा पक्ष अद्याप एकसंध झालेला नाही, हे आहे. गांधीवादी समाजवाद वगैरे बोलले खूप जात असले तरी सूत्ररूपाने, व्यवहारात आणता येईल असा या विचारांचा कुठलाही सगुण आकार जनता शासनामध्ये नाही. त्यामुळे विकेंद्री-करणाची भाषा जोरदार सुरू आहे; पण परदेशाच्या मदतीवर डोळे मात्र लागलेलेच आहेत. आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रवाहांच्या लाटामध्ये हा देश भरकटत ठेवून विकेंद्रीकरण घडू शकते, घडवता येते असे मानणारे एक तर स्वतःची व इतराची फसवणूक तरी करून घेत आहेत किंवा मूर्खांच्या नंदनवनात तरी वावरू पाहत आहेत. हे आंतरराष्ट्रीय प्रवाह, मदतीने–कर्जाने नियंत्रित केलेले असतील तर विकेंद्रीकरण–स्वयंपूर्णता वगैरे शब्दसुद्धा उच्चारता कामा नयेत. मुंबईच्या गाडीत बसायचे आणि सातारा–सांगली ही स्टेशने का येत नाहीत म्हणून गोंधळून जायचे, तसला हा परकीय मदत आणि विकेंद्रीकरण–स्वयंपूर्णता हा परस्परविरोधी दिशांचा प्रवास आहे. म्हणून जॉर्ज फर्नांडिस भावनेच्या भरात आंतरराष्ट्रीय कंपन्यांविरुद्ध काही तरी बोलून जातात आणि प्रत्यक्ष कृतीची वेळ आली, या कंपन्यांची देशभर पसरलेली जाळी ध्यानात आणून दिली गेली, की त्यांना आपले शब्द मागे घ्यावे लागतात, धोरणे बदलावी लागतात, निदान मुरड तरी घालावीच लागते. चरणसिंगांना विकेंद्रीकरण हवे. म्हणजे शहरात केंद्रीभूत झालेले उद्योगधंदे मोडायला, तोडायला हवेत हे ते सांगू लागले की, सगळे गिल्ला करणार, 'घड्याळाचे काटे मागे फिरवू नका! देश पुन्हा शंभर वर्षे मागे नेऊ नका!' यातून घडते ते असे, की देश कुठेच जात नाही, मागेही नाही. पुढेही नाही. परस्परविरोधी दिशांनी ओढाताण सुरू आहे. यामुळेच ठाम निर्णय होत नाहीत, घेता येत नाहीत. निर्णय ठाम असले तर कुणाला तरी दुखवावे लागतेच. एखादा हितसंबंधी गट तरी नाराज होतोच. कुणीही धोरणात्मक धडाडी दाखवायलाच त्यामुळे पुढे सरसावत नाही. दिशाहीनतेच्या आरोपाला त्यामुळे वाव राहतो आणि जुनीच पठडी चालू राहिल्याने नोकरशहा डोके वर काढू लागतात. जनता-शासन आल्यापासून अनेक खात्यांत नोकरशहा प्रबळ झालेले आहेत अशी वदंता आहे. ही खरी असेल तर तिचे मूळ कारण लोकप्रतिनिधींचा नाकर्तेपणा, मंत्र्यांची धोरणात्मक अनिश्चिती आणि एकसंध वैचारिक बैठकीचा अभाव हे आहे. मंत्र्यांनी एकतर पुढे जायला हवे नाही तर

नोकरशाहीच्या हातातले बाहुले बनून राहण्याची पाळी त्यांच्यावर आल्याशिवाय राहत नाही. अशी बाहुली दिल्लीत बरीच आहेत, त्यांची संख्या वाढतेही आहे अशी बोलवा आहे जनता-नेत्यांनी या स्थितीचा गभीरपणे विचार करायला हवा.

## विस्कळितपणा ते सावळागोंधळ

विचारात एकवाक्यता नसल्याने कारभारातही विस्कळितपणा ओघानेच येतो. मंत्र्याची तोंडे परस्परविरोधी दिशाना असल्यावर तर या विस्कळितपणातही चढाओढीचे राजकारणच घुसते आणि एकूण शासनयंत्रणेची पकडच ढासळत जाते गेल्या सहा महिन्यात अनेक प्रसग असे घडले की, ज्यात उत्तम प्रशासनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या मोरारजींच्या शासनालाही कारभारयंत्रणेतील ढिलाईमुळे, घोटाळ्यामुळे मानहानी पत्करावी लागली, सहकारी मंत्र्याच्या चुकांवर, त्यांच्या खात्यातील गोंधळावर नाइलाजाने पांघरूण घालावे लागले. मग असे प्रसंग बिहारसारख्या दूरच्या कर्पूरी राज्यात घडोत की अगदी दिल्लीच्या केंद्रशासित प्रदेशात घडोत. कारभारयंत्रणेची अब्रू वेशीवर टांगली जायची ती जातेच. शिवाय आता वृत्तपत्रे मोकळेपणाने काहीही छापू शकतात निम्मीअधिक वृत्तपत्रे-निदान मोठ्या गटा-तली तरी-आताच इंदिरा गांधींनी आपलीशी करून घेतलेली आहेत अब्रूचे धिंडवडे काढायला ती थोडीच कमी करणार आहेत? दिल्लीत विद्यार्थ्यांचा संप झाला. शंभर-दोनशे बसेस विद्यार्थ्यांनी पळवून (Hijack) नेल्या. दोन दिवस सगळी वाहतूक विस्कळित झाली. वृत्तपत्रानी ओघानेच जनताशासनाला धारेवर धरले. राज्य-कर्त्यांना परिस्थिती आटोक्यात आणायला इतका वेळ लागल्यावर वृत्तपत्राकडून दुसरे काय अपेक्षित आहे? मंत्रिमंडळातील एक ज्येष्ठ आणि अनुभवी मंत्री म्हणाल्याचे प्रसिद्ध झाले होते की, शासनयंत्रणा इतकी ढासळलेली मी कधीच पाहिलेली नव्हती. नेहरूंच्या वेळेपासून मी मंत्रिमंडळात आहे...वगैरे.

इंदिरा गांधींच्या अटकप्रकरणी जो सावळागोंधळ घातला गेला तो या सर्व ढासळत चाललेल्या कारभार-परिस्थितीचा परिपाक होता. अटकेसारखी एवढी क्षुल्लक बाब चरणसिंगांसारख्या मुरब्बी मंत्र्याला हाताळता येऊ नये या घटनेचा एरवी उलगडाच होऊ शकत नाही. न्यायाधीश गांगरले, सी. बी. आय. चे अधिकारी म्हणे दबलेल्या मन स्थितीत होते ही स्पष्टीकरणे तर बालिश आहेत. माहीत नव्हते आपण एका आगीशी खेळत आहोत हे?-लहान मुलाने खेळता खेळता विस्तवात हात घालावा आणि तो पोळून निघावा तसा सगळा पोरखेळ या प्रकरणी गृहमंत्रालयाने करून दाखवला आहे. बाईंना साधी अटक करायला यांना तीन तास कशासाठी लागले? अगोदर पूर्वसूचना द्यायची काय गरज होती? निवास-स्थानाभोवती पोलिस गराडा घालून वातावरण तापविण्याची व्यवस्था कशासाठी केली गेली? मुळात कागदोपत्री पुरावा तयार झाला नसताना ही अटक घाईघाईने करण्याचे कारणच काय होते? एवीतेवी सहा महिने थांबलाच होतात. आणखी महिना-दोन महिने उलटले असते तर बाई काही कुठे पळून चालल्या नव्हत्या. सहा महिने गृहमंत्रालय म्हणे जाळे विणत होते. मोठमोठे मासे म्हणे या जाळ्यात आता सापडणार आहेत. शेवटी मोठे मासे तर सोडाच, साधी माशीही अडकली नाही! आणि सहा महिने डोंगर पोखरून शेवटी आरोप तरी काय हुडकून काढले? जिप्स वापरल्या आणि परदेशी कंपनीला गैरवाजवी कंत्राट दिले-जे आरोप निःसंदिग्ध आणि निर्णायकरीत्या सिद्ध करणे नेहमीच कठीण जाते असा सर्वांचाच अनुभव आहे. बिनपुराव्याचे आरोपपत्र पुढे केले. कागदपत्रेही नीट तयार केली नाही. आपण फार सुसंस्कृत आणि आदर्श पद्धतीने लोकशाही राजवट चालवणारे आहोत ही शेखी मिरविता यावी म्हणून जर हा सगळा औदार्याचा तमाशा मांडला गेला असेल तर पृथ्वीराजाच्या या परंपरेचा शेवट कशात होतो याचीही आठवण ठेवलेली बरी. बाईंनी, मिळालेले प्रत्येक मिनिट उपयोगात आणले. मुलाकरवी जमेल तितका फौजफाटाही जमा केला आणि १२ विलिंग्डन क्रेसेंटला, नाटघाला साजेसे एखादे छावणीचे स्वरूप प्राप्त करून दिले. दुसऱ्या दिवशीचा कोर्टातला फजितवाडा तर लाज आणणारा आहे. गृहमंत्रालयाचा कायदेमंत्रालयाशी मेळ नाही. या दोन्ही मंत्रालयाचा पंतप्रधानाशी विचारविनिमय नाही. एवढा महत्त्वाचा विषय, पण मंत्रिमंडळात यावर चर्चा तरी झाली होती की नाही, याची शंकाच आहे. एक केंद्रीय मंत्री त्या दिवशी महाराष्ट्रात होते. त्यांना असे काही घडणार याचा पत्ताच नव्हता. 'घाई झाली' असे मत त्यांनी खाजगीत व्यक्त केले. तिकडे न्यूयॉर्कमध्ये अटलबिहारी वाजपेयी म्हणतात, 'खास न्यायालयानेच इंदिरा गांधींची चौकशी करायला हवी' असे त्याचे वैयक्तिक मत आहे. मग मंत्रिमंडळाच्या बैठकीत या मतमतांतराची काही चर्चा अगोदर झाली होती की नाही? का गृहमंत्री अशी चर्चा म्हणजे हस्तक्षेप मानीत होते? असे असेल, तर मंत्रिमंडळात सामुदायिक जबाबदारीची भावना केव्हा व कशी निर्माण होणार? सुटकेच्या या एका घटनेने

पृष्ठ ३० वर

## वर्गणीदारांस सूचना

१: अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२: वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३: तीन वर्षांची वर्गणी १००/- रुपये आहे.

४: रु. ३००/- ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

# रायबरेली अंक

संपादक ' माणूस ' यास–

□ आपल्या रायबरेली विशेपाकात इदिरा गांधीचे व्यक्ती आणि नेत्या म्हणून रेखाटन–मूल्यमापन करण्याचा अनेकानी प्रयत्न केला आहे. निवडणुका सपल्यानतर ज्या अनेक दंतकथा प्रसृत झाल्या त्या दंतकथा . आणि इदिरा गाधीबद्दलचे ठोस समज–गैरसमज हा त्या अंकाचा पाया आहे.

१९६६ ते १९७७ या अकरा वर्षाच्या इदिरा गाधीच्या कारकीर्दीचा आलेख हा स्थूलमानाने आपल्या समाजाचीच प्रगती, जाण, मर्यादा आणि आकाक्षाचा आलेख आहे सतन उचावणाऱ्या सामान्य जनाच्या रास्त अपेक्षा, येथील समाजव्यवस्थेने त्या अपेक्षाना घातलेल्या वेड्या, दुभगलेली–तिभगलेली कष्टकरी जनतेची चळवळ, सततपणे (अजूनही) जाणवणारे अस्थैर्य आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठी लागणारी सघटना–विचारसरणी याचा अभाव या कॅनव्हॉसवर इदिरा गाधीचे पंतप्रधानपद उमटले होते.

हा कॅनव्हास उमजून न घेता ' त्या हुकूमशहा होत्या ' ' आत्म–केंद्रित होत्या ' ' कावेबाज, लबाड, धूर्त, चकवाचकवीत हुषार होत्या ' इ० आणीबाणीपूर्वीच स्वीकारलेल्या मतांना आणीबाणीतील तथाकथित किंवा प्रत्यक्ष झालेल्या अत्याचारांची कल्हई लावून आपला विशेषांक काढला गेला आहे.

चद्रशेखर मराठयाना तर ' इंदिरा गाधी फिनॉमिनन ' समजण्यासाठी हे शास्त्र वापरू का ते, असं झालं आहे. पोलिटिकल कल्चर, टेक्नॉलॉजी, ह्यूमन कम्युनिकेशन्स, सायकॉलॉजी, सोशल सायकॉलॉजी, इटर अॅन्ड इंट्रा पर्सनल कम्युनिकेशन्स, सोशिऑलॉजी इ० विषयावरील सर्व पुस्तकं चाळून त्यानी वाचकांना एक गुतावळा सादर केला आहे.

आश्चर्य इतकच वाटतं, की ज्या कॅनव्हासवर इंदिरा गांधी कार्यरत होत्या त्या कॅनव्हासकडे पाठ फिरवून, सावल्याचा खेळ पाहात आपल्याला इंदिरा गांधीचे मूल्यमापन करता येणार आहे का ?

इदिरा गाधीविरोधी कानठाळ्या बसविणारा कर्कश कल्लोळ देशभर चालू असतानाच ' आधी रोटी खाएँगे, इदिराजीको बुलाअेंगे ' या घोषणेने लहान स्वरूपात पण आकार धारण करायला सुरुवात केली आहे.

भ्रष्टाचार, चौकशीसमित्या, अटक–सत्र आणि काही लोकाना सुळावर देणं या चिल्लर घटना असनात. इतिहास त्याची दखल घेतो, नाही असं नाही; पण इतिहास मूळ स्रोत न्याय देतो.

फ्रेंच लोकशाही क्रातीच्या नेत्याने, नेपोलियनने, नतर आपल्याला सम्राट बनवून घेतले, इतकाच इतिहास लिहिला जात नाही. त्या नेत्याने जागतिक लोकशाही क्रातीला मार्ग दाखविला हे पण लिहिले जाते. इदिर गाधी नेपोलियनइतक्या थोर नसतील कदाचित; पण त्याचे मूल्यमापन सायको अॅनॅलिसिसने पूर्ण होणार नाही मला इदिरा गाधींबद्दल वाटणारे विचार मी पुढे सूत्ररूपाने माडत आहे .

सर्वसामान्य लोकाना आकांक्षा असतात. त्या आकाक्षा मूर्त करण्यासाठी लागणारी स्पष्ट विचारसरणी त्याच्याजवळ नसते. समाजातील वर्गांना मात्र बऱ्याच अंशी स्पष्ट अशी त्या त्या वर्गांची विचारसरणी असते. राजकीय पक्षामध्ये व पक्षाच्या व्यवहारामध्ये या त्या वर्गाच्या विचारसरणीचे प्रतिबिंब पडत असते.

इदिरा गाधी, हे पक्षमंडळ वा वर्गमडळ भेदून सरळपणे ( डायरेक्टली ) जनतेला भिडतात, भिडू शकतात आणि त्या त्याच्या आकाक्षा व्यक्त करणाऱ्या मूर्तस्वरूप बनतात.

परंतु जनतेच्या आकाक्षा स्पष्ट (मूर्तस्वरूप) करण्यासाठी निश्चित (वर्गीय आणि म्हणून क्रातिकारक) विचारसरणी असावी लागते. ती जर नसेल तर प्रचलित विचारसरणीच्या चाकोरीत माणूस अडकतो.

इंदिरा गाधी या जनतेच्या आकाक्षांना प्रभावीपणे व्यक्त करणाऱ्या परंतु समाजातील कोणत्याही वर्गाची निश्चित विचारसरणी नसलेल्या नेत्या आहेत.

त्यामुळे त्याचे सामर्थ्य कोणत्याही पक्षदलातून, समाजातील वर्गातून वा निश्चित वैचारिक बैठकीतून येत नाही तर जनतेच्या आकांक्षांशी एकरूप झाल्याने येते.

परतु समाजातील प्रचलित विचारसरणी या आकाक्षा पुऱ्या करू शकत नाही– शकणार नाही. कारण प्रचलित विचारसरणी, शोषक वर्गाच्या, त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षामार्फत व सरकारनामक कारभार यत्रणेमार्फत अमलात आणली जात असते.

कामगार – शेतकरी – मध्यमवर्ग यांच्या वर्गीय एकजुटीच्या आणि चळवळीच्या सामर्थ्यनिच प्रचलित–प्रस्थापित शोषक वर्गीय विचारसरणीचा पराभव होऊ शकतो.

इदिरा गाधी तशा चळवळीना React होऊ शकणाऱ्या पुढारी आहेत– वर्गीय चळवळ बाधणाऱ्या नव्हेत.

परतु अजूनही अस्तित्व हरवलेल्या जनतेला इदिरा गाधी आपल्या पुढारी वाटतात. कारण ते अस्तित्व, त्यांच्या आकाक्षाना स्पर्श करून व्यक्त करण्याचे त्याचे सामर्थ्य.

इदिरा गाधीचे सामर्थ्य त्यांच्या धूर्तपणात, कावेबाजपणात, हुषारीत व टायमिंगमध्ये नाही तर वर वर्णिलेल्या सामर्थ्यात आहे. अर्थातच या आकाक्षाना पुन: प्रचलित प्रस्थापित विचारसरणीच्या चाकोरीतच ढकलण्याचा प्रयत्न त्यांनी केला तर त्या पुन: पराभूत होतील. जसे, एका अर्थी जनता पक्षाच्या पराभवाला हळूहळू सुरुवातही झाली आहे.

इदिरा गांधीच्या पुनरागमनाने जो उद्रेक होईल अशी भीती चंद्रशेखर मराठ्याना वाटते तो उद्रेक जनतेचा असणार आहे. इदिरा गांधीचा नव्हे. हा उद्रेक प्रचलित व्यवस्था – विचारसरणीविरुद्ध असेल आणि तो क्रमाक्रमाने मूर्तस्वरूप धारण करील. त्या उद्रेकाने वर्गीय विचारसरणी धारण करायला सुरुवात केली आहे. इंदिरा गांधी त्या उद्रेकाबरोबर असण्याची शक्यता आहे.

अशा स्वप्रेरित जनतेच्या उद्रेकाला क्रांती असे नाव आहे.

चद्रशेखर मराठ्यांना या क्रातीची भीती वाटते काय ? कारण त्या क्रातीच्या आड इदिरा गाधी– कॉंग्रेस – जयप्रकाश – जनता पक्ष कोणीच येऊ शकणार नाही.

काही इटेलेक्च्युअलसना अशी भीती वाटते की, कोणत्याही वर्गाची निश्चित विचारसरणी न स्वीकारलेल्या इंदिरा गाधी या उद्रेकाशी एकरूप झाल्या तर ?

**कुमार केतकर**
**ठाणे.**

# मुक्ताफळे

## □ नवा महाराष्ट्र

**दि. ३०, वसंतनगर :**

येथील शिवाजी महाविद्यालयातील एका विद्यार्थिनीला वसतिगृहात नेऊन बलात्कार केल्याच्या आरोपावरून चार विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली होती. या चौघाना आज प्राथमिक चौकशीसाठी न्यायमूर्ती श्री. गंगासिंग याच्यापुढे नेण्यात आले. या चौकशीच्या वेळी इतर तिघे बलात्कार करीत असताना, नुसता पहारा करण्याच्या आरोपावरून पकडलेला कार्यकर्ता विद्यार्थी आरोपी अमृत × × ×. (२०) यास पुरेशा पुराव्या-अभावी न्यायमूर्तींनी सोडून दिले. आरोपीची सुटका झाल्यानंतर, त्याच्या चाहत्यानी त्याची कोर्टापासून भव्य मिरवणूक काढली. ही मिरवणूक 'झिंदाबाद'च्या घोषणा देत शहरात फिरली. बलात्कार झालेल्या विद्यार्थिनीच्या घरासमोर उभे राहून, मिरवणुकीतील निदर्शकानी मुलीच्या व तिच्या वडिलाच्या नावाने उच्चभ्रूना न आवडणाऱ्या काही नम्र घोषणा देऊन, मुलीला व तिच्या वडिलांना चांगली अद्दल घडविली. मिरवणुकीबरोबर महाराष्ट्र सरकारच्या पोलिसाची गाडी असल्याने कोठलाही अनुचित प्रकार न घडता, मिरवणुकीत सामील झालेल्याना काहीही त्रास झाला नाही. आमच्या बातमीदाराने मिरवणुकीनतर अमृत ××× यांची मुलाखत घेतली असता, मागील मिरवणुकीत मी काँग्रेसचा प्रचार केला, म्हणून शाळेच्या प्रिन्सिपॉलनी आपल्याला खटल्यात गुतविल्याचे सांगितले. अमृतराव म्हणाले की, माझी अटक ही राजकीय होती !

**दि. ३१ पवारवाडी :**

पवारवाडी येथील एका विद्यालयातील विद्यार्थिनीनी काल्चा दिवस गाजवला. या शाळेची एक विद्यार्थिनी मदाकिनी सरपरवार हिच्यावर इतर मुलीच्या काही वस्तू चोरल्याचा आरोप होता. गेले काही दिवस विद्यालयातील विद्यार्थिनी आपल्या मौल्यवान वस्तू चोरीस जातात म्हणून शाळेतील बाईंकडे तक्रार करीत असत. पाळत ठेवून मुख्याध्यापिका श्रीमती तेजास्विनी पाटील यानी कु. मदाकिनी सरपरवार हिला मुद्देमालासह पकडले. एका विद्यार्थिनीचे हरवलेले विल्सन पेन कु. मदाकिनी हिच्या दप्तरात सापडले; परतु गुन्हा किरकोळ आहे तेव्हा पोलिसात तक्रार न देता, त्यानी कु. मंदाकिनी हिला कदाचित 'पेनसारखे दुसरे पेन असेल' असा सशयाचा फायदा दिला. शिक्षा करण्याचे रद्द होताच काही विद्यार्थिनीनी पेढे वाटले.

शाळा सुटताच कु मंदाकिनी सरपरवार हिच्या मैत्रिणीनी तिची मिरवणूक काढली. शाळेच्या आवारात असलेल्या शाळेतील शिक्षकिणीच्या सायकलीची विद्यार्थिनीनी प्रथम मोडतोड केली. मुख्याध्यापक बाईच्या खोलीच्या खिडक्याच्या काचेच्या तावदानावर त्यानी जोराची दगडफेक केली. श्रीमती तेजस्विनी पाटीलबाई यांच्या कपाळाला किरकोळ जखम झाली. फक्त तीनच टाके पडले !

इतकी जरब बसविल्यानंतर विद्यार्थिनी शाळेच्या बाहेर पडल्या व रस्त्यावर मुलीला न्यायला आलेली एका पालकाची अ‍ॅम्बेसडर गाडी उभी होती; त्यावर विद्यार्थिनीनी हल्ला चढविला व नंतर ती मोटार पेटवून देण्यात आली. 'पाटीलबाई मुर्दाबाद!' अशा घोषणा देत हा मोर्चा नंतर गावात फिरला. या वेळी शाळेपासून समोरच असलेल्या महाराष्ट्र सरकारच्या पोलीस चौकीतील पोलीस हा सर्व प्रकार कौतुकाने पाहात होते त्यांनी नतर शाळेत येऊन सर्व स्त्री-शिक्षिकाना 'तुमची काही तक्रार आहे का ?' असे दरडावून विचारले. भीतीने दातखिळी बसलेल्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटील या काही बोलेनात ! तेव्हा कुणाची काही तक्रार नाही असा अहवाल घेऊन पोलीस निघून गेले. गावात हा एकच चर्चेचा व मुलीच्या कौतुकाचा विषय झाला आहे.

**दि. १ : उणे**

येथील हत्याकांडातील एक आरोपी श्री. संजय बुक्कल याना तपासासाठी पोलिसानी नदीकाठच्या पुलावर आणले असल्याची बातमी सकाळी नऊच्या सुमारास गावात पसरली. चोरलेल्या काही महत्त्वाच्या वस्तू नदीच्या पात्रात टाकल्याचा संशय असल्याने, आरोपीला तेथे आणण्यात आले होते. श्री. संजय बुक्कल याच्या दर्शनासाठी पुलावर अतोनात गर्दी झाली होती. जमाव सारखा वाढत होता. दोन्ही बाजूची वाहतूक लवकरच बद करावी लागली. शेवटी लोकांच्या आग्रहास्तव श्री. बुक्कल याना आपल्या चाहत्यापुढे चार शब्द बोलण्याची परवानगी पोलिसानी दिली. गर्दी इतकी होती की, माइकची व्यवस्था असती तर बरे झाले असते असे लोक बोलताना आढळले.

श्री. सजय बुक्कल म्हणाले–

"आपण माझ्यावर जे प्रेम दाखवले ते मी कधीही विसरणार नाही. कारावासाचा किंवा फासावर लटकवले जाण्याचा धोका पत्करूनही, माझ्यावर प्रेम करणाऱ्या जनतेला मी कधीही विसरणार नाही !'

**दि. ५ : विकासनगर**

पतप्रधान इदिरा गाधी याना अटक झाल्याची बातमी येताच येथे त्याच्या अटकेच्या निषेधार्थ त्याच्या चाहत्यानी बद आयोजित केला. दगडफेक आणि जाळपोळ करीत एक मोर्चा गावातून फिरला. त्यानी प्रथम लुटालूट व दगडफेक करून सर्व दुकाने व उपाहारगृहे बद पाडली. एस. टी. स्टॅंडवर जाऊन बसेसच्या काचा फोडण्यात आल्याने एस. टी. वाहतूकही थडावली. मोर्चातील लोक सतत 'इदिरा गांधी झिंदाबाद !' ही घोषणा देत होते. हा मोर्चा नंतर जनता-पक्षाच्या अध्यक्षाच्या घराकडे गेला. जवळच विटाची भट्टी असल्याने येथे दगडाबरोबर विटाचाही सढळ वापर करण्यात आला. विटाचे दोन ट्रक्स केवळ अध्यक्षाच्या घरासमोर उभे होते म्हणून जमावाने जाळून टाकले ! घबराट होऊन शाळा सकाळीच सोडून देण्यात आल्या होत्या.

दिवसभर दमलेल्या–भागलेल्या मोर्चाचे अखेर सभेत रूपातर झाले. येथील युवक–काँग्रेसचे नेते नरेश भिताडे यांचे सभेत आक्रमक भाषण झाले. या वेळी सायंकाळचे पाच वाजले होते. मोर्चातील लोक घरोघर जाऊन, रस्त्यावर शुकशुकाट होताच महाराष्ट्र सरकारच्या पोलिसखात्याने गावात 'कर्फ्यू' जाहीर केला, यामुळे पुढील अनर्थ टळला.

याच धर्तीवर पुणे, नागपूर, परभणी व इतर असख्य ठिकाणी निदर्शने झाल्याच्या बातम्या आल्याने आम्ही आमचे वार्ताहर तिकडे रवाना केले आहेत. प्रत्येक वार्ताहराला चिलखत, शिरस्त्राण दिलेले आहे वार्ताहर सुखरूप परत येतील अशी आम्हाला आशा आहे. इंदिरा गाधी यांच्यावरील जनतेच्या प्रेमाचे सचित्र दर्शन घडवणारा खास अंक आम्ही लवकरच प्रसिद्ध करू

— ग्यानबा

महाराष्ट्र बँकेचे नवे चेअरमन

# डॉ. वसंतराव पटवर्धन

मनोहर सोमण । प्रकाश जोशी

१ ऑक्टोबर १९७७ पासून डॉ. वसंतराव पटवर्धन महाराष्ट्र बँकेचे चेअरमन म्हणून काम पाहू लागले आहेत. त्याची या पदावर नेमणूक झाल्याची वार्ता दि. २१ सप्टेंबर रोजी सर्वांना समजली. तेव्हापासून गेले दहा दिवस त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव चालू आहे. डॉक्टर वयानं तरुण, वागायला मनमोकळे आणि अत्यंत तल्लख बुद्धीचे, व्यासंगी गृहस्थ आहेत, ह्याचा त्यांच्याशी बोलताना काही क्षणातच प्रत्यय येतो. तुम्ही त्यांना आपुलकीनं 'डॉक्टर' म्हणाल तर ते त्याना जास्त आवडेल. नवनवीन आणि अत्यत आकर्षक अशा कल्पनांचे भांडार त्यांच्यापाशी आहे आणि त्यातील कित्येक कल्पना प्रत्यक्षात आणण्याची धडाडीदेखील त्यांच्यापाशी आहे. महाराष्ट्र बँकेचे विदेश विनिमय आणि नियोजन विभाग हे त्यांच्या धडाडीचे द्योतकच आहेत. येत्या तीन वर्षाच्या त्यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्र बँकेचा मर्चंट बँकिंग विभाग सुरू होणार यात शंका नाही. याच कालावधीत महाराष्ट्र बँक राष्ट्रीयीकृत बँकात मानाचे स्थान पटकावणार अशी अपेक्षा ठेवली तर काहीच वावगे नाही.

साप्ताहिक माणूसच्या वतीने आम्ही त्याचे अभिनंदन केले आणि मुलाखत मागितली. त्यानी वेळ दिली.

ठरल्याप्रमाणे आम्ही ठीक सात वाजता त्यांच्या 'प्रद्युम्न' बंगल्यावर गेलो. पण सतत वाजणारे फोन आणि अभिनंदनासाठी घरी येऊन भेटणारे हितचिंतक यामुळे थोडीसुद्धा उसंत मिळेना सलग बोलणे अशक्य झाले तेव्हा ते म्हणाले, 'सकाळी साडेदहा वाजता आपण दुसरीकडे कुठे तरी जाऊन बसू या म्हणजे निवातपणे बोलता येईल!' त्याप्रमाणे आमचे स्नेही श्री. मोहनराव काळे यांच्या घरी एकदाची मुलाखत जमली.

ही आनंददायक वार्ता समजल्यावर आपली प्रतिक्रिया काय होती हे सांगताना ते म्हणाले, 'हे वृत्त ऐकून मला साहजिकच आनंद झाला. मी काही संत नाही. माझ्या नावातच 'वसत' आहे. अर्थात यात आर्थिक लाभालाभाचा प्रश्नच नाही. कर्तृत्वाचे एक नवीन क्षेत्र उपलब्ध झाल्याचा हा आनद आहे. सामाजिक हितासाठी माझ्या वेगवेगळ्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची ही एक संधी आहे असे मी मानतो.'

ज्यानी डॉक्टराना पुढे आणले ते कै. जोगसाहेब आणि कै. देसाहेब आज असायला हवे होते अशी भावना त्यानी व्यक्त केली.

### बँकांना स्वतंत्र अस्तित्व हवं

भारतातील राष्ट्रीयीकृत बँका आणि त्यांचे व्यवहार यासबधी त्यानी काही नाविन्यपूर्ण विचार व्यक्त केले. आज भारतात चौदा राष्ट्रीयीकृत बँका आहेत. प्रत्येक बँकेचे वेगळे अस्तित्व जपण्याची आवश्यकता त्यानी प्रतिपादन केली. ते म्हणाले, 'प्रत्येक बँकेला एक विशिष्ट परंपरा आणि घडण आहे. बँकेच्या वाढीत भोवतालच्या सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा फार मोठा वाटा असतो. या पार्श्वभूमीवर प्रत्येक बँकेचा स्वतंत्र विकास होणे आवश्यक आहे. मोठंचा शहरातून एकाच रस्त्यावर अनेक बँकांच्या शाखा एकमेकाना लागून असतात तेथे प्रत्येक बँकेला उत्तम धंदा मिळत असेल तर त्यात काहीच गैर नाही. उत्तम ग्राहक आणि ठेवी मिळविण्यासाठी बँकात चढाओढ असायला हरकत नाही; पण ती निकोप स्वरूपाची असावी.

'अलीकडे बदललेले व्याजाचे दर, चेकबुक असणाऱ्या आणि नसणाऱ्या बचत-खात्यावर दिले जाणारे व्याज या गोष्टी सर्व बँकांना सारख्याच लागू आहेत; पण प्रत्येक बँकेची जाहिरात स्वतंत्र असते. असल्या ठरीव साच्याच्या बाबीवर वेगवेगळ्या बँकांनी वेगळ्या जाहिराती देऊन अनाठायी खर्च करू नये. अशा वेळी सर्व बँकांनी सहकार्याने सर्वांची मिळून एकच जाहिरात द्यावी; पण बँकाचे स्वतत्र वैशिष्ट्य दाखविणाऱ्या जाहिराती वेगळ्या असण्यास काहीच हरकत नाही.'

बँकव्यवसायाबद्दल बोलताना त्यानी बँकव्यवसायाचे वैद्यकीय व्यवसायाशी साम्य दाखविले. आजाराचे अचूक निदान आणि उपचार एखादा कुशल डॉक्टर सहजगत्या करतो त्याप्रमाणे अनुभवी बँकर आपल्या ग्राहकाच्या आर्थिक अडचणीचे अचूक निदान करतो आणि त्यावर इलाज सुचवू शकतो. यासाठी बँक अधिकारी अधिका-

धिक लोकाभिमुख हवा. या संदर्भात सतत प्रशिक्षण मिळण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. आज बँकेतील कर्मचाऱ्यांना मिळणारे प्रशिक्षण महाविद्यालयीन शिक्षणाप्रमाणे व्यवहारापासून दूर आहे. ही परिस्थिती बदलायला हवी असे त्यांनी सांगितले. प्रशिक्षण आणि अभ्यास या संदर्भात ते पुढे म्हणाले, 'विविध उद्योगांच्या अर्थव्यवस्थेचा व्यावहारिक पातळीवरून अभ्यास करण्याची एक गरज आता निर्माण झाली आहे. याबाबतीत प्रत्येक राष्ट्रीयीकृत बँकेने एक एक उद्योग निवडून सखोल अभ्यास करावा आणि त्या माहितीची आपापसात देवघेव करावी.

### बँकेचं भावी धोरण

पुढील तीन वर्षांच्या काळात महाराष्ट्र बँकेचे धोरण काय असेल याबद्दल बोलताना ते म्हणाले, 'आमच्या ठेवी ३९० कोटी रुपयांवरून ७५०–८०० कोटी रुपयांच्या घरात नेण्याचे माझे प्रयत्न राहतील. महाराष्ट्र बँकेचे स्थान राष्ट्रीकृत बँकांत वर जावे यासाठी मी सतत खटपट करीन. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रालगतची गुजरात, राजस्थान व मध्यप्रदेश ही विकसनशील राज्ये हे आमच्या विस्ताराचे कार्यक्षेत्र राहील. याबरोबर बिहार, ओरिसा व काश्मीर या विकसनशील राज्यांतील महत्त्वाच्या शहरांत शाखा उघडण्याचा आमचा विचार आहे.'

इतर काही वैशिष्टचपूर्ण योजनांबद्दल त्यांनी माहिती सांगितली. ते म्हणाले, 'आज आपण इंग्लंड आणि युरोपियन सामायिक बाजारपेठेतील देशांकडे सुमारे १००० कोटी रुपयांच्या मालाची निर्यात करतो. याला मदत व्हावी म्हणून प्रगत युरोपीय देशात काही माहिती-केंद्रे काढण्याचा आमचा विचार आहे. ही माहिती-केंद्रे निघू शकल्यास त्या देशांना कोणत्या मालाची आयात करावी लागते, भारतातील उद्योगधंदे हा माल कसा निर्यात करू शकतील, आपल्या भारतीय कंपन्यांच्या त्या देशात संलग्न संस्था निघू शकतील का याची अद्ययावत माहिती आमची माहिती-केंद्रे आमच्या ग्राहकांना आणि इतरांनादेखील सातत्याने पुरवतील.

'येत्या तीन वर्षांच्या कालावधीत आम्ही मर्चंट बँकिंग विभाग नक्की सुरू करणार आहोत. त्यात नवीन उद्योग सुरू करणाऱ्या प्रवर्तकांना विशेषतः लघु व मध्यम आकाराच्या कंपन्यांना मदत केली जाईल. नवीन कंपनी कशी उभी करावी, भाग–भांडवल-उभारणी, कर्जव्यवस्था ही नेहमीची कामे आमचा मर्चंट बँकिंग विभाग करीलच. त्याखेरीज लघु व मध्यम उद्योगांना खास प्रकारचे सहाय्य, सल्ला, संपर्क व प्रशिक्षण ही कामेही आम्ही तेथे करू. लघुउद्योजकांमध्ये आर्थिक शिस्त असण्याची जरूर सध्या अधिक जाणवते. तेव्हा हे प्रशिक्षण दिल्याने उद्योजक आणि बँक दोघांचा फायदा होईल. अशा तऱ्हेने लघु आणि मध्यम उद्योगांना अधिक सहाय्य करण्याचे आमच्या बँकेचे धोरण राहील. लघुउद्योजकांना आमच्या



डॉ. मोरेश्वर ऊर्फ वसंत वामन पटवर्धन

| | |
|---|---|
| जन्म | : २४ एप्रिल, १९२८. |
| शैक्षणिक पात्रता | : MA. PHD. (Economics) |
| बँकेतील अनुभवाबाबत | : १९४७ मध्ये महाराष्ट्र बँकेत प्रवेश. गेल्या तीस वर्षात बँकेतील विविध अधिकारांच्या जागांचा अनुभव. १९६१ मध्ये इंग्लंडमधील आंतरराष्ट्रीय बँक परिषदेला भारतीय प्रतिनिधी म्हणून उपस्थित. |
| इतर कार्यक्षेत्र | : मराठी ललित साहित्यलेखन. अर्थ–उद्योग विषयांवर विपुल लिखाण. पुणे विद्यापीठात कॉमर्स फॅकल्टी आणि बोर्ड ऑफ स्टडीज्चे सदस्य. रोटरी क्लब, पुणे दक्षिण विभाग यांचे अध्यक्ष (१९७२–७३) M. B. A च्या वर्गांना मानद प्राध्यापक. |
| लेखनविषयक | : पुस्तके : सोन्याचे हरीण<br>विदेश विनिमय<br>महाराष्ट्र सरकारचे पहिले ताळेबंद विवरण व अभ्यास.<br>मेघदूत (पद्यमय)<br>वसंत आला. अर्थव्यवस्थापन. |
| आगामी पुस्तके | : आर्य चाणक्य (कादंबरी)<br>उत्तररामचरित्र (पद्यमय-मराठी) |

बँकेकडून एकूण कर्जाच्या १७।१८ टक्के पतपुरवठा आहे तो २५ टक्क्यांपर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.'

### काही अभिनव कल्पना

यानंतर आणखी काही कल्पना मांडताना डॉक्टर पुढे म्हणाले, 'आज बँकशाखा ठराविक ठिकाणीच उघडल्या जातात, परंतु जेथे जथे पैशाचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होतात तेथे तेथे बँकेच्या उपशाखा (Extension counters) उघडण्याचा आमचा मनोदय आहे. या संदर्भात महाराष्ट्रातील रेल्वे आणि एस. टी. स्थानके यांचा रिझर्व बँकेच्या संमतीने विचार केला जाईल.'

गेल्या काही वर्षांत भारताच्या पश्चिम किनारपट्टीत सागराच्या तळाशी आणि जमिनीवर खनिज तेल मोठ्या प्रमाणावर सापडले आहे याचा विचार करून त्यांनी भारताच्या या दिशेने होणाऱ्या औद्योगिक प्रगतीचा आलेख मांडला. पुढील पाच वर्षांत उरण–अंकलेश्वर पट्ट्यात खनिज तेलउद्योगावर आधारित पेट्रोकेमिकल उद्योगधंदे, खतकारखाने निघतील. अशा वेळी उरण–अंकलेश्वर प्रकल्प डोळ्यांसमोर ठेवून या टापूत प्रत्येक २०–२५ मैलावर एक-एक शाखा उघडणे उपकारक ठरेल.

सामाजिक जीवनात बँकेचा सहभाग कसा असू शकेल याबद्दलही काही आकर्षक कल्पना त्यांच्यापाशी आहेत. शनिवारवाडा आणि आसपासचा परिसर सुशोभित करण्याची तयारी बँकेने दाखवली आहे आणि त्याबद्दल संबंधित कचेऱ्यांशी संपर्क साधला आहे.

'बँक ही सामाजिक जीवनात एखाद्या व्यक्तीसारखी आहे आणि तिने सामाजिक जबाबदारीचा भाग आपल्या परीने उचलायला हवा अशी त्यांची धारणा आहे. दिल्लीला लाल किल्ल्यात Light & Sound हा चित्ताकर्षक कार्यक्रम होऊ शकतो. मग जिजामाताबाग अथवा शनिवारवाड्यावर शिवाजीमहाराजापासूनच्या सर्व इतिहासावर का होऊ नये? यासाठी आमची 'बँक महानगरपालिका आणि महाराष्ट्रसरकार यांच्याबरोबर काही तरी करू शकेल असे वाटते.' ते पुढे म्हणाले, 'याच पुण्यातून आपल्याविरुद्धची बडाळी मोडण्यासाठी विजापूरच्या आदिलशहाने गाढवांचा नांगर फिरवला होता. तेच पुणे वसवताना शिवाजीमहाराजांनी बालगंधर्व रंगमंदिराजवळ कुठे तरी सोन्याचा नांगर फिरवला होता. त्या ठिकाणी एक सोनेरी नांगर हातात घेतलेली महाराजाची प्रतिकृती उभी करण्याच्या कल्पनेस महानगरपालिका आणि महाराष्ट्र सरकार याच्याबरोबरीने बँकेसारख्या संस्थेने भाग घेण्यास काहीच अडचण येऊ नये असे वाटते.'

ज्ञानबा-तुकारामाची संस्कृती ज्या मराठी मातीत रुजली आणि वाढली त्याच मातीतून महाराष्ट्र बँक जन्माला आली आहे. महाराष्ट्रात वाढला तो मराठा अशी मराठी संस्कृतीची सोपी व्याख्या करून ते म्हणाले, 'याच पाठबळावर आमची सारी वैशिष्ट्ये टिकवून आम्हाला ही बँक पुढे न्यायची आहे.'

इतके सांगितले म्हणजे डॉक्टर सामाजिक जीवनात कसे रमतात याची कल्पना येईल. ते रोटेरिअन आहेत. उत्तम सिद्धहस्त लेखक आहेत. ललित साहित्य आणि अर्थ-उद्योगविषयक लिखाण या दोन्ही क्षेत्रात त्यांचा संचार सहजगत्या चालतो. मानद प्राध्यापक म्हणून ते M. B. A च्या वर्गांना अर्थव्यवस्थापन शिकवतात याहून पलीकडे जाऊन सांगायचं तर ते कवी आहेत. तरल भाव शब्दांत पकडणाऱ्या किती तरी कविता त्यांनी लिहिल्या आहेत.

आमची मुलाखत संपत आली होती. येत्या तीन वर्षांची कारकीर्द त्यांना आणि महाराष्ट्र बँकेला भरभराटीची जावो अशी शुभेच्छा आम्ही व्यक्त केली. आम्ही म्हणालो, 'तीन वर्षांनंतर तुम्ही कदाचित दिल्लीकडे वाटचाल कराल!'

त्यांनी स्मितहास्याने आमच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. □

---


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

प्रा. रा. म. चिटलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर । पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

## बर्ट लान्स प्रकरण

# कार्टरचा रथ जमिनीवर टेकला

चन्द्रशेखर पुरन्दरे

स्वच्छ प्रशासनाचे नारे लावून जिमी कार्टर सत्तारूढ झाला. अमेरिकेच्या शासन-व्यवस्थेतील राष्ट्राध्यक्षांच्या खालोखाल महत्त्वाची ठरू शकेल अशी डायरेक्टर ऑफ मॅनेजमेन्ट अँड बजेट ही जागा आहे. याच्या अध्यक्षपदी कार्टरने आपल्या जुन्या मित्राची-बर्ट लॅन्सची-नेमणूक केली आणि एका वादळाची सुरुवात झाली.

हा बर्ट ल्यान्स कार्टरसारखाच दक्षिणेकडच्या जॉर्जिया संस्थानातून आलेला आहे. अकरा वर्षांपूर्वी जेव्हा कार्टर जॉर्जियाच्या गव्हर्नरपदाची निवडणूक लढवीत होता, तेव्हा प्रचार करताना तो बर्ट लान्सच्या गावी ( कॅलनला ) गेला होता. तेथे त्याला लान्सने प्रथम पाहिले व ऐकले आणि तिथेच तो कार्टरचा एक सच्चा अनुयायी व पुढे मित्र बनला. तो प्रथम व्यवसायाने तिथल्या बँकेचा अध्यक्ष होता. तो अध्यक्ष असताना त्याने केलेल्या काही व्यवहाराची माहिती उजेडात आली आणि कार्टरच्या अध्यक्षीय कारकीर्दीतील पहिलाच पेच प्रसंग सुरू झाला.

' कॉम्प्ट्रोलर ऑफ करन्सी ' या अमेरिकन अर्थखात्यातील बँकावर लक्ष ठेवणाऱ्या विभागाने हा प्रकार उजेडात आणला. २६ लक्ष डॉलर्सचे एक कर्ज मॅन्युफॅक्चरर्स हॅनोवरने लान्सला दिले होते. हे जॉर्जियामधील एका बँकेसाठी होते. कर्जाच्या देण्यानंतर लगेचच या बँकेने अडीच लाख डॉलर्स बिनव्याजी न्यूयॉर्कच्या बँकेत ठेवले. या जॉर्जिया बँकेचा लान्स अध्यक्ष होता, न्यूयॉर्कच्या बँकेत ठेवण्यासाठी काही कर्ज दिलेले नव्हते. पण त्यात बेकायदेशीरही काही नव्हते. प्रश्न फक्त उचित व अनुचित काय एवढाच होता आणि त्यामुळेच तो जास्त क्लिष्ट बनला.

अमेरिकेतील वृत्तपत्रांना व रेडिओ, टी. व्ही. या प्रचारमाध्यमाना या प्रकाराचा वास लागताच त्यानी हातात कोलीत मिळाल्याप्रमाणे अपप्रचाराची धमाल उडवून दिली. वॉटरगेट प्रकरणानतर प्रचार-माध्यमाना रक्ताची चव कळल्यासारखे झाले आहे. त्यामुळे त्यानी लान्सने केले असतील नसतील ते गुन्हे बेधडक पसरवायला सुरुवात केली. मूळ अहवाल ' कॉम्प्ट्रोलर ऑफ करन्सी ' ने दिला होता. त्यात लान्सच्या या व अशा ( उधळपट्टीच्या ) व्यवहाराची नोद ' असमर्थनीय ' या शब्दात घेतली होती. कार्टरने ह्यात बेकायदेशीर असे काही नसल्याने म्हणा किंवा जुना निष्ठावत मित्र असल्याने म्हणा, पहिल्यापासून प्रचार-माध्यमाच्या विरोधाच्या टोकाची भूमिका घेतला. प्रतिदिनी नव्या निवेदनाने तो लान्सचे समर्थन करू लागला त्यामुळे परिस्थिती चिघळली. शेवटी या महिन्यात सिनेटर रिबिकफ याच्या अध्यक्षतेखाला एक समिती नेमण्यात आली या समितीमध्ये एकूण सतरा सिनेटर्सचा समावेश होता त्यातील दहाजण डेमोक्रॅटिक पक्षाचे आणि सातजण रिपब्लिक पक्षाचे होते. बर्ट लान्सची या समितीबरोबर जी वर्तणूक झाली तिच्यामुळे त्याला अचानक सहानुभूती मिळाली. या समितीसमोर त्याने आपण निर्दोष असल्याचे ठासून सागितले. अमेरिकेतील प्रख्यात आणि आघाडीचा वकील क्लार्क क्लिफोर्ड याच्याकडे त्याने आपले वकीलपत्र दिले आहे. मूळ कायद्याच्या कचाट्यात तो सापडणे वा न सापडणे हे सध्या त्याच्या व्यवहाराच्या चौकशी करण्यासाठी जी आणखी चार कमिशन्स नेमली आहेत ती ठरवतील; पण मध्यतरी मात्र कार्टरला त्याचे संरक्षण करताना नाकी नऊ येत होते. लान्सने एकूण तीन दिवस कमिशनपुढे साक्ष दिली. ( १७ सिनेटर्सच्या कमिशनपुढे ) त्याने वारंवार 'अर्धसत्य, खोटे आरोप आणि हितशत्रूच्या कारवाया यांनी मी दबणार नाही', असा निर्धार जाहीर केला.

दुसरा त्याच्या व कार्टरच्या बाजूचा मुद्दा असा की हे जे काही व्यवहार झाले होते ( त्यात एका विमानाच्या खरेदीचा व वापराचा प्रमुख भ्रष्टाचार म्हणून गणला गेलेला होता ) ते सारे कार्टरने त्याची नेमणूक करण्याआधीचे होते. लान्सच्या मते त्याने जेव्हा बँकेचे वार्षिक व्यवहार स्वच्छ असल्याचे दाखविले तेव्हाच प्रश्न तिथे सपला. एक गोष्ट मात्र खरी, ती म्हणजे लान्स पैशाच्या व्यवहारात सैल हाताचा होता. तो आणि त्याची बायको लाबेये दोघेही याबाबतीत ढिले होते. जॉर्जियामध्ये तर दहा लाख डॉलर्स किमतीचे एक आलिशान घर या गृहस्थाने खरीदले आहे. त्यात केलेल्या सुखसोयीही डोळ्यावर येतील इतपत मोठ्या प्रमाणावर होत्या.

त्याने बऱ्याच लोकाना (बँकेच्या जीवावर फर्स्ट नॅशनल बँक ऑफ जॉर्जिया ही ती बँक) उदारहस्ते मदती केल्या. दुर्दैवाने कार्टरकुटुबीयही त्यात होते. त्याने या बँकेला एक विमान विकत घ्यायला उद्युक्त केले आणि ते नतरच्या निवडणुकीसाठी व काही वेळा खाजगी वापरासाठी वापरले.

हे सारे प्रकरण इतके तापवले गेले, की प्रत्यक्षात फारच थोडे 'आक्षेपार्ह' आढळल्याने अमेरिकेतील प्रचार माध्यमांवर ते बूमरँगसारखे उलटले आहे. त्याची विश्वासार्हताच एकदम संशयास्पद ठरली. स्वतः कार्टरही एकदम जमिनीवर आला. शेवटी कोणत्याही परिस्थितीत राजीनामा देणार नाही असे म्हणणाऱ्या व प्रतिदिनी हा निर्धार असून सांगणाऱ्या बर्ट लान्सला २१ सप्टेंबरला राजीनामा द्यावा लागला !

ही बातमी सांगताना कार्टर फारच भावनाविवश झाला होता बजेट डायरेक्टरपेक्षाही प्रत्येक अध्यक्षाला ज्याची अत्यंत जरूरी भासत आलेली आहे असा खास विश्वासातला मित्र या नात्याने लान्स त्याला जास्त जवळ होता. त्यामुळे अश्रू रोखून भरतच त्यानेही राजीनामा स्वीकारल्याची बातमी दिली. त्याच वेळी 'तो माझा धाकटा भाऊ असल्यासारखा मला प्रिय आहे' असेही त्याने सागितले.

बर्ट लान्स या वेळी डेट्रॉइटला होता. त्याला नंतर पत्रकारांनी गाठून याविषयी विचारल्यावर-तो आपण मजेत असल्याचे म्हणाला. परंतु त्याची एकूण आर्थिक परिस्थिती पाहाता तो फार काळ मजेत राहाणे कठीण दिसते. आता वॉशिंग्टन सोडून तो परत एकदा जॉर्जियाकडे कूच करीत आहे पण येताना त्याची जी परिस्थिती होती तिच्याहून फार वाईट अशी जाताना होणार आहे.

सध्या अमेरिकेच्या न्यायखात्याने उपरिनिर्दिष्ट बँकेच्या विमानाच्या गैरवापराबावत कमिशन नेमले आहे त्याची निष्पत्ती फौजदारी गुन्ह्यामध्ये लान्स अडकण्यात होऊ शकेल. म्हणजे एकेकाळच्या अमेरिकेच्या क्रमाक दोनच्या या इसमाला तुरुंगाची हवा खायला लागण्याची शक्यता आहे. दुसरे कमिशन सिक्युरिटी अँड एक्स्चेंज खात्याचे आहे. बँकेची शेअर्सच्या बावतीत दिशाभूल केली, या आरोपाखाली त्याची चौकशी ते करीत आहे. तिसरे इस्टर्नल रेवेन्यू सर्व्हिस अँड फेडरल इलेक्शन कमिशन आहे, ते विमानखरेदीबावत चौकशी करीत आहे. या कमिशन्समधून बर्ट लान्स सुखरूप बाहेर पडलाच तर त्याचे सावकार त्याची वाटच पाहात असतील. त्याला सध्या असलेले प्रचंड कर्ज हे त्याच्या आयातीपेक्षा फारच जास्त आहे. त्यामुळे वॉशिंग्टन पोस्टच्या मते तो आता 'अ ब्रोकन मॅन' आहे.'

सद्गदित आवाजात अशा या मित्राला निरोप देताना कार्टरपुढे निराळेच प्रश्नचिन्ह उभे आहे. ते म्हणजे लान्सच्या योग्यतेचा दुसरा माणूस कोठून आणायचा? बजेट डायरेक्टर म्हणून लायक माणूस मिळेलही, पण खास विश्वासातला मित्र तुटल्याच्या भावनेतून कार्टर अजून सावरलेला नाही नियमाप्रमाणे डेप्युटी डायरेक्टर जेम्स मॅकेंथ्री ह्या छत्तीस वर्षांचा इसम डायरेक्टर बनण्याची शक्यता आहे. पण तो वयाने लहान असल्याने अध्यक्षाचा दोस्त बनू शकेल की नाही याबद्दल साशंकताच आहे एक गोष्ट मात्र त्याच्या बाजूची ठरण्याचा संभव म्हणजे तोही जॉर्जियातलाच आहे.

या साऱ्या घडामोडीमुळे अमेरिकेची प्रचंड उद्योगयंत्रणा मात्र हादरली आहे सिनेटमध्ये असलेला 'आपला माणूस' या दृष्टीने बर्ट लान्सकडे बहुतेक सर्व बडे कारखानदार आणि उद्योगपती पाहात होते. त्याच्या वॉशिंग्टन सोडण्याने त्याचा आधारच संपुष्टात आल्यासारखे झाले आहे.

अशा रीतीने अध्यक्षीय स्थानावरचा पहिला कडू घोट कार्टरला गिळावा लागलेला आहे. या प्रकरणात प्रथम त्याने घेतलेली जरा अतिरेकी भूमिका सोडता, त्याचे वागणे पुष्कळच सयमित होते. प्रचार माध्यमांविषयी (जी लोकांच्याच मनातून एकदम उतरली. कारण प्रत्यक्षात ती फारच थोडे सिद्ध करू शकली.) सुद्धा त्याने तोल जाऊ न देता प्रतिक्रिया व्यक्त केली. (बहुतेक वर्तमानपत्रे व रेडिओ, टी. व्ही. चांगली वागली, काही अपवाद होते वगैरे वगैरे.) त्यामुळे खरा कार्टर कळण्यास लोकाना थोडी-फार मदत झाली आहे. त्याच प्रमाणे प्रचारमाध्यमे हकनाक एखाद्याला आयुष्यातून कशी उठवू शकतात, याचीही त्रासदायक जाणीव त्यांना झालेली आहे. □


यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली

दोन 'राजहंस' प्रकाशने

# टॉलस्टॉय एक माणूस

सुमती देवस्थळे

# श्रीग्रामायन

श्री. ग. माजगावकर

या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०.

आर्थिक टिपणे :

# तांदूळ आणि साखर

नारायण वैद्य, सभासद, महापालिका, पुणे

१ ऑक्टोबर १९७७ पासून भात व तांदूळ यांच्या ने–आणीला झोनल पद्धतीमुळे निर्माण झालेली बंधने रद्द केल्याचे सरकारने जाहीर करून सर्वांना एक सुखद धक्का दिला आहे. आता झोनलपद्धत संपली असून संपूर्ण देश एकच विभाग झाला आहे. आर्थिक धोरणाच्या दृष्टीने जनता सरकारचा हा नवा प्रयोग आहे. काही महिन्यांपूर्वी गव्हाबाबतही असाच धाडसी निर्णय सरकारने घेतला (त्यावेळी लेव्ही खरेदीची किंमत क्विंटल मागे ५ रु. नी सरकारने वाढवूनही दिली आहे.) गव्हाबाबतच्या सरकारच्या (नव्या) धोरणाने व्यापाऱ्यांच्या हाती गव्हाचा सर्व व्यापार जाऊन मक्तेदारी वाढेल व त्यामुळे भाव वाढतील आणि ते खाली आणणे सरकारला शक्य होणार नाही, अशी टीका त्यावेळी झाली होती. परंतु पहिला (१९७६–७७ चा) रब्बीचा हंगाम संपून पुढचा रब्बीचा हंगाम (१९७७–७८) सुरू होईपर्यंतच्या मधल्या काळात (मार्च ते नोव्हें.) गव्हाच्या भावाबाबत ओरड झालेली ऐकिवात नाही. गव्हाबाबतचे धोरण यशस्वी झाल्याने त्या आधारावर तांदळाच्या बाबतीत सरकारने एक ठाम पाऊल उचलले आहे.

लेव्ही पद्धतीने वसूल केल्या जाणाऱ्या कमी प्रतीच्या भाताची खरेदीची किंमत पूर्वी ७४ रु. क्विंटल होती, ती ७७ रु. क्विंटल-पर्यंत वाढविल्याचे सरकारने जाहीर केले. याबाबतची मागणी ९० रु. क्विंटलपर्यंत होती व ती ८० ते ८४ रुपयांच्या दरम्यान कोठेतरी राहील, असा तज्ज्ञांचा अंदाज होता. लेव्हीबाबत (देशभर एकच विभाग केल्यामुळे) भात व तांदुळाचा इष्टांक ठरविला नसल्याचे केंद्रीय शेती मंत्री श्री. सुरजीत सिंग बर्नाला यांनी सांगितले. अँग्रिकल्चरल प्राईस कमिशनने (APC) झोनलपद्धत रद्द करण्याची शिफारस करताना ५० लाख टन तांदळाचा साठा येत्या वसुली हंगामात व्हावा, अशी अपेक्षा केली आहे परंतु इष्टांक निश्चित न केल्यामुळे वसुलीच्या उत्तेजनार्थ असलेली बोनस योजना सरकारने मागे घेतली आहे कमी प्रतीच्या भाताचा भाव 'फक्त' ३ रुपयांनी क्विंटलमागे वाढविल्याने शेतकऱ्यांचे काही प्रमाणात नुकसान होईल. परंतु त्याबरोबर देशभरची वाहतूक नियंत्रणे उठल्यामुळे खुल्या बाजारात शेतकऱ्याला स्वतःचा तांदूळ विकता येईल. आतापर्यंत त्या त्या विभागातील 'व्यापाऱ्यांच्या हाती खरेदी असल्यामुळे भाव पाडून व्यापारी खरेदी करीत. आता खुल्या बाजारातील वाजवी भावाचा फायदा प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या हाती अधिक प्रमाणात जाईल. खुल्या बाजारातील भाताचे व तांदळाचे खरेदी दर सुद्धा तसे व्यापारी (अधिक नफा पुढे व्हावा म्हणून) फारसे वाढवणार नाहीत. कारण सार्वजनिक वाटप व्यवस्थेतील कमी प्रतीच्या तांदळाची विक्रीची किंमत (Ex-godown price) १३५ रु क्विंटल व मध्यम दर्जाच्या तांदळाची १५० रु. क्विंटल ही पूर्वीचीच कायम राहणार आहे. खरेदीच्या प्रतिक्विंटल-मागे केलेली वाढ (३ रु) लक्षात घेऊन सरकारवर काही प्रमाणात जादा भार पडेल. सार्वजनिक वाटप व्यवस्थेमधून 'किती' तांदळाचे वाटप होते, त्यावर तो अवलंबून राहील. रास्त भावाच्या दुकानातून गेल्या वर्षात देशभर ३६ लाख टन तांदळाचे वाटप झाले. परंतु निर्बंध उठल्यामुळे खुल्या बाजारातील चांगला तांदूळ घेण्याकडे काही प्रमाणात गिऱ्हाईक वळेल व सार्वजनिक वाटपव्यवस्थेतील तांदळाचा खप गेल्या वर्षी-पेक्षाही कमी होईल, असा अंदाज आहे.

तांदळाच्या बाबतीत सरकारने हे जे 'उदार' धोरण स्वीकारले ते तात्पुरते न ठरो! अशी शंका येण्याचे कारण या उदार धोरणाचा उगम परिस्थितिजन्य आहे असे वाटते. गेल्या काही दिवसात डाळी व गोडे-तेल याचे भाव बेसुमार वाढले. खाद्यतेलाचे उत्पादन अपेक्षित जे ३२ लक्ष टन असा-वयाचे, ते २५ लक्ष टन झाले. त्यामुळे तुटवडा व म्हणून भाववाढ असे कारण सरकारने सांगितले ही तूट भरून काढण्यासाठी ७ लाख टन तेलाची आयात करण्यात आली. परंतु खाण्यास योग्य असे ते तेल नव्हते. म्हणून गिऱ्हाइकानी ते घेतले नाही. ते तेल वनस्पती उत्पादक गिरण्यांनी वापरून गोडेतेल जनते-साठी द्यावे, अशी सर्वत्र मागणी वाढली. त्यानुसार सरकारने वनस्पती उत्पादकाना गोडेतेल वापरण्यास बंदी केली आहे; परंतु गोडेतेलाचे भाव खाली येण्यासाठी देशातले भुईमूगाचे उत्पादन वाढविणे व अधिक जमीन या पिकाखाली येण्याच्या दृष्टीने पायलट योजना देशभर सुरू करणे आवश्यक आहे, ते चालू झाले आहे. डाळीच्या बाब-तीतही अधिक उत्पादन व्हावे यासाठी अधिक जमीन डाळीसाठी वापरली जाणे अवश्यमेव ठरते; परंतु अधिक पीक काढ-ल्याने शेतकऱ्याचा फायदा व्हावयास पाहिजे, म्हणून हरबऱ्याची खरेदीची आधार किंमत गेल्या वर्षी जी ९५ रु. क्विंटल होती, ती आता १२५ रु. क्विंटल करण्यात आली आहे. कारण सध्याच्या डाळीच्या बेसुमार भाववाढीचा लाखो रुपयाचा फायदा दलाल व व्यापारी यानीच लाटला. तो शेतकऱ्याला मिळालाच नाही. तेव्हा डाळी व भुईमूग या पिकांबाबत शेतकऱ्याला आशादायक परि-स्थिती उत्पन्न करण्यासाठी हरभऱ्याची खरेदीची किंमत वाढविणे व त्याचबरोबर तांदळावरची देशभरची बंधने रद्द करून शेतकऱ्याला जनता सरकारच्या उदार धोर-णाची जाणीव करून देणे, हा या घटनेचा एक अर्थ लावता येईल.

या घटनेला आणखी एक बाजू अशी की, सध्या सरकारजवळ अन्नधान्याचा साठा १ कोटी ९५ लक्ष टनाचा आहे. त्यापैकी ४५ टन तांदूळ आहे. म्हणजे या हंगामात तांदळाची लेव्ही वसुली जरी काटेकोर पद्धतीने झाली नाही तरी तांदळाचा तुटवडा सरकारी मान्यतेच्या धान्य दुकानांतून येत्या

वर्षात तरी जाणवणार नाही यासाठीच देशभरचे लेव्ही वसुलीचे ध्येय (अॅग्रि. प्राईस कमिशनने जरी ५० लक्ष टनाचे सुचविले असले तरी) सरकारने जाहीर केले नाही. सार्वजनिक वाटप व्यवस्था बद करून भागणार नाही. त्यासाठी लेव्हीपद्धतही हवी. म्हणजे 'एक व्यापारी' या नात्याने या क्षेत्रात सरकार जी भूमिका बजावीत आहे, ती सोडून देता येणार नाही. या व्यवस्थेमुळे खेड्यातल्या अगदी टोकाच्या गरीब माणसाला रास्त दराने अन्नधान्य पुरवठा करता येतो आणि खुल्या बाजारातील भावावरही नियंत्रण राहते. पुढील कोष्टकावरून गेल्या १२ वर्षांतील तादळाचे देशभरचे तादळाचे उत्पादन व लेव्हीची जमा ध्यानात येईल. (कोष्टक अ आणि ब पहा)

म्हणून 'एक व्यापारी' या नात्याने व सार्वजनिक कर्तव्य म्हणून ( Obligatory function) सरकार या क्षेत्रात आहे. ते काम अधिक निर्दोष पद्धतीने कसे पुढे चालविता येईल याचा सरकारने विचार करावा. केवळ तांदूळच नव्हे तर डाळी, गोडे तेल याबाबतही सरकारने याच लेव्ही पद्धतीचा व वितरणाचा विचार आताच करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी सार्वजनिक वाटपव्यवस्थेत वसुली, साठवण, वाहतूक, वितरण याचीही चोख व्यवस्था करण्यामागे सरकारने प्रयत्नपूर्वक लागावे. आज ठिकठिकाणी लाकडी फळ्या टाकून आणि वर ताडपत्र्या टाकून हजारो टन धान्य बेवारशी ठेवले आहे. याला 'व्यवस्था' म्हणत नाहीत. पूर्वीच्या सरकारने जे केले ते गेले जनता सरकारने नवी व्यवस्था तांतडीने अमलात आणावी.

साखरेचा १९७७–७८ चा गळीत हंगाम या महिन्यात सर्वत्र सुरू होईल. साखरेबाबत नव्या सरकारचे नवे धोरणही लवकरच जाहीर होईल. जसे भाताच्या व तादुळाच्या बाबतीत शेतकरी, जनता व व्यापारी या सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न जनता सरकारने केला तोच प्रयत्न साखरेबाबतही राहील असे दिसते. आज साखरव्यवहारात मर्यादित नियंत्रण आहे. साखर कारखान्यांनी ठराविक लेव्ही सरकारकडे ठरवून दिलेल्या भावात दिली म्हणजे उरलेली साखर खुल्या बाजारात साखर कारखाने विकू शकतात. सध्याच्या या पद्धतीला उत्पादक, कारखानदाराचा आक्षेप

**कोष्टक अ**
**विविध प्रांतातील तांदळाचे उत्पादन**
(आँकडे टक्केवारीचे)

| प्रांत | १९६४–६५ | १९७५–७६ |
|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १२·५ | १३·० |
| आसाम | ४·९ | ४·६ |
| बिहार | १२·६ | ९·८ |
| गुजराथ | १·२ | १·२ |
| पंजाब<br>हरयाना | १·७ | ४·२ |
| जम्मू-काश्मीर | ०·५ | ०·९ |
| कर्नाटक | ४·२ | ४·७ |
| केरळ | २·९ | २·७ |
| मध्यप्रदेश | ८·९ | ७·८ |
| महाराष्ट्र | ३·८ | ४·५ |
| ओरिसा | ११·३ | ९·२ |
| राजस्थान | ०·३ | ०·५ |
| तामीळनाडू | १०·४ | ११·९ |
| उत्तर प्रदेश | ८·५ | ८·८ |
| पश्चिम बगाल | १४·८ | १३·७ |
| इतर | १·५ | २·४ |
| संपूर्ण भारत | १००·० | १००·० |

आधार : Government of India, Bulletin of food statistics and Report of the Agricultural Price Commission.


नाही. फक्त उत्पादन व खप हे दोन्ही कसे वाढतील याचीच त्यांना चिंता आहे. त्यामुळे ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला अधिक भाव देण्यात अडचण पडणार नाही; परंतु या पद्धतीबाबत साखरेचा व्यापारीवर्ग कुरकूर करताना दिसतो. मुंबईच्या बड्या साखर व्यापाऱ्यांना संपूर्ण साखर विनियंत्रित हवी. लेव्ही पद्धतीने वसूल केलेली साखर सार्वजनिक वाटपव्यवस्थेमार्फत सरकारने रास्त भावात विकणे व खुली साखर व्यापाऱ्यानी अधिक ( दुप्पट ? ) भावाने खुल्या बाजारात विकणे, अशी दुहेरी बाजारव्यवस्था ( Dual market mechanisom ) त्याना नको. कारण त्यामुळे मक्तेदारी पद्धतीने 'आम्ही म्हणू तो भाव' हा प्रकार करण्यात व्यापाऱ्यांना अडचण येते. त्यांचे म्हणणे, या नियंत्रण पद्धतीने खप कमी होतो.

**कोष्टक ब**
**विविध प्रांतातील तांदुळाची लेव्ही (जमा)**
( आकडे टक्केवारीचे )

| प्रांत | १९६४–६५ | १९७५–७६ |
|---|---|---|
| आंध्रप्रदेश | २३·२ | २१·९ |
| आसाम | २·४ | ३·८ |
| बिहार | १·२ | १·० |
| गुजरात | १·१ | ०·४ |
| पंजाब<br>हरियाणा | ९·८ | २७·५ |
| जम्मू-काश्मीर | ०·६ | ०·७ |
| कर्नाटक | ३·१ | २·९ |
| केरळ | १·२ | ०·५ |
| मध्यप्रदेश | १५·० | ४·४ |
| महाराष्ट्र | ४·६ | ०·९ |
| ओरिसा | ८·४ | ३·६ |
| राजस्थान | – | ०·४ |
| तामीळनाडू | १३·? | १४·५ |
| उत्तरप्रदेश | ४·७ | १२·४ |
| प. बगाल | ११·६ | ४·८ |
| इतर | – | ०·३ |
| संपूर्ण भारत | १००·०० | १००·०० |

संदर्भ.– Govt. of India, Bulletin of food Statistics & Reports of APC.

( वार्षिक ३·५ ते ३·७ दशलक्ष टांनपर्यंत फक्त ) भारतात माणशी साखरेचा खप वर्षाला केवळ ६ किलो आहे. गेली ३ वर्षे हे प्रमाण कायम राहिले आहे. अमेरिका, जपान, इंग्लंड या देशात साखरेचा माणशी वार्षिक खप १२ किलो आहे. खप वाढला नाही तर उत्पादन साचून राहते व कोटयवधी रुपयाचे भाडवल अडकून पडते. शेतकऱ्याला वेळेवर पैसे पोचते झाले नाहीत तर आर्थिक चलन थांबते. तेव्हा खप वाढविण्यासाठी विनियंत्रण हवे असे व्यापारी म्हणतात. मला वाटते एक्साईज ड्युटी कमी केली तर खुली साखर स्वस्त होईल व खप वाढेल. त्यासाठी आहे ते मर्यादित नियंत्रण रद्द करण्याचे कारण नाही. □



# ज्युनिअस एक स्वातंत्र्यरक्षक

ॲडव्होकेट पु. ल इनामदार

'संपूर्ण प्रभुत्वसंपन्न लोकतांत्रिक गणराज्य' म्हणून प्रभावशील झालेले भारतीय राष्ट्राचे संविधान दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आले. हे संविधान २६ जानेवारी ५० च्या अगोदर व दिनांक १५ ऑगस्ट १९४७ च्यानंतर स्वतंत्र भारताच्या तत्कालीन शासनाने निर्माण केलेल्या 'घटना समिती'ने बनविले होते व ही समिती त्या वेळी भारतात कार्यरत असलेल्या एकूणएक राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची तसेच अनेक अपक्ष हितसंबंधियांची व अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींचीही अशी, सर्वंकष व सर्वव्यापी हितसंरक्षणाचा उच्च आदर्श समोर ठेवून बनविली होती आणि त्यात भारतातले प्रगाढ विद्वान व घटनातज्ज्ञ समाविष्ट झाले होते. घटनासमितीचे अध्यक्षपद स्वर्गीय राजेंद्रप्रसादजींसारख्या निरलस साधुवृत्तीच्या विद्वान कायदेपंडितानी भूषविले होते व तत्कालीन शासनाचे विधिमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या दलितवर्गाचे हितसंबंध मानवतावादाच्या भूमिकेवरून सुधारू पाहणाऱ्या नेतृत्वाखाली घटनासमितीचे कार्यसंचालन झाले होते. साऱ्या जगतातील आजी व माजी संविधानांचे प्रगाढ आलोकन करून व सर्वंकष व्यक्तिस्वातंत्र्याचा ठणठणीतपणे उद्घोष करून ह्या संविधानाची रचना झाली आहे व त्याला मानवाच्या इतिहासात तोड नाही, असे अभिमानाने म्हणता येते. असे संविधान घटना समितीच्या सगळ्या सदस्यांनी एकमताने स्वीकार करावे, असे पसायदान मागताना स्वर्गीय बाबाहेब आंबेडकर म्हणाले होते की, हे संविधान सर्वांगीण हितसंबंधांचे यथोचित संरक्षण करणारे व व्यक्तिस्वातंत्र्याला शिरोधार्य मानून भारतीय नागरिकांना लोकशाही शासनाचे वरदान देणारे बनले आहे. तरी पण या संविधानाची बूज 'शेवटी जे शासक या संविधानाचे संचालन करतील त्यांनीच राखावयाची आहे. सुवासिक व सुंदर पुष्प कोणत्या कामासाठी वापरले जाईल त्यावर त्या पुष्पाचे शुचित्व-सौंदर्य अवलंबून राहते. तसेच संविधानाला जे शासक राबवितील त्यांच्या योग्यतेवर–प्रामाणिकतेवरच या संविधानाची योग्यता टिकून राहील......' इत्यादी.

भारतीय संविधानाची बैठक अधिकतः इंग्लंडच्या राजाच्या नावानं संसदीय लोकशाही राबविणाऱ्या प्रजातांत्रिक संविधानासारखी आहे व इंग्लंडच्या संसदेमध्ये जी लोकशाही तत्त्वे विकसित झाली, ज्या लोकशाही प्रथा रुजविल्या गेल्या, लोकशाही शासन कह्यात ठेवण्यासाठी जे अडसर आवश्यक वाटून वापरले गेले त्या सर्वांचा देश-काल-परिस्थितीनुसार विचार करून आवश्यक बदलासहित त्या सर्वांचा अंगीकार भारतीय संविधानात करण्यात आला आहे.

अशा उदात्त, उन्नत विचारांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा व लोकतांत्रिक गणराज्याचा धर्मग्रंथ झालेले आमचे भारतीय संविधान नुकतेच लोकशाहीचे मारेकरी होऊ पाहणाऱ्या राजकीय पक्षनेत्यांच्या हातात सापडले होते व त्या सत्ताधीश नेत्यांनी भारतीय गणराज्याची मूसच फोडून टाकून हुकुमशाहीचा पाया भरण्यासाठी न्यायालयीन संरक्षण खच्ची करून व निर्वाचन प्रक्रियेला पक्षपाती बनवून एकाधिकारी कायम करण्याचा डाव रचला होता. भारतवासीयांच्या भाग्याने या संविधानाच्या मारेकऱ्यांना सत्तेच्या गादीवरून खाली ओढण्यासाठी जनतेचा रुद्र खडबडून उठला व त्याने जवळजवळ सगळे मत्त-प्रमत्त-उन्मत्त नेते धुळीला मिळविले. अपवादात्मक रीतीने काही वाचले ते सगळे दुतोंडी, ढोंगी, तारेवरची कसरत करणारे व संधिसाधू, स्वार्थपूजक होते.

भारतीय संविधानाच्या प्रत्येत अडीअडचणीच्या वेळी अथवा आणीबाणीच्या वेळी साहजिकच अशा परिस्थितीत ब्रिटिश विचारवंत लोकांनी काय म्हटले होते – काय केले होते, हे पाहणे भारतीय नागरिकांसाठी हितकर ठरते–ठरावेही. लोकशाही राज्याचे संविधान राबविणारे शासक, मतदात्या नागरिकांचे निर्वाचित प्रतिनिधी, कायदेकानू बनविणारी संसद व संविधानाने निर्माण केलेली न्यायपीठे या सगळ्यांनी सर्वसामान्य नागरिकांचे मूलभूत व सामान्य अधिकार जपण्यासाठी कोणकोणती पथ्ये कसकशी सांभाळायला हवीत यांचा विचार इंग्लंडमध्ये नेहमीच होत राहिला व अजूनही होत असतो. यामुळेच आपणास अशा विचारांचे स्मरण करणे, त्यांचे गंभीर मनन करणे अतिशय आवश्यक व प्रेरक होते.

याच संदर्भात एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी अवध राज्यांच्या नवाबांवर व आणखी इतरही अत्याचार करणाऱ्या भारताच्या गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज विरुद्ध इंग्लंडच्या पार्लमेन्ट–संसदेमध्ये एक महत्त्वाचा अभियोग चालविला गेला होता व त्या वेळी एक संसद सदस्य म्हणून एडमंडबर्क यांनी अशा अभियोगातल्या अभिभाषणांची किती एक उत्कृष्ट उदाहरणे आपणा सर्वांसाठी ठेविली आहेत. त्यांच्या अशा अजरामर अभिभाषणातले काही विचार पुनःपुन्हा मनन करण्यासारखे आहेत. त्यांनी म्हटले होते, 'कायदा आणि

अनिर्बंध अधिकार यांचे संबंध नेहमीच अहि-नकुलवत असतात. कुणाही व्यक्तीला अनिर्बंध अधिकार आहे असे म्हणणे 'वदतो-व्याघात:' आहे लोकतांत्रिक नीतीचा क्रूर विपर्यास आहे. न्यायाधीशाचे नियमन न्यायदानाच्या नियमानी होते. विधिनियमानीही ते बांधलेले असतात. स्वत:ची मनगटे चावत बसण्याची वेळ आली तरी कोणाही व्यक्तीने हे कधीही विसरू नये की ती स्वत: विधिनियमानी बांधलेली आहे' आणि जो कोणी विधिनियमाच्या बांधिलकीऐवजी स्वत:च्या लहरीला–स्वेच्छेला कौल लावू पाहील तो *विधात्याचाच मारेकरी आहे, अशा जलाल शब्दात* बर्क यांनी वॉरन हेस्टिंग्ज याच्या अनिर्बंध वागण्याचा धिक्कार केला होता.

## सर फिलिप्स फ्रॅन्सिस

परंतु त्याचे अगोदरही अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमधे एक अतिविलक्षण व्यक्ती होऊन गेली. ती व्यक्ती आजतागायत 'ज्यूनिअस' या टोपण नावाने प्रसिद्ध आहे. ही व्यक्ती वास्तविक कोण होती याची माहिती अजूनही स्पष्टपणे निश्चित झाली नाही, तरी पण हळूहळू जी माहिती उजेडात आली त्या आधारावर ही विलक्षण व्यक्ती म्हणजे इंग्लंडचे त्यावेळचे उमराव 'सर फिलिप फ्रॅन्सिस' असावेत असे ऑक्सफर्ड शब्दकोषामध्ये रीतसर नमूद झाले आहे. हे उमराव इसवी सन १७४० ते १८१८ पर्यंत जीवन जगले. ते ब्रिटिश शासनयंत्रणेमधले एक कुशल अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते; परंतु त्यांच्या अंगामध्ये शाही उमरावी रक्त वहात असले तरी त्यांची इंग्लंडच्या प्रजातांत्रिक संसदीय पद्धतीविषयीची तळमळ म्हणजे ज्वलंत आग होती असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. इंग्लंडच्या राजाकडून, पार्लमेन्ट-संसदेच्या मध्याकडून अथवा निर्वाचित प्रतिनिधीकडून तसेच शासकीय अधिकाऱ्याकडून काही अवैध, प्रजातंत्राच्या विपरीत गैरवर्तन अथवा गैरव्यवहार होताच या 'सर फिलीप फ्रॅन्सिस' महोदयांना स्वस्थ बसवत नसे. स्वत: शासकीय अधिकारी असल्यामुळे त्याना उघडपणे शासनाविरुद्ध किंवा मंत्र्या-सदस्याविरुद्ध दंड ठोकून उभे रहाणे, काही बोलणे-लिहिणे उचित वाटले नाही. त्यांनी घेतलेला टोपणनावाचा बुरखा भीतोपोटी नव्हता, की-स्वार्थ सिद्धीकरिता नव्हता, की कुणाच्याही जखमेवर टोची मारू पाहणाऱ्या काकदृष्टीपायी नव्हता. तो केवळ स्वत. एक अंग असलेल्या शासकीय यंत्रणेची बूज राखण्यासाठी म्हणून होता आणि म्हणून त्याच्या टोपणनावाआडची व्यक्ती त्यावेळी कुणालाही माहीत होऊ शकली नाही, अजूनसुद्धा त्या विषयीची माहिती आडाखेवजाच आहे

या सर फिलिप फ्रॅन्सिस महोदयांनी 'ज्यूनिअस' हे टोपण नाव घेऊन त्यावेळच्या इंग्लंडच्या 'पब्लिक ॲडव्हरटायझर' नावाच्या वर्तमापत्रात घडलेल्या प्रसंगाचे निमित्त घेऊन संपादकाना पत्रे म्हणून अनेक लेख लिहिले या लेखाची भाषा अतिशय सौजन्यशील; परंतु भारी परखड-दाहक अशी आहे. या लेखामधले शालजोडीतले, बोचक, विदारक, गुदगुल्या करणारे, खाजवून सोडणारे प्रहार म्हणजे खुसखुशीत लेखनाचा आदर्शच आहे. अशा लेखाचे लक्ष्यविषय इंग्लंडचे राजे, उमराव, सरदार, शासनाचे प्रधानमंत्री व अन्य मंत्री, बडे बडे शासकीय अधिकारी तसेच अनेक राजकारणी नेते व प्रकाशनव्यवसायी नि न्यायाधीश मंडळीही असत. ज्यूनिअस महाशयांचे परखड शरसंधान सर्वांनाच सारखेच घायाळ करी, हे लिखाण इसवी सन १७५९ पासून १७६१ पर्यंत प्रकाशित होत राहिले व पुढे ज्यूनिअस महाशयांनी लिहिलेल्या या लेखाचे एक पुस्तकही इसवी सन १७७२ मध्ये प्रसिद्ध झाले.

या लेखातळे ज्यूनिअस महाशयाचे विचार म्हणजे प्रजातांत्रिक राजनीतीची व्यक्तिस्वातंत्र्याची, राजकारणाच्या शुचितेची, न्यायदानाच्या नि:पक्षतेची, प्रकाशन व्यवसायाची बोधगीताच आहे असे म्हणावयास हवे. 'माणूस'च्या वाचकासाठी त्यातली काही उदाहरणे *या लेखात* देत आहे.

संविधानाच्या मूलभूत अधिकारांविषयी ज्यूनिअस महाशय लिहितात– 'मी आपणास आग्रहाने आणि तळमळीने सांगतो की, राजकीय संविधानाच्या कोणत्याही अधिक्षेपाचा– अधिक्षेपाच्या आभासाचासुद्धा नेटाने विरोध केल्याशिवाय राहू नका. एक घटना घडते– तशीच दुसरी घडते– अश घटनांचा दाखला होतो– तो कायदाच बनू शकतो. काल घडलेली घटना आज धर्म-कर्म होऊन बसते. हानिकारक व्यवहाराचे समर्थन अधिकत: पूर्वीच्या उदाहरणानी करण्यात येते आणि रोखठोक उदाहरण मिळाले नाही की तुलनेने, रूपकाने त्यांचे समर्थन होते. लक्षात ठेवा की आपले राजनैतिक नागरिक स्वातंत्र्य संविधानामुळे मिळालेले आहे आणि म्हणून नागरिकस्वातंत्र्याचा अपहार म्हणजे संविधानाचोच गळेदाबी आहे मुक्त स्वातंत्र्य हे संविधानाचे जीवन आहे.'

वर्तमानपत्राच्या प्रकाशनस्वातंत्र्याविषयी ज्यूनिअस महाशय म्हणतात– 'वर्तमानपत्राचे प्रकाशनस्वातंत्र्य हीच आपल्या सगळया सामाजिक, राजनैतिक आणि धार्मिक अधिकाराचीही आधारशिला आहे हे आपण स्वत:च्या हृदयात, आपल्या मुलाबाळांच्या मनावरही ठसवून ठेवावे असे माझे सांगणे आहे.'

जेव्हा ब्रिटिश संसदेचे सर्वैधनिक अधिकार हे अत्युच्च सार्वभौम अधिकार आहेत असे पुन्हा पुन्हा म्हटले जाई, त्यावेळी ज्यूनिअस महाशय म्हणाले होते–

'विधानसभा संसद हे अत्युच्च अधिकरण आहे असे आपण जेव्हा म्हणतो त्याचा अर्थ असा आहे की ते संविधानामध्ये अभिप्रेत अत्युच्च अधिकरण आहे आणि ते शासनव्यवस्थेमधल्या अन्य कनिष्ठ वैधानिक अधिकरणांच्या तुलनेने अत्युच्च आहे. या अर्थाने 'अत्युच्च' उपाधी सापेक्ष आहे, स्वयसिद्ध नव्हे. विधानसभेचे-संसदेचे अधिकार नियमित आहेत– सर्वसाधारणत: निर्भेळ न्यायाविषयीच्या किंवा 'बहुजन हिताय' असणाऱ्या विधिनियमानुसार नियमित आहेत एवढेच नव्हे तर आपल्या संविधानाच्या तत्त्वानुसार तसेच व्यवहारानुसार ते तसे नियमित आहेत.'

संसदेचे अधिकारस्वातंत्र्याची जपणूक करण्यासाठी जसे उपयोगी पडतील तसे ते नागरी स्वातंत्र्याचे अपहरण करण्यासाठी, त्याना खच्ची करण्यासाठीही वापरले जातील, याची ज्यूनिअस महाशयाना जाणीव होती. या संदर्भात ते म्हणतात–

'संसदेचे विशेषाधिकार, मी 'ज्यूनिअस' म्हणतो त्याहून अधिक कोणी वाढवू पाहील तर त्याला सामान्य जनतेचे हित साधावयाचे नाही अथवा तो काय म्हणत आहे हे त्याचे त्यालाच कळत नाही असे म्हणावयास हवे, इंग्लिश राष्ट्राचे शासन हे कायद्याचे शासन आहे.

संसदेच्या अधिकाराचा गैरवापर होणारच नाही.' असे अभिप्रेत धरून जर आपण कुणा व्यक्तीला, अथवा कुणा माणसाच्या व्यवहारामध्ये त्याला 'सद्सद्विवेकाने वागण्याचे अधिकार' नागरिकांच्या जीवनविषयक, स्वातंत्र्यविषयक अथवा भाग्यविषयक अधिकारांच्या ऐवजी म्हणून देऊ लागलो तर ते इंग्लिश राजनितीशास्त्राची सगळी व्यवस्थाच उन्मळून टाकणारे ठरेल. आपल्या कायदाकानूच्या आशयांच्या विपरीत होईल, ते आपली आपण वंचना करणे होईल.'

हे सर्व इसवी सन १७७१ मध्ये लिहिले गेले आहे हे लक्षात घ्यावयास हवे!

ज्युनिअस महाशयांनी त्यापूर्वीही म्हटले होते की, 'हे काही राजाने दिवसाढवळ्या झोडले, राजमंत्र्याने बेदरकारपणे स्पष्ट नियमबाह्य किंवा आडून नियमबाह्य वर्तन केले असे म्हणण्यासारखे नाही. कारण अशा वेळी राजाविरुद्ध किंवा राजमंत्र्याविरुद्ध जनता धसका घेऊन बसेल आणि असे सगळे धसका घेतलेले एकत्र होऊन त्यांना विरोधही करतील. आपल्या नागरिक किंवा राजनैतिक स्वातंत्र्याच्या आशयालाच नख लावण्यासाठी संसदेच्या अधिकाराचा गैरवापर केल्याशिवाय आपणाला खऱ्या अर्थाने धोका नसतो. संसदेवर सोपविलेल्या अधिकाराचा अधिक्षेप करून शासनव्यवस्थेची नवनवी तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी संसदेने कार्यवाही केल्याशिवाय तसेच सार्वमताने त्यांना उपलब्ध करून दिलेल्या प्रक्रियांचाच उपयोग संविधानाच्या पोटात सुरा खुपसण्यासाठी केल्याशिवाय खऱ्या अर्थाने तसा धोका नसतो.'

## 'बद्ध' न्यायाधीश

ज्युनिअस महाशय न्यायाधिशांनाही ओळखून होते. अप्रामाणिक न्यायाधीश जेथे शासनाचे हित धोक्यात येणार नसेल तेथे सर्वसाधारण न्यायनिवाड्यामध्ये काटेकोर शिस्तीने निर्णय करतात, हे त्यांना माहीत होते. ते म्हणतात, 'सामान्य जनतेच्या खाजगी अधिकाराबद्दल किंवा नुकसानीबद्दल योग्य तो न्यायनिवाडा करणे एवढ्यानेच न्यायदान संपत नाही किंवा न्यायाधीशमंडळी भ्रष्टाचाराच्या मोहापासून अलिप्त असतातच असे नाही. जेफ्रिस (एक न्यायाधीश) स्वतः न्यायपीठाचे हित जर त्यात गुतलेले नसेल तर मोठा स्वच्छ न्यायी न्यायाधीश होता. (mr. Will Honeycomb was a gentleman whereever women were not concerned म्हणण्यासारखेच!) न्यायिक अधिकारी आणखी एका प्रकारच्या पक्षपाताने लिप्त असू शकतो. असा पक्षपात गंभीर ठरतो आणि तो फार गर्ह्यही असतो. कारण त्यामुळे व्यक्तिविशेषाच्या हितसंबंधापलीकडे जाऊन त्याने साऱ्या समाजावरच परिणाम होतो. शासकाच्या आहारी गेलेला न्यायाधीश व्यक्तिविशेषाचे न्यायनिवाडे काटेकोरपणे, योग्य रीतीने करण्याइतका प्रामाणिक असतो. तरी तो सर्वसाधारण जनतेचा विश्वासघातच करीत असतो. न्यायाधिशासमोर आलेला दावेदार शासकांच्या नाराजीचा विषय झालेला असला तर मात्र हे न्यायाधीशमहोदय आपले सगळे इमान बाजूला सारण्यास तयार होतात. आपल्या न्यायपीठाच्या पावित्र्यावर शितोडा येऊ देण्यासाठीही ते तयार होतात. जेव्हा जेव्हा एखादा स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीवर अवलंबून असणारा प्रश्न न्यायाधिशासमोर येतो तेव्हा त्यांचा निर्णय शासकाना अनुकूल करण्यास किंवा स्वतः न्यायाधीशमहोदयांचे हेवे-दावे उगवून घेण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत.' आदेशित न्यायाधिशांचे यापेक्षा अधिक बोलके व वास्तवचित्र कुणी कधी काढले नसेल!

स्वतःची तुमडी भरण्यासाठी आपल्या वकिली विद्येचा दुरुपयोग करणाऱ्या वकिलांबद्दल लिहितानाही हे ज्युनिअस महाशय अतिकठोरपणे लिहून गेले आहेत. 'इंग्लंडच्या राजनीतिधर्मशास्त्रामधे सर वुइल्यम ब्लॅकस्टोन महाशयांनी—लॉज ऑफ इंग्लंड—इग्लिश कायद्यावर फार मौलिक टीका लिहिल्या आहेत. पण अशा सर वुइल्यम साहेबानी जेव्हा मिडलसेक्स मतदार संघातर्फे निवडून आलेल्या 'विल्क' नावाच्या सदस्याला हाउस ऑफ कॉमन्समधून हाकलून लावण्यात आले त्या वेळी शासनाने त्या जागेवर 'लुटरेल' नावाच्या नागरिकाचे नामाकन-नॉमिनेशन-केले व अशा बेकायदेशीर नामांकनाचा पाठपुरावा सर वुइल्यम ब्लॅकस्टन महोदयानी शासनाचे सॉलिसिटर जनरल म्हणून केला. ज्युनिअस महाशयाच्या मते असे नामांकन 'निर्वाचित प्रतिनिधीचे शासन' या तत्त्वावर 'मूले कुठारः' असे होते आणि त्यानी अतिशय जळजळीत शब्दात सर वुइल्यम ब्लॅकस्टोन महोदयाचे वाभाडे काढले होते. त्यानी लिहिले, 'डॉक्टर ब्लॅकस्टोन हे इग्लंडच्या राणीचे सॉलिसिटर जनरल आहेत. 'आपले पद आपण साभाळावयास हवे' हे त्याना आठवले असावे पण यापायी ते आपली सगळी कीर्ती घालवून बसणार आहेत याचे भान त्याना राहिले नाही. आता आपल्या सुदैवाने डॉक्टरमहोदयाची तत्त्वे आणि त्याचे लेख वाचावयास मिळतात. आणि सत्याचा किंवा कायद्याचा किंवा सद्विवेकबुद्धीचा कुणाला पाठपुरावा करायचा असेल तर त्याने डॉक्टरमहोदयाचे लेख किंवा त्यांची पुस्तके यामधून आधार शोधावेत. पण जर का कुणाला आपल्या शेजाऱ्याची संपत्ती गिळकृत करावयाची असेल अथवा आपल्या देशाचे अधिकार खच्ची करावयाचे असतील तर त्याने खुद्द डॉक्टरमहोदयांचाच परामर्श खुशाल घ्यावा— तसे करायला लाजू नये!'

हा प्रहार व्यक्तिगत होता, आणि ज्युनिअस महाशयांच्या बोचक लेखणीसाठीही जरा अधिकच झाला होता. याबद्दल त्यांच्यावर आक्षेप उठताच, त्याला उत्तर म्हणून ज्युनिअस महोदयानी कवी व व्यंगटीकाकार अलेक्झाण्डर पोप याने डॉक्टर आरबथनॉटला लिहिलेल्या पत्राकडे बोट दाखविले. त्या पत्रात कवी पोपने लिहिले होते की, 'व्यसनांची तत्वचर्चा करताना व्यसनाधीन माणसाना वगळून त्या व्यसनाची मोघम—हवेत—चर्चा करणे हा, खरे म्हणायचे तर युद्धाचा एक सोपासा प्रकार आहे. पण ते 'सावल्यांशी युद्ध' करण्यासारखे आहे. मला स्वतःला जर सर्वात कशाने फार बरे वाटले असेल तर ते हे बघून की, ज्यांच्यामधे शरमेचे नावसुद्धा नाही, ज्यांना इतर कशाचीच भीती वाटत नाही अशा मंडळीनाच माझ्या उपहासगर्भ लिहिण्याने झिणझिण्या येतात.'

ज्युनिअस महाशयाचे उपहासगर्भ लेखन कवी पोपच्या लिहिण्यावरही कडी करणारे होते. हा नमुनाच पाहावा. ग्राफ्टनचे ड्यूक याना उद्देशून लिहिताना ज्युनिअस महाशयांनी लिहिले, 'आपल्या नावाजलेल्या पूर्वजांच्या कीर्तीमुळे त्याच्या काही वारसदारांना कुलाचार भ्रष्ट न म्हणवताही मनःपूतपणे कुलमर्यादेचा अतिक्रम करणे, वाटेल तसा पापाचार करणे शक्य होते. आपल्या पूर्वजानी तर

सद्गुणाचे असे काही अडचणीत आणणारे आदर्श आपल्या औरस वारसामध्ये दिलेच नाहीत आणि आपल्या पूर्वजानी एकही चागला गुण आपला अपमान करण्यासाठी अथवा आपणास कानपिचक्या देण्यासाठी उत्तराधिकारामध्ये आपणास ठेवलाच नाही; याबद्दल आपण आपल्या पूर्वजांचे आभारीच राहावे. आपल्या कुळवंतपणाची साक्ष म्हणून आपणास, महाराज, लग्नाच्या औरस संततीचा दाखला म्हणून अथवा कुळाच्या कीर्तीचा त्रासदायक होणारा वारसा म्हणून काहीच मिळाले नाही, हे किती बरे झाले ! एखाद्या कुटुबामध्ये अशी काही आनुवांशिक लक्षणे असतात की त्यावरून मानववंशातली अतिनिंद्य लक्षणे त्या कुटुबात ओळखता येतात. पहिला चार्लस राजा वंचकी जीवन जगला आणि वंचक म्हणूनच मारला गेला. दुसरा चार्लस राजा जरा वेगळ्या प्रकारचा ढोंगी होता आणि त्याचे मुडकेही त्याच वधाशिळेवर कापले जायला हवे होते. आता पुरे एक शतक उलटल्यावर त्या दोघांचे दोन वेगवेगळे गुणविशेष, सुदैवाने त्यांचे एकजीव मिश्रण होऊन महाराज, आपणामध्ये अवतरले आहेत. धार्मिक नसूनही रुक्ष, कठोर, मौजमजेची वृत्ती नसूनही दुराचारी राहून आपण दुसऱ्या चार्लस राजासारखे जीवन जगत आहात. पण आपणामध्ये त्याचे सुशील सौहार्द नाही. आणि मला तर वाटते की, त्याच्या पित्यासारखाच ( पहिल्या चार्लस राजासारखा ) आपलाही हौतात्म्य न मिळता वध होऊ शकेल !'

### हुकुमशहा आणि पश्चात्ताप

हुकूमशहाही चुका करू शकतात व आपला सर्वनाश ओढवून घेऊ शकतात. ध्येयलक्ष्य गाठण्याचे आव्हान स्वीकारण्यासाठी त्यांची समज अपुरी पडू शकते नि परिणामी त्यांना पूर्ण अपयश पत्करावे लागते. ज्यूनिअस महाशयानी अशाही एका 'शहा'चे लक्षण-वर्णन सांगितले होते. त्यानी एका लेखात लिहिले—'निसर्गाने जर आपणास आपल्या अंत:करणाच्या इच्छा आणि आकांक्षाच्या बरोबरीने तितका विवेकही दिला असता तर कदाचित त्यामुळे आपण स्वतंत्र नागरिकाचा सर्वनाश सिद्ध करू शकणारे भीषणमंत्री बनू शकला असतात. जेथे लाज, शरम नावालाही नव्हती, की विवेकबुद्धीची टोचणी नव्हती, की मंत्र्याच्या छक्कपटी व्यवहाराबद्दल दंडन्यायसभाही नव्हती, आणि जेथे त्या मंत्र्याकडून कमकुवतपणामुळे चुकीचे पाऊल उचलले अशी आशाही निवारा द्यायला नव्हती, तेथे जनतेने आपल्या दुर्दैवाला बोल लावायला पुष्कळ कारणे होती. आपण आपल्या नियतीचे असीम ऋणच मानू या की, कधी कधी अंत:करणाचा अध:पात पूर्णतया नारकीय असतो, आणि त्याबरोबरच त्याच्या बुद्धीचा पूर्ण भ्रमही झालेला असतो आणि त्यामुळेच त्यांच्या आवडत्या इच्छा-आकांक्षाच्या विपरीत त्याचे वागणे होते. आणि तो बेरकी न राहता विश्वासघात करू शकतो, किंवा कुणालाही न फसवू शकणारे ढोंग करू शकतो ! '

कुणाही 'शहा'ला धूळ चारणे शक्य होते ते अशाच काही रीतीने, हे आपण नुकतेच पाहिले आहे एरवी 'शहा' मजकूर निवडणूक बोलाविण्याची चूक करते ना !

चीत झालेल्या बलदंडासाठीच अशी एक चेतावणी ज्यूनिअस महाशयानी दिली होती. त्यानी लिहून ठेवले की, 'तुम्ही तुमच्या घातक सल्लागारांबरोबर आपले हितसंबंध निंद्यपणे, एकात्मतेचे करून घेतलेत आणि त्यासाठी नेकीच्या माणसाने ज्याची स्पृहा करावी, अशा सर्व गोष्टींना तुम्ही तिलांजली दिलीत आणि अशा घातक सल्लागारांनी तुमच्या तरुणपणामधल्या स्वैराचाराला जसा उभारा दिला, तसेच आता तुमच्या प्रौढपणातल्या दुष्कृत्यानीही उचलून धरण्याइतके ते अजून नीच आहेत. त्यांना विनयशील रीतीभातीची माहिती नाही, की सदाचाराच्या नियम-प्रथांची त्यांना ओळख नाही. ते तुम्हाला अनुभवाने येणारा शहाणपणा शिकवणार नाहीत, की व्यक्तिमत्त्वाचे अनौचित्य ओळखू देणार नाहीत. अजूनही ते तुम्हाला सांगत आहेत की, जीवन हे रंगभूमीवरच्या देखाव्यासारखे आहे आणि रंगमंचावर आलेल्या नायकाने आपली टीप शेवटपर्यंत सारखी उचलून धरावयास हवी आणि म्हणून तुम्ही जसे गुणविहीन जीवन जगला आहात, तसेच पश्चात्तापाचे नावही न घेता तुमचा शेवट होणार आहे ! '

हुकुमशहाच्या अंतिम नियतीचे हे विदारक रूपदर्शन किती नेमके आहे ! इतिहासात आजवर कोणाही हुकुमशहाने आपला अध:पात झाल्यावर अनुभवाने शहाणपणाचा धडा शिकून स्वत:ला सुधारण्याचे एकही उदाहरण नाही ! □



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

पुस्तके

# जरीला

## मूर्तामधून अमूर्ताचा शोध

'हे ही गाव असंच गजबजेल. पुढे दुसऱ्या गावी एकाच जन्मात पुनर्जन्म भोगण्याच अद्‌भुत सुख ' ह्या 'पुनर्जन्म भोगण्याच्या सुखासाठी' चागदेव पाटील आता 'बिढार पाठीवर घेऊन, ' या, घाटाच्या पायथ्याशी असलेल्या गावात घुसलेला आहे. परत नवे रस्ते, लाबच लाब वाटा, नवी घर आणि नवी माणस ! आणि ह्यामुळे बदलणारे (निदान तशी शक्यता असलेले ) आपण स्वत: ! चागदेवाच्या, स्वत:ला जाणून घेण्याच्या धडपडीचा एक सुरेख आलेख नेमाडयानी 'बिढार' आणि 'जरीला' मध्ये रेखाटलेला आहे. ( अर्थात स्वतत्र कादबरी म्हणून 'जरीला' वाचता येईल; पण मग काही गोष्टी तर्कानेच जाणाव्या लागतील. कारण चागदेवाच्या जीवनदृष्टीचा धागा पाडुरंग सांगवीकरातही आहेच ! ) समाजात, जगात जगायचं तर ठेचा लागतात. आणि स्वत.ला ठेच लागल्याशिवाय शहाणपण येत नाही ! अनुभव स्वत चे स्वत.ला घ्यावे लागतात—पचवावे लागतात. स्वत.चं 'सत्त्व' शोधण्यासाठी अनुभव घेण हे पांडुरंगही करतोच ! फक्त हा अनुभव व्यक्त करण्याच्या पद्धतीत मात्र फरक पडतो. ( नेमाडयांच्या शैलीचा हा एक विशेष आहे की चांगदेवाची परिणत अवस्था त्याच्या भाषेतूनच समर्थपणे व्यक्त झालेली आहे. ) वाढत्या अनुभवानं येणारा शहाणपणा इथे दिसतो.

गोविंदा गुण्यांना भाजी आणून देतो, हे कळल्यावर तो त्याना चागलं म्हणतो ते त्याला पटत म्हणून, की अन्य कारणासाठी असा प्रश्न पाडुरंग लगेच विचारतो. कुठल्याही घटना—प्रसगावरच्या त्याच्या प्रतिक्रिया तात्काळ व्यक्त होत राहतात. किंवा बिढारा 'त वाङ्मयीनं जगातील दुष्प्रवृतीनं असणारा विरोध ही 'थागट' सारख्या 'लिटर्ल मॅगेझिन्स'च्या रूपातूनं अगावर येत राहतो. जीवनाचं सार्थक होत का हे बघण्यासाठी त्यात झोकून देणं, भुर्दंड सोसणं हे येतच. म्हणूनच जीवनाशी सबंध तोडू म्हटल्यान ते तोडता येत नाहीत. ते घट्ट बिलगलेले असतात. ( 'बिढार' पृष्ठ ९० ) याची बरीचशी जाणीव ह्या टप्प्यावर त्याला झालेली आहे. मग सुरक्षितता, स्थैर्यासाठी आटापिटा करून कुठलाही मार्ग पत्करणारे प्रधान किंवा नारायण चागदेवाच्या मनाला फारसे सतावत नाहीतं आणि म्हणून मग सगळच खराब समजून आनदान जगणं; दोन्ही टोकं भानावर राहून पाहणं हे 'जरीला'तील नव्या वसाहतीन, प्रत्यक्षात येतं.

### बदललेला चांगदेव

तसं म्हटल तर चागदेव इथे बराच रुळला वगैरे आहे 'आपण मित्र मिळवू शकतो' हेही आत्मज्ञान त्याला इथे झालेल आहे इथला गावढळपणाही त्याला आवडलेला आहे. शिकविण्याच्या धद्यात तो इतका रमलेला आहे, की 'बिढारा'तील अर्थपूर्ण दिवसच त्याला आता निरर्थक वाटतो आहे आणि फक्त 'शिकवणं' हेच खरं वाटतं आहे. विद्यार्थ्यांना तो आणि त्याला विद्यार्थी आवडताहेत. एकूण ( चागला ) प्रोफेसर म्हणून तो स्थिर झालेला आहे. खुटयावर उभ्या राहिलेल्या त्याला निदान हा एक घट्ट धागा तरी मिळालेला आहे. त्यामुळे फासार, जी. जी., माळी, कोल्हे यांचे आपापसातले झगडे, ( किंवा स्नेहही ) किंवा चांडकचा धदेवाजपणा, नामजोशाचा मुत्सद्दीपणा, शेख आणि कानिटकर यांच्यावर त्याच्या स्वत.च्या कॉमेंटस् नाहीत. ( य.सर्वांच्या एकमेकातच झुंजी लावून दिलेल्या आहेत. ) या सगळयांना चागदेव 'टॉलरन्स' करतो आहे ( accept करत नाही ) हा 'टॉलरेट' पांडुरंगात नाही ( तरुण वय ! ) आणि 'बिढारा'तही काही काही ठिकाणी 'हेरून खडे मारण' झालेलं आहे. इथे मात्र 'असं का ?' हे त्याला कळत आणि अखेर Systems arc responsiblc for com-, ments, not individuals हेही त्याला जाणवत. ह्या गोष्टी अटळ, किंवहुना एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आवश्यक असतात, हे ध्यानात आलं की तत्त्वांच्या फुग्यातली हवा फसकन् बेल्यागत वाटत.

मग खोटं समाधानही फार काळ टीकत नाही. कामासाठी बाई मिळावी म्हणून लग्न करायचं ? मनात नसताना डिपार्टमेंटच्या हेडशी गोड, गुळगुळीत बोलायच ? शिकविण्यासाठी फक्त एम्. ए. व्हावं लागतं. पण पुस्तकं वाचली नाहीत तर तरी चालत? कन्फर्मेशन, पैसा, लग्न ह्यातच जीवन कारणी लागत ? आपल्या फक्त 'असण्या'. मुळे भाडी घासणारी बाई सोडून जाते ? 'अस्तित्वा'ची प्रतिक्रिया इतकी तीव्र होते? एकूण उलटसुलट शंका असणं (आणि त्याही माळीसारख्या इतर अनेक वास्तवबाजांच्या सदर्भात) हे धोकेबाजच ! स्वत: असमाधान पदरात बाधून घ्यायचं आणि दुसऱ्याला विनभाडवली वैताग ! मग फक्त ह्या विसंगती फुटतात त्या विनोदातून—कारण बऱ्याच गोष्टी नकोशा वाटतात. नाकारता येत नाहीत.

चागदेव पाटील हा प्रचलित समाजव्यवस्थेचाच एक घटक असल्याने येणाऱ्या जबाबदाऱ्या तो नाकारत नाही. पण ही यंत्रणा माणसा—माणसातील स्पर्श तोडणारी असल्याच त्याला सामाजिक संस्थेतून जाणवतं. अशा परिस्थितीतच अस्सल जगायचं आहे. एकीकडे 'जवळीक' त्याला हवी आहे पण ठाकून—ठोकून बद्ध झालेली 'इंटिमसी' मातायला त्याचं मन तयार होत नाही. (अनीतीचा तपशील इथे येतो.) जिव्हाळयासाठी आसुसलेला चागदेव तशी नाती जोडायला असमर्थ ठरतो. मानवी सबंधातील धडपड, जिव्हाळयाची आस, तिची अतृप्ती, पुन्हा धडपड हे सारे मानवी व्यवहाराच्या नैसर्गिक प्रवाहीपणाने इथे व्यक्त होते. व्यक्ती

मन आणि प्रत्यक्ष जग यांच्या कचाट्यात ही निरागसता अडकलेली आहे. मग त्या निरागसतेला काही तात्पुरती उत्तरं मिळतात. ('शिकवण्या'ची गुरुकिल्ली!) मुळात चांगदेवाला 'टेलर संस्कृती' नको आहे, तोटे पत्करूनही तो गरीब शिंपीच हवा आहे. हा सगळा प्रसंगच मला फार अर्थपूर्ण वाटतो. सुधारणा हवी आहे पण निरागसताही हवी आहे. म्हणून तर पिसारे फुलवून नाचण्यातला फोलपणा जमेस धरूनही कुठेतरी एखादी छटा जिव्हारी लावणाऱ्या त्या प्रेमभावनेनं तो गलवलतो आहे. खालच्या जोडण्यावद्दल कुतूहल आणि ओढही वाटते आहे. (कादंबरीतील दिवस गेल्याचा गर्भारपणाचा आणि कोळयाच्या जाळयाचा सूचक उल्लेखही मागील कादंबऱ्यांशी सांधे जोडणारा आहे.) आदिवासीच नव्हे तर खोलीसकट आपण स्वतःही असेच वापरून घेतले जात असतो. जोपर्यंत आपलं तोंड बंद असतं तोवर सगळं सुखी असतं. आपल्याला वाचा फुटली की मग वाक्यं कमीजास्त होऊन एस्. जी. किंवा कुणावरोबरही संबंध. तुटणं हेच अपरिहार्य असतं. समाज नावाच्या एका उपयुक्त यंत्रातला स्क्रू–तो बिघडून कसा चालेल? पण सिसिफस 'होता' म्हणून त्याची शिक्षाही होती, हे कळल्यावर मग शिक्षेचही फार काही वाटेनासं होतं.

### अर्थपूर्ण तपशील

'जरीला'तील 'जत्रे'चा प्रसंग, त्याचा सर्वच्या सर्व तपशील मला या दृष्टीनं फार अर्थपूर्ण वाटतो. बहाद्दुर आणि जर्जर (ही दोन विशेषणं अर्थाच्या विरोधातून अनेक छटा स्पष्ट करणारी आहेत.) पोपटांचा शानदार खेळ, पेटत्या वर्तुळातून उडी मारणं, हौसेनं बघायला येणारी (पैसे देऊन) गर्दी आणि परत तेच तेच करणारे (तेवढ्याच उत्साहानं) ते खेळवाले, लढणं, थकणं नेहेमीचंच–किंचितही फरक नाही–तो होऊन चालणारही नाही. अखेर हा एक 'खेळ' आहे–तो 'खेळला' जाणार आणि 'खेळवला' ही जाणारच! इथे तक्रार करून चालणारच नाही, कारण खेळ 'पारतंत्र्या'त खेळला जातो आहे. याआधीचा, म्हातारीच्या धडपडीचा प्रसंगही केविलवाणेपण जास्तच गडद करतो आणि मग येणारा आरसेमहाल तो स्वतःलाच स्वतःची चित्रविचित्र रूपं दाखवून भावावून टाकतो: आपले रूप, अस्तित्व एकसंध, सुसंगत असतं? मन आणि शरीर एकरस झालेलं असतं?

एका काण्या माणसाच्या मनातून सेक्स, आणि इमोशन्सबद्दल वाटणारं सगळं, अवचत कशाचा तरी आधार घेऊन जागोजाग बाहेर फुटत जातं. धरमसी आणि काकांचं घर, ते 'गृहस्थपण, आदरातिथ्य' त्याला लोभस वाटतं; तिथली 'ओल' त्यालाही चिंब करून टाकते–भिजवते. (इथला तपशीलही महत्त्वाचा आहे,) आणि म्हणून मग संसाराच्या भिंती 'कृत्रिम' म्हणून जाणवल्या तरी त्यातून स्रवणारी ओलं चांगदेवाचं ठणठणीत कोरडेपण (विढार) नष्ट करून टाकते एक 'कारा' म्हणूनच आपल्यात हे सगळेजण रस घेताहेत, मदत करताहेत हेही त्याला कळतं. म्हणून तर त्याच्या व्यावहारिक, मानसिक गरजांच्या तृप्तीची तयार उत्तरंही त्याला देण्यासाठी हे सगळे उत्सुक आहेत. आता नेमाड्यांच्या कादंबरीत अनावश्यक तपशील असतात असं जर कुणी म्हणेल तर मग त्याला इलाज नाही. कारण तपशीलाला काहीतरी प्रयोजन आहे म्हणूनच येतो.तो.

नेमाड्यांच्या ह्या तिन्ही कादंबऱ्या कोणी शिकवून किंवा परीक्षणं वाचून समजत नसतात आणि आवडत तर नाहीतच. कारण त्या स्वतःच्या स्वतःलाच जाणवाव्या लागतात. रोमँटिसिझिम, रिॲलिझम किंवा ॲक्झिस्टेशिॲलिझम (हा तर फारच भयंकर शब्द आहे.) असे गुळीगुळीत शिक्के याच्यावर मारून रिकामं होणं हे काही खरं नाही. प्रत्येक मूर्त तपशिलातून अमूर्ताचा शोध घेत जाणारी नेमाड्याची शैली (निदान मला तरी) बेचैन करून टाकते. 'जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे' ह्या मर्ढेकरांच्या ओळीचा स्वर कमी–जास्त तीव्रतेने सतत जाणवत राहतो. अशा वेळेस ते वीस–पंचवीस हजार शब्द डोळयाखालून नुसते सरकत नाहीत अशी कादंबरी वाचणं–हादेखील एक अनुभव होतो. ('सफरीचं तपशीलवार वर्णन' अशाच जर ह्या कादंबऱ्या आहेत तर मग कोसलाचीच वाट पुशितु आलेल्या इतर लेखनकृतींनी सदानंद रेग्याना का प्रभावित केलं नाही? त्या मात्र आल्या आणि गेल्या आणि फक्त नेमाडेच का टिकले? कारण रेग्यांच्या लेखी नेमाड्यानीही विशेष काहीच केलेलं नाही! असो.)

'तर एकूण मराठी कादंबरीच्या क्षेत्रात ही वैशिष्ट्यपूर्ण वगैरे वगैरे तर आहेच, पण वेगळी वगैरे असून श्रेष्ठ आहे. (हे तर भलतंच!)' एकूण उदाहरणार्थ भाषेचा अभ्यास म्हणजे कुठं तरी, कशाचं तरी पोस्टमार्टेम करायचंच आणि मग कधी तरी हे आपल्याला उदाहरणार्थ इथं उभं करणारच, तर म्हटलं नेमकं अगोदरच इथं येऊन उभं राहू आणि एका थोर लेखकापासून सुरुवात, आरंभ वगैरे करू आणि संदर्भाची जास्तीत जास्त पडझड करणं, (किंवा दोष दाखवणं) म्हणजे एकीकडे आपल्या कमावण्यात भर घालणं. तर उदाहरणार्थ हे असं प्रकाशात येता येता कमावणं–कादबरीचं विच्छेदन करून पन्नासाना सौंदर्याकडे बोट करून ते दाखवणं आणि मग त्यानी 'अहाहा, अहाहा' करणं ह्यापेक्षा उदाहरणार्थ आणखी चूक–बरोबरचा हिशेब तरी काय करणार?'

**– रेखा इनामदार**

जरीला
लेखक : श्री. भालचंद्र नेमाडे
पॉप्युलर प्रकाशन, मुबई
पृष्ठे २५३, मूल्य २० रुपये.

---

# स्वरगंगेच्या तीरी

## एक सुखद अनुभव!

---

अगदी सरळ सरळ केळकरी भाषेत सागायचं म्हटलं तर 'स्वरगंगेच्या तीरी' हे जी. एन्. जोशीलिखित एका कलावंताचं पुस्तक, म्हटलं तर आत्मचरित्र आहे, म्हटलं तर नाही; म्हटलं तर लेखकाच्या सहवासात आलेल्या अनेकविध कलावंताचं कुठे ठळक तर कुठे अस्पष्ट असं दर्शन आहे, म्हटलं तर आयुष्यात आत्मसात केलेल्या एका छंदाचं, एका कलेचं – गायनकलेचं – ओझरतं वर्णन

आहे; आणि म्हटलं तर काही किस्से आहेत. *आणि म्हटलं तर ... पण जाऊ दे ...*'

...पण एक खरंच की, चरित्र वा आत्मचरित्र या साहित्य प्रकाराला स्पर्शून जाणारं एका कुटुंबवत्सल आणि सुसंस्कृत कलावंताच चित्रण लेखकानं या पुस्तकात केलं आहे.

या पुस्तकाच्या छोटेखानी प्रस्तावनेत लेखकान स्वतःच लिहून ठेवलंय की, 'हे आत्मचरित्र नाही. स्वत.चं चरित्र लिहिण्याइतकी पात्रता मी मिळविली आहे असं प्रामाणिकपणे मला वाटत नाही. सुमारे ४० वर्षे स्वरगंगेच्या पात्रात व किनाऱ्यावर मी मनसोक्त विहार केला आहे आणि मला प्रतिभासंपन्न व अलौकिक गुणी गंधर्व भेटले. त्यांच्या स्मृतीची नोंद या पानातून आढळेल.'

तेव्हा लेखकाला जाणवलेल्या मर्यादा लक्षात घेऊनच वाचकांनी या पुस्तकाकडे पाहाव हे बरं!

## कलावंतांचं संयमित जीवन

अलीकडे झालंय असं की, 'कुणाही एखाद्या कलावंताचं चरित्र वा आत्मचरित्र वाचायला सर्वसामान्य वाचक आणि खरं म्हणजे रसिक, चोखंदळ वाचकसुद्धा आसुसलेला असतो. कारण त्याला त्या कलावंताच्या कलेइतकच त्याच खासगी जीवन, त्यातल चढ-उतार, खाच-खळगे, अनिर्बंध आणि मुक्त आयुष्य, त्यातली लफडी, भानगडी, धुंद आणि बेहोष करणारी विषयासक्ती आणि व्यसनासक्ती' या साऱ्यांच मोठं आकर्षण असत. कारण हा विषय चघळायला बरा वाटतो-अशा अपेक्षेने पाहाणाऱ्या वाचकाची या पुस्तकानं मोठीच निराशा होईल हे पहिल्यादा सागितलेल बरं!

कारण लेखक घरंदाज आहे घराण्याला श्री आणि सरस्वतीचा वरदहस्त लाभला आहे. संस्कारक्षम आणि नैतिक मानवीमूल्यांची जोपासना करण्याचं भान सतत ठेवलेले आहे. आणि म्हणूनच मला हे पुस्तक या वेगळ्या कारणानं आवडलं आहे

चरित्रात वा आत्मचरित्रात जो एक अनावश्यक पाल्हाळपणा असतो त्याचा मागमूस इथं कुठही दिसत नाही. इतकच नव्हे तर टीका करावी इतक्या त्रोटकपणे आपलं बालपण, घराणं, गाण्याची आवड व साधना यासंबंधी पुस्तकाच्या पहिल्या भागात माहिती दिली आहे. या भागातील पहिली तीन प्रकरणं आणि त्यातल्या त्यात 'भावगीताकडून सिनेगीताकडे' हे तिसरं प्रकरण सर्वार्थानं सरस उतरलं आहे. ('ललित' दिवाळी अंकात यातला काही भाग पूर्वीच येऊन गेल्याच स्मरतं!) 'काही नवे प्रयोग' या लेखात गायनकलेचं मर्म सांगतानाच रेकॉर्डिंगच्या मर्यादा, त्यामुळं संगीताची व गायनाची झालेली कुचंबणा, त्यातले यशापयश याचा वृत्तान्त, या कलेच्या प्रांतात नव्यानं जाणाऱ्यांना मार्गदर्शन करील असा आहे.

## कलाकारांच्या सहवासात

या पुस्तकातला हा दुसरा भाग म्हणजे या पुस्तक-विषयाचा गाभा आहे. सुदैवाने लेखकाला सैगल, बडे गुलाम अली खाँ, सूरश्री केसरबाई केरकर, पंडित ओंकारनाथ ठाकूर, प. पलुस्कर, रविशंकर, बेगम अख्तर, थिरकवाँ, बिसमिल्ला खान, येहुदी-मेनूहिन, पं. भीमसेन जोशी यासारखे विख्यात कलावंत जवळून पाहता आले. काहीचा स्नेह जमला. त्यांच्या जीवनाचे, संगीत व्यासंगाचे, त्यांच्या आठवणीचे ओझरते दर्शन लेखकाने घडविले आहे. विशेषतः सैगल, नौशाद, बडे गुलाम अली खाँ, अमीर खाँ भीमसेन याचं विविधांगी जीवन आणि कलादर्शन लेखकानं कलात्मक जाण ठेऊन रेखाटल्यामुळं विलोभनीय वाटतात. इतर अनेक कलावंत उच्च श्रेणीचे असूनही केवळ 'हजेरी' पुरतेच समाविष्ट केल्याच जाणवतं. अत्यत अस्पष्ट, अपुरी अशी व्यक्तिचित्रणं एकूण पुस्तकाची शान घालवितात.

पुस्तकाच्या शेवटच्या भागात लेखकानं आपले गुरू गुणीदास-जगन्नाथबुवा पुरोहित याचं व्यक्तिचित्रण मात्र शिष्यान गुरूला वाहिलेल्या आदरांजलीसारखं भावनिक, स्पर्शून जाणार आणि संपूर्ण दर्शन घडविणार अस शब्दबद्ध केले आहे.

लेखक ज्या एच्. एम्. व्ही कंपनीत नोकरी करीत होते तिथले काही किस्से, अनुभव, आठवणी सागतात. त्यातही मोरारजीभाई देसाईंची आठवण लक्षात ठेवण्यासारखी आहे. (जाताजाता – त्यावेळच्या आणि आजच्या मोरारजींच्यातला बदलही जाणवणारा आहे. तसच मुखपृष्ठ आणि कलावंताची छायाचित्रं समाधान देतात, हे नमूद करणं अत्यावश्यक आहे.

'भैरवी' या अखेरच्या लेखात त्यांनी कालच्या, आजच्या, आणि उद्याच्या संगीतकलेचे चिंतन केलेले आहे. आणि त्यांना जाणवतं की, संगीताचा भविष्यकाळ घोर-दारुण निराशेचा आहे. त्याचं कारण उद्याच्या आणि काही अंशी आजच्या संगीतसाधनेत तपस्या उणी पडेल; साधनेत, गुरु-शिष्यसंबंधात कमतरता जाणवेल; आकाशवाणी, दूरदर्शन, सिनेमा आणि गतिमान जीवन, यांत्रिकीकरण यामुळं कलेला 'अवकळा' येईल त्यामुळं स्वरगंगेचा प्रवाह गढूळ होईल म्हणून ते खत व्यक्त करतात. साऱ्यांची उत्तर केवळ भविष्यकाळच देईल!

एक मात्र खरं, 'स्वरगंगेच्या तीरावरून' भटकताना निश्चित आनंद वाटेल पण प्रवाहात अवगाहन केल्याचं समाधान मिळेलच असं नाही!

**–प्रा. ग. भा. जोशी**

**स्वरगंगेच्या तीरी**

लेखक : श्री. जी. एन्. जोशी
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
पृष्ठे २०४, किं. २० रुपये.

---

## आमचे ग्रंथालय

# Life After Life

**By Raymond A Moody JR., M. D.**
**Bantam Books,**
**Pages 187, Rs. 10/-**

---

वरील पुस्तक श्री. एच. पी. मीरचंदानी यांनी इंडिया बुक हाउससाठी मुंबईत प्रकाशित केले. अर्थात बॅन्टम बुक्सच्या बर्नार्ड एडसन यांच्याशी करार करून त्याची ही भारतीय आवृत्ती छापली आहे. पुस्तकाचा टाईप फारच सुरेख आहे व दोन ओळीमधील अंतरसुद्धा पुरेसे आहे. त्यामुळे पुस्तक वाचताना डोळ्याला अजीबात त्रास होत नाही परदेशातून ओरिजिनल बॅन्टम आवृत्ती आयात केली असती तर किंमत निश्चितच २० रु. झाली असती भारतीय आवृत्त्या छापताना टाइप पुरेसा मोठा ठेवावा अशी मी पुन्हा एकदा त्या प्रकाशकांना विनती करतो. कारण कमला दासचे 'माय

स्टोरी' व वर्नस्टाइनचे 'फायनल डेज' या पुस्तकाच्या टाइपाबाबत आमच्या ग्रंथालयातील वाचकाच्या इतक्या तक्रारी आल्या की, शेवटी मला ही गोष्ट परत एकदा नमूद करावीशी वाटते. काही वाचक असेही म्हणाले की, या दोन पुस्तकाच्या किंमती अजून २-५ रुपयांनी जास्ती ठेवल्या असत्या तरी हरकत नव्हती; परतु पुस्तक वाचणाऱ्याच्या आनदाचे रूपातर डोळ्याच्या यातनेत होऊ नये. पुस्तके या ज्ञानाच्या खिडक्या आहेत. ती चागली व वाजवी किंमतीत छापणे हे सर्वांना हितकारक आहे. मी तर असे म्हणेन की, सरकारने पुस्तक छापण्यांच्या व्यवसायाला सबसिडी द्यावी. इंग्रजी पुस्तकांचे प्रकार इतके विविध असतात व कधीकधी ती इतकी माहितीपूर्ण असतात की, सध्याच्या भडकलेल्या किंमतीत त्याची आयात करण्यापेक्षा सरकारने सबसिडी देऊन त्यांच्या भारतीय आवृत्त्या काढल्या तर भारतातील सर्व भाषेतल्या साहित्यात मोलाची भर पडेल. केवळ विलायती किंवा परकीय म्हणून चांगले–असे मी इग्रजी पुस्तकांच्या बाबतीत म्हणत नाही. मराठीतसुद्धा काही उत्तमोत्तम पुस्तके आहेत. ययातीसारखे पुस्तक, जी. एं. च्या कथा वगैरे कित्येक उदाहरणे देता येतील. ती पण इग्रजीत किंवा अन्य भारतीय भाषेत भाषातरित करायला हवीत. साहित्य हे काही हस्तिदंताच्या मनोऱ्यात राहून समृद्ध होत नाही. साहित्याला समृद्ध व्हायला इतर भाषेतील साहित्याची गरज असते.

वरील पुस्तकाचे लेखक श्री. रेमंड ए. मुडी यानी मृत्युशय्येवरील शंभर लोकाचे सशोधन केले आहे या शंभर लोकाना 'क्लिनिकली डेड' असा शेरा डॉक्टराकडून मारण्यात आला होता; परतु काही गूढ व अगम्य कारणामुळे या व्यक्ती मृत्यूच्या जबडयातून बचावल्या होत्या.

डॉ. रेमंड ए. मुडी यांच्या संशोधनातून असा निष्कर्ष निघतो की, मृत्यूनंतर (आत्म्याचे) जीवन निश्चित आहे. मृत्यूबाबतीत आपल्या सर्वांच्या कल्पना विक्षिप्त असतात. बऱ्याच लोकाना असा प्रश्न पडतो की, मृत्यू हाच जर जन्माचा शेवट असतो तर माणूस जन्माला येतो तरी कशाला? माणसाच्या सर्व गोष्टीची परिणती शेवटी मृत्यूतच होणार असली तर एवढा आटापिटा का करावा? एवढे रक्त का आटवावे? खरंच काही लोक मृत्यूइच्छेने (death-wish) इतके पछाडलेले असतात की, मरण जर अटळ असेल तर आत्ताच, या घटकेला का आपल्या हाताने मृत्यूला कवटाळू नये, असा ते विचार करतात व या विचाराने हे दुर्दैवी लोक आत्महत्याही करतात. मी कुठे तरी एकदा असे वाचले होते की, 'A man (or woman) dies a little less if he leaves behind his chidren.' आपली मुले ही आपलेच दीर्घीकरण आहे, त्यामुळे आपल्याला अमरत्व लाभेल असा समज माणसाच्या सुप्त मनात असतो. एखाद्या जोडप्याला मुले नसली, तर त्यांना काय काय व्यथा होत असतील याची कल्पना यावरून येईल

मृत्यू जेव्हा सामोरा येतो तेव्हा काही लोक किंचाळतात, विथरतात, तर काही लोकाना विलक्षण शाततेचा अनुभव येतो. काहीना मृत्यू दाहक वाटतो, तर काहीना मोहक. आणखी काहीना तो एकाच वेळेला दाहक आणि मोहक वाटतो. मृत्यूनतर जीवन आहेच तर मग मृत्यूला भिण्याचे कारण नाही. 'वासासि जीर्णानि यथा विहाय.' परतु अल्बेर कामू व सार्त्रसारख्या अस्तित्ववादीसारखे मलाही असे वाटते की, आत्ताचे, जे आहे तेच जीवन महत्त्वाचे आहे पुढच्या जन्मी भलेही मी राजा होईन; पण पुढच्या जन्मासाठी मी या जन्मात कष्ट घेईन हे मला पटत नाही किंवा पुढच्या जन्मी मला या जन्मात केलेल्या श्रमाबद्दल फळ मिळेल याचीही पर्वा नाही.

### मृत्यू – एक सुप्त इच्छा !

माणसाच्या मनाची स्वयचलित यत्रणाच (defence mechanism) अशी आहे की, कुणी अपघातात एकाएकी मरण पावल्याचे आपण वाचले किंवा ऐकले की, आपण मनात पुटपुटतो, 'ते मला होणे शक्य नाही;' पण अप्रकट मनात आपल्याला माहीत असते की, मृत्यू कुणालाही, केव्हाही व कसेही गाठू शकतो. आपल्याला न आवडणाऱ्या इतर विषयानासुद्धा आपली स्वयंचलित यत्रणा याप्रमाणे बगल देते.

मृत्युइच्छा ही प्रत्येकाच्या सुप्त मनात असते असे सीगमंड फ्रॉइडचे म्हणणे आहे. वेगवेगळ्या माणसात ती कमी–अधिक प्रमाणात असू शकते. बरेच अपघात या सुप्त मनातील डेथ–विशमुळे होतात असे काही मानसशास्त्रज्ञ म्हणतात. नियतीने जेव्हा स्त्री, पुरुष व मृत्यू निर्माण केले त्या वेळेला काय काय एकत्रित केले ते त्यालाच ठाऊक; पण मागे फिरून जावे असे या तिघांचे एकमेकांना आकर्षण असते पाणी जसे मातीत विरून जावे आणि ही ओली माती जशी पचमहाभूतात विखुरली जावी तसे स्त्री, पुरुष आणि मृत्यूचे आहे.

'द इलियड'मध्ये होमरने मृत्यूला 'झोपेची बहीण' म्हटले होते! मृत्यू ही विनस्वप्नाची झोप असेही बऱ्याच वेळेला म्हटले जाते. दुर्दैवी माणसाला तर मरणासारखा दुसरा उत्तम मार्ग नाही त्याच्या समस्या कधीही सुटत नाहीत, पण एकदा का मृत्यू आला तर सारे प्रश्न त्याला भेडसावणार नाहीत, चिरशांती! मृत्यूमुळे


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्याना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य वहा रुपये

राजहस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ, पुणें ४११ ०३०

आपण एका अस्तित्वातून दुसऱ्या अस्तित्वात क्षेप घेतो हा समज तसा फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे.

आधी सांगितल्याप्रमाणे रेमंड मुडी यांनी मृत्यूच्या दारापाशी गेलेल्या दीडशे लोकांचे अनुभव ऐकून घेतले. हे अनुभव तीन प्रकारचे आहेत. एक, डॉक्टरांनी ज्यांना 'क्लिनिकली डेड' असे म्हटले ते दोन, अचानक अपघात होऊन जे मृत्यूच्या दाराजवळून परत आले ते आणि तीन, मृत्युशय्येवर असताना ज्यांनी आपल्या नातेवाइकांना किंवा इष्टमित्रांना जे अनुभव सांगितले व या नातेवाइकांनी किंवा इष्टमित्रांनी हे अनुभव श्री. मुडी यांना सांगितले ते.

श्री. मुडींना असे आढळून आले की, वेगवेगळ्या लोकांजवळ मृत्यू येतो तेव्हा त्यांच्या अनुभवात बरेच साम्य आहे. म्हणजे हे अनुभव काही एखाद-दुसऱ्याचे कल्पनाविलास नाहीत. श्री. मुडींनी ऐकलेले बरेच अनुभव हे असे आहेत: जेव्हा माणूस मरत असतो तेव्हा त्याच्या शरीराला अतोनात यातना होतात. त्याला विचित्र आवाज येतात व तो एका लांबच लांब भुयारातून जात आहे असे त्याला वाटते. यानंतर तो एखाद्या प्रेक्षकासारखा वरून स्वतःचेच शरीर बघतो.त्याच्या भावनांची कालवाकालव होते. नंतर त्याला त्याच्या मेलेल्या आप्तेष्टांचे आत्मे दिसतात. पण त्याला एक विलक्षण आत्मा असा दिसतो की, तो त्याने कधीच पाहिलेला नसतो. हा आत्मा स्वयंप्रकाशित असतो. (a being of light.) हा आत्मा लगेच त्याला (मृत्युशय्येवर असलेल्या माणसाला) त्याच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग दाखवितो व त्याच्या संबंध आयुष्याचे फ्लॅशबॅक त्याला एका क्षणात दिसते.. पुढे तो स्वयंप्रकाशित आत्मा त्या माणसाला त्याच्या आयुष्याचे मूल्यमापन काढायला सांगतो. थोड्या वेळाने त्याला कळून चुकते की, दुसऱ्या जीवनाच्या वेशीपलीकडे तो जाऊ शकत नाही. जणू त्याची वेळ अजून आलेली नाही.. परत त्याच्या शरीरात जायला तो नाखूष असतो. कारण त्याला एक विलक्षण शांती, एक गूढ आनंद लाभलेला असतो. तरी पण त्याचा नाइलाज असतो व तो कसा तरी परत आपल्या शरीरात जातो. मृत्यूच्या सामोरे जाऊन परत आल्याचा अनुभव तो इतरांना सांगत नाही. कारण आपल्या अनुभवाविषयी कुणाला विश्वास वाटणार नाही असे त्याला वाटते; परंतु या अनुभवानंतर त्याचा जीवनावरील दृष्टिकोन बदलतो. मृत्यूच्या दारापासून परत आलेल्या लोकांचे अनुभव हे सर्वसाधारणपणे असे असतात, असे श्री. मुडी म्हणतात. नेहमीच ते तसे असतील असे नाही.

जो माणूस आत्महत्या करतो त्याचा मृत्युशय्येवरचा अनुभव इतरांपेक्षा वेगळा असतो काय? श्री. रेमंड मुडी यांना असे आढळून आले की, आत्महत्या करणारा या जगात पिडलेला असतो व पुढच्या जगात (मेल्यानंतर) त्याची पीडा आणखीच वाढते! त्याच्या मरणाचा अनुभव नैसर्गिक रीतीने मरणाऱ्यापेक्षा अधिक वाईट असतो.प्रत्येकाला आपल्या जीवनात काही 'मीशन' असते असे मुडी म्हणतात. यात थोडा 'ख्रिश्चेनिटी'चा वास येतो असे मला वाटते. दुर्दैवी मनुष्याला आत्महत्या करायचासुद्धा हक्क असू नये हे केवढे दुर्दैव! आणि euthanesia चे काय? काही काही डॉक्टर्सना mercy killing हे औचित्यपूर्ण वाटते. टर्मिनल पेशंटस्नी आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला तर त्यात वावगं ते काय?

हिंदुधर्माची काय किंवा ख्रिश्चेनिटीची काय, शेवटी मूलभूत तत्त्वे सारखीच असतात या पुस्तकात ख्रिश्चेनिटीचा जेव्हा जेव्हा वास येतो तेव्हा तेव्हा नाक बंद करून हे पुस्तक जरूर वाचावे. तसे ते वाचनीय आहेच.

**—जे. एन. पोंडा:**
**फिनिक्स लायब्ररी**


**Some New Titles Received**

| | | |
|---|---|---|
| 1. Operation Emergency : B. M. Sinha | | Rs. 7/- |
| 2. Gokhale The Indian Moderates and The British Raj : | B. R. Nanda | Rs. 80/- |
| 3. Zorba The Greek : Nikos Kazantzakis | | Rs. 15·20 |
| 4. Camp 7 Last Stop : S. S Kirst | | Rs 13/- |
| 5. The Experiment : (a medical novel) : Henry Denker | | |
| 6. Secret of The Ages : (Paranormal / Occultism) : | Trench Lepoer Brinsley | Rs. 9·60 |
| 7. Cults of Unreason : (Cosmology) : | Dr. Christopher Evans | Rs. 12/- |
| 8. Lost Worlds : (Paranormal / Occultism) : | Clark Ashton Smith | Rs. 6·40 |
| 9. Psychic Sciences : (Walter B. Gibson & Litzka Gibson | | Rs. 21·15 |
| 10. Ball of Fire : (Cricket) : Fred Trueman | | Rs. 12/- |

☐ आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्ररीच्या वर्गणीत उत्कृष्ट पुस्तके वाचा.

☐ नॉन मेंबर्सना डेलिवेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतील.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

# कै. भय्यासाहेब आंबेडकर

लेखक : प्रा. झुंबरलाल कांबळे



**१७** सप्टेंबर १९७७. शनिवार. अत्यंत अशुभ दिवस. सकाळच्या प्रादेशिक वार्तेत ती भयानक बातमी ऐकली. यशवंत भीमराव आंबेडकर यांचे दुःखद निधन झाले! हृदयात कालवाकालव झाली. मस्तक सुन्न झाले. काय करावे ते काही वेळ सुचेना. 'बातमी ऐकलीत काय?' असे विचारीत प्राध्यापक तारदाळकर आले. थोडा वेळ विचार केला. लगेच मुंबईला जायचा निर्णय घेतला. तावडतोब तयारी केली. सोबत चार-पाच मित्र होते.

एस. टी. सुरु झाली. विचारचक्र सुरूच होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर ज्यांच्यावर बौद्ध जनतेने जीवापाड प्रेम केले, बाबासाहेबांचे पुत्र म्हणून ज्यांच्यापुढे आपले मस्तक विनम्र केले, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वात बाबासाहेबांच्या अंशाचा शोध घ्यायचा प्रयत्न केला ते भय्यासाहेब आंबेडकर गेले!!

काही दिवसांपूर्वीच आजारपणामुळे त्यांना के. इ. एम्. मध्ये दाखल केले होते. तसे ते नेहमी आजारीच असत. अगदी बालपणापासून आजारपण त्यांचा पाठपुरावा करीत होते. १२ डिसेंबर १९१२ ला त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांचा हीरक महोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा अशी योजना पी. इ. सोसायटीचे कार्यवाह श्री. घनःश्याम तळवटकर यांनी आखली होती. त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित करायचे ठरले होते.

१९७६ च्या एप्रिलमध्ये हा कार्यक्रम भव्य प्रमाणात साजरा करण्यात आला. याच प्रसंगी भय्यासाहेबांची मी प्रदीर्घ मुलाखत घ्यावी, असे मला सुचविण्यात आले होते. त्यासाठी १९७४ व १९७५ ह्या दोन वर्षांत मी भय्यासाहेबांना अनेक वेळा भेटलो. त्यांच्या भेटीचा पहिला प्रसंग माझ्या मनश्चक्षूंपुढे तरळत होता. 'मी आपल्या भेटीला येत आहे; आपण घरीच असा!' असा निरोप पाठवून मी मुंबईला गेलो होतो. ते राजगृहात राहत. तिकडे निघालो. मनात विविध विचारांनी गर्दी केली होती... मगध देशाचा राजा बिंबिसार याची राजधानी राजगृह. एक प्राचीन आणि सुंदर शहर. रमणीय परिसर, पर्वतांची राई, घनदाट वनराई, ठिकठिकाणी मंगल व पवित्र स्थळे, मोठमोठ्या विद्वानांस, विचारवंतांस लाभलेला राजाश्रय... तंद्रीत असतानाच राजगृह आले. होय राजगृह! बाबासाहेबांच्या वास्तव्याने पावन झालेले! इथेच बसून त्यांनी मानवतेच्या उद्धाराच्या योजना आखल्या असतील!!... जिना चढून वरच्या माळ्यावर गेलो. भय्यासाहेब आमचीच वाट पाहत होते. आमचा उद्देश सांगितला. बाबासाहेबांच्या — भय्यासाहेबांच्या कौटुंबिक जीवनाबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळवावी या उद्देशाने प्रश्नावली तयार केली होती. ती त्यांनी वाचली व मोठ्या आनंदाने आपली संमती दिली.

त्या प्रसंगी व नंतरच्या अनेक भेटीत त्यांनी आपल्या जीवनातील बालपणाच्या, तरुणपणाच्या, अगदी अलीकडच्या काळातल्या अनेक हृदयस्पर्शी आठवणी सांगितल्या.

'वयाची चार-पाच वर्षे जाईपर्यंत त्यांना धड उभेही राहता येत नसे. मग चालता येणे तर दूरच. बाल यशवंताने उभे राहावे, लवकर चालावे म्हणून बाबासाहेब—मातोश्री रमाबाई यांनी खूप प्रयत्न केले. नंतरच्या काळात बाबासाहेबांच्या कार्याचा व्याप वाढला. त्यातूनही यशवंतासाठी ते थोडा वेळ देत असत. बाळाराम आंबेडकर व त्यांच्या पत्नींनी यशवंतरावांसाठी खूप खस्ता खाल्ल्या. 'काका—काकी मला घेऊन फिरायला जात. अनेक वेळा चौपाटीवर. तिथे वाळूत खड्डा खोदीत. माझ्या कमरेइतका खोल. त्यात मला उभे करीत. वाळू लोटून कमरेपर्यंतचा भाग पुरून टाकीत. उद्देश हा की मला चांगले उभे राहता यावे. लवकर चालता यावे. मी पडू नये किंवा रडू नये म्हणून तशा अवस्थेत माझ्यापुढे ते खाद्यपदार्थ ठेवीत.'

या प्रयत्नामुळे बाल यशवंत चालू लागला; वाढू लागला. पण रोगाने पिच्छा सोडला नव्हता. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा, रोगाचे चक्र सुरूच होते. बाबासाहेब त्यावर तऱ्हेतऱ्हेचे उपाय योजीत होते. या रोगीपणामुळेच भय्यासाहेबांना आपले शिक्षण पूर्ण करता आले नाही, याची खंत त्यांच्या मनात

कायम होती. 'वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत आजारपण माझा पिच्छा पुरवीत होते. प्रत्येक वर्षी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात मला संधिवात होत असे. हिवाळा संपून उन्हाळा सुरू झाला की मी कसा तरी त्या दुखण्यातून बरा होत असे त्यामुळेच माझे शिक्षण पूर्ण होऊ शकले नाही.' संधिवातावर बाबासाहेब वेगवेगळे उपचार करीत. तज्ज्ञ डॉक्टरांना दाखवीत, मित्र सांगतील ते खाजगी उपाय योजीत. कोर्टातील आपल्या मित्रांना त्या संदर्भात सल्ला विचारीत एकदा केरळचे भास्करन हे गृहस्थ बाबासाहेबांकडे आले. त्यांनी भय्यासाहेबांच्या रोगावर 'गी दी' 'बस्ती' आणि 'मसाज' या तीन उपायांनी उतार पडतो असे सांगितले. बाबासाहेबांनी नंतर भय्यासाहेबांना त्या उपचारांसाठी शंकर मामासह केरळला पाठविले.

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या कार्याची धुरा भय्यासाहेबांनी आपण होऊन खांद्यावर घेतली. डॉ. बाबासाहेबांच्या जबरदस्त व प्रचंड कार्याची धुरा वाहणे ही गोष्ट सोपी नव्हती. राजकीय, धार्मिक, सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची झेप अद्वितीय होती. आपणाला बाबासाहेबांच्या तडफेने-गतीने जाता येणे अशक्य आहे याची जाणीव भय्यासाहेबांना होती; पण त्या मार्गाने जाण्याची प्रामाणिक इच्छाही होती. तो मार्ग —बाबासाहेबांचा मार्ग कसा होता? येशू ख्रिस्तासारखा काटेरी. येशू ख्रिस्ताने अखिल मानवजातीसाठी डोक्यावर काटेरी मुकुट धारण केला. खांद्यावर क्रूस घेतला. ठेचाळत, धडपडत, रक्तबंबाळ होत तो शेवटपर्यंत त्या मार्गावरून चालत राहिला! बाबासाहेबांनी दलित जनतेच्या दुःखाचा क्रूस आपल्या खांद्यावर जन्मभर वाहिला. घरा-दाराची, संसाराची, कुटुंबाची तमा बाळगली नाही. आपण होऊन ह्या काटेरी मार्गावरून चालत असताना ते कुठल्याही प्रलोभनास बळी गेले नाहीत. भय्यासाहेब आंबेडकरही याच मार्गाने चालत राहिले. समाजाच्या हितासाठी, हक्क-रक्षणासाठी झगडत राहिले. अखेरपर्यंत झगडत राहिले. शेवटच्या आजारातही ते ते दिल्लीला जाऊन आले. डॉक्टरांचा कुटुंबियांचा विरोध बाजूला सारून.

बौद्ध जनतेच्या राजकीय नेत्यातील दुही संपावी, त्यांनी एक होऊन अन्यायाविरुद्ध लढा द्यावा, ही त्यांची इच्छा होती. त्यासाठी ते शेवटपर्यंत प्रयत्नशील राहिले. धार्मिक व सामाजिक कार्य करीत असताना त्यांच्यावर अनेक वेळा भयंकर प्रसंग आले.

१९५७ चा एक प्रसंग. मी व माझे बंधू मुकुंदराव मलकापूर तालुक्यातील एका खेडेगावी गेलो होतो. रात्री धर्मांतराची सभा झाली. अनेक लोकांनी धर्मांतर केले हिंदूंची माथी भडकली. सभा आटोपताच मुंबईला परत निघालो. रस्त्यात धोका आहे याचा सुगावा लागला. सोबत पोलिस इन्स्पेक्टर घेतले. गाडीतून निघालो. गाडी एका जंगलाजवळ आली. तिथे सडकेच्या कडेला असलेल्या दोन बाजूच्या दगडांना साखळदंड बांधून रस्ता अडविला होता. इन्स्पेक्टर व व पोलिस खाली उतरले. मारेकऱ्यांच्या हे हे लक्षात येताच १५।२० जण जंगलात पळून गेले. गाडीच्या लाइटमुळे ते पळताना आम्हाला दिसले.'

भय्यासाहेब अगदी साधे व सरळमार्गी. एका महापुरुषाच्या पोटी जन्माला येऊन निगर्वी. साध्या साध्या माणसांनाही आपुलकीने, जवळिकीने आपलेसे करणारे...

एस्. टी. आता मुंबईला आली होती. दादरला उतरून 'राजगृहा'कडे निघालो. तिकडे जाणारे सर्व रस्ते माणसांनी गजबजून गेले होते. राजगृहाभोवतीचा सर्व परिसर व्याकूळ लोकांनी गजबजला होता. घराच्या छतावर, गच्चीत, बागाच्या कठड्यावर, वेस्ट बसेसच्या थांब्यावरील शेडवर, झाडांवर जागा असेल तिथे लोक थांबले होते. आपल्या आवडत्या नेत्याचे अखेरचे दर्शन दुरून का होईना घेता यावे म्हणून विव्हल अंतःकरणाने ताटकळत होते. या प्रचंड जमावाकडे पाहिल्यावर वीस वर्षांपूर्वी डॉ बाबासाहेबांचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी जमलेल्या जनसमुदायाची आठवण अनेकांच्या मनात रेंगाळत होती.

सुमारे चार वाजता ट्रकवरून अंत्ययात्रा सुरू झाली. डॉ. बाबासाहेबांच्या मार्गाने आयुष्यभर जाणाऱ्या या सुपुत्राचा अंतिम मार्गही बाबासाहेबांच्या अंत्ययात्रेचाच निवडला होता. धीर गंभीर व शोकपूर्ण वातावरणात हळूहळू अंत्ययात्रेचा प्रवास सुरू होता. बॉबी आंबेडकर पित्याच्या तोंडावर छत्री धरून बसला होता. रस्त्यात खच्चून भरलेले लोक ठिकठिकाणी हार व पुष्पचक्रे वाहात होते. साश्रु नयनांनी अखेरचे दर्शन घेत होते. 'भय्यासाहेब अमर है!' अशा घोषणा देत होते. 'बुद्धं सरणं गच्छामि ऽऽ' च्या सुरात सूर मिसळीत होते.'

हळूहळू ही यात्रा दादर चौपाटी—चैत्यभूमीकडे चालली होती निरनिराळ्या मार्गांनी येणारे लोकांचे समूह यात्रेला येऊन मिळत होते चौपाटीवर लोकांची नुसती रीघ लागली होती. जागा असेल तिथे लोक उभे होते, बसले होते. चार—साडेचार तासांचा प्रवास केल्यानंतर ही यात्रा चैत्यभूमीवर आली. रात्री ९—९॥ वाजले होते आकाशातील चंद्रकोर मावळतीकडे ढळली होती. सागराला ओहोटी लागली होती तो शांत होता आणि आकाशात धुराचे व ज्वालांचे लोट झेपावत होते जनसागराच्या दुःखाला भरती आली होती

भय्यासाहेब आंबेडकर यांचा पार्थिवदेह दृष्टीआड झाला होता; पण भय्यासाहेब आंबेडकर म्हणजे भीमज्योत! ही भीमज्योत भारतातील शेकडो—हजारो दलितांच्या बौद्ध जनांच्या अंतःकरणात तेवत असताना ती नष्ट कशी होईल असा विचार मनात रेंगाळत होता.

# उघड गुपित....?



## तुम्हालांही सांगायला हरकत नाही.

दुहेरी लाभ पदरात टाकणारी माझी अभिनव योजना.

प्रॉव्हीडंट फंड, सीटीडी, आयुर्विम्याचे हप्ते वगैरेमध्ये गुंतविलेल्या रकमांवर प्राप्तीकरांतून आकर्षक सूट मिळते.

परंतु यापैकी फक्त आयुर्विम्याद्वारा करांतील सवलतीबरोबरच विमा उतरलेल्या दिवसापासून संरक्षणाची हमी मिळते. व मनात आणाल तेवढ्या रकमेची इस्टेट निर्माण करता येते.

आयुर्विम्याच्या हप्त्याद्वारा करामध्ये मिळणाऱ्या भरघोस सवलतीची अधिक माहिती मिळविण्यासाठी आजच आपल्या अेजंटाकडे चौकशी करा.

**आयुर्विम्याला पर्याय नाही**

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

PRATIBHA-LIC-1156/77 MAR.

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ अटकेचा आणि सुटकेचा पोरकट खेळ

नैमित्तिक मजकूर देण्यासाठी केसरीच्या कचेरीमध्ये गेलो होतो. टेबलावर संजय दिनकर बसला होता. म्हणाला, 'कळल की नाही बाईंना अटक केली ते?' समाचारने चार ओळीचे पहिले वृत्त दिले होते. तपशील अर्थात नंतर येणार होताच केसरीवाड्यातून बाहेर पडल्या-वर पाच-सात जणाना तरी ही ताजी गरमागरम बातमी सांगितली; पण कोणालाही धक्का बसला नाही. 'अरे व्वा! पकडल का ? वाटलच होत वर का...' या किंवा अशाच सुरातल्या सगळ्या प्रतिक्रिया होत्या. थोडाफार आगडोंब कॉंग्रेस उसळविणार आणि वसंतदादाचे सरकार ते सहानुभूतीने खपवून घेणार या दिसत्या गोष्टी होत्या, पण आत गेलेल्या बाई आता पुरत्या भोवऱ्यात सापडणार...असा जो एक सार्वत्रिक समज होता त्याला दुसऱ्याच दिवशी धक्का बसला ! दिल्लीच्या अतिरिक्त न्यायमूर्तींनी बाईंना चक्क सोडून दिलं आणि मग मात्र क्षणक्षणीत प्रतिक्रियाची प्रचंड लाट उसळली !

बाई सुटल्या कशा ? बर पुरेसा पुरावा नव्हता तर बाईंच्या वाटेला गेलेच कशाला ? लोकाना काहीच उमगेना ! शेवटी कर्तव्य-कठोर कारभाराबद्दल ज्या चरणसिंगाची तारीफ केली जात होती त्याच्याच खात्याच्या गलथानपणामुळे बाई सुटल्या अशी जनतेची खात्री झाली आणि चरणसिंगाच्या भंपकपणावर आणि त्याचा पाठपुरावा करणाऱ्या केंद्रीय मंत्रिमंडळावर जनता विलक्षण नाराज झाली. जनता पक्षाच्या शासनाचे पहिल्या सहामाहीमधील प्रचंड ब्लंडर असेच या प्रकाराचे वर्णन करावे लागेल. चौधरी चरणसिंग अतिशय घमेंडखोर पद्धतीने मोठ्या जाळ्याची- आणि त्यात अडकणाऱ्या मोठमोठ्या माशांची भाषा वारंवार करीत असत. टाइम्सच्या लक्ष्मणने याच जाळ्यात स्वत. चौधरीच पूर्ण गुरफटून गेल्याचे दाखवून दिले.

### अवाजवी घाई

वास्तविक जनता सरकारची घडी आस्ते आस्ते बसत चालली होती. आणीबाणीमधील पापाचा पाढा शहा कमिशनसमोर रोज वाचला जात होता. शहा कमिशनसमोरील महत्त्वपूर्ण साक्षींनी वृत्तपत्रांची पाने भरभरून वाहात होती आणि कोणत्याही निवडणुकीमध्ये कॉंग्रेसला त्रासदायक ठरेल असे लोकमत आपोआप तयार होत होते. बाईंबद्दलची चर्चा जवळजवळ थाबली होती किंवा त्या चर्चेमध्ये आल्या तरी रोख स्वच्छ उपहासाचा होता. दक्षिणेमध्ये आणि महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये या वातावरणाचा जनता पक्षाला भरपूर लाभ मिळणार ही गोष्ट दिसत होती. त्यातच बाईंनी आपली अहंमन्य भूमिका एक इचानेही सोडली नव्हती. काश्मीरमध्ये शेखसाहेबांनी त्यांचे मनमोकळे स्वागत केले तेथील पत्रकारपरिषदेमध्येही त्यानी आणीबाणीचा पुरस्कार केला. संजयचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. जनता पक्षावर टीकेची झोड उठविली या साऱ्याच गोष्टी इतक्या संतापजनक होत्या की बाईंना वाचवू पहाणाऱ्या कॉंग्रेसमधील मंडळीनाही त्यांचे घोडे पुढे दामटणे अवघड होऊन बसले होते. म्हणजेच परिस्थिती अशी होती की तसेच काही मजबूत कारण असल्याखेरीज इंदिराजींच्या वाटेला जायचे कारण नव्हते आणि जेव्हा त्याना अटक करायची तेव्हा पूर्ण तयारीनिशी, चारही बाजूनी मोर्चेबंदी पूर्ण करूनच हालचाल करणे शहाणपणाचे होते.

जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर आणि अन्य पुढारीही आम्हाला वारंवार हेच सागत होते की, 'बाईंना अटक करायला आम्ही घाबरत नाही; परंतु पूर्ण पुरावा गोळा झाल्याखेरीज आम्ही या प्रकरणाला हात घालणार नाही.' पंतप्रधान मोरारजी देसाई यानीही माजी पंतप्रधानांच्या प्रकरणामध्ये कोणतीही घिसाडघाई करणार नाही असे ठासून सांगितले होते. स्वाभाविकपणेच बाईंना अटक झाल्यावर बाई पुरेपूर अडकणार असाच सगळ्याचा समज झाला. बाईंना अटक झाल्याच्या दुसऱ्या दिवशी चरणसिंगानी सकाळी पत्रकारपरिषद घेतली. त्या वेळी तरी ते 'हिरो' होते. त्यानी तयार निवेदन तर वाटलेच; पण त्याखेरीज विविध प्रश्नांनाही उत्तरे दिली. बाईंनी अटकेच्या वेळी जी नाटके केली त्याचा भरपूर उपहास केला आणि वास्तविक या बाईंवर न्युरेनबर्ग पद्धतीने खटला चालविला पाहिजे असे आपले मत असल्याचे सागितले. ही गोष्ट सकाळी ९ ते ११ च्या दरम्यानची !

गृहमंत्री चरणसिंग स्वत.च्या पाठीवर अशी कौतुकाची थाप मारून घेत असतानाच तिकडे दुसऱ्या नाटकाला प्रारंभ झाला होता बाईंना न्यायमूर्ती दयाळ याच्यासमोर हजर करण्यात आले सी. बी. आय. च्या वकिलानी ना योग्य पुरावा सादर केला ना रिमॉंड मागितला. फ्रॅंक अँथनी बाईंतर्फे काम पाहत होते त्यांनी सरकारपक्षाचे वाभाडे काढले. न्यायालयामध्ये हे नाटक रंगत असतानाच तिकडे शहा कमिशनचे तिसरेच नाटक चालू होते. त्या दिवशी त्यांच्या समोर विद्याचरण शुक्ला याची साक्ष होणार होती; पण बाईंच्या अटकेच्या वृत्तामुळे संपूर्ण परिस्थितीच पूर्णपणे बदलली म्हणून त्यांनी काम बेमुदत थाबविले. त्याचा सल्ला न घेता करण्यात आलेली घिसाडघाई त्यांना मुळीच रुचली नाही. त्यानी राजीनामा दिल्याची जी जोरदार वावडी उठली होती ती अगदीच बिनबुडाची होती असे म्हणता येणार नाही. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी बाबा-पुता करून त्याची समजूत काढली आणि त्याचे राजीनामा-प्रकरण विरून गेले. इकडे न्यायमूर्ती दयाळ याना प्रश्न पडला-इंदिराजींना

पकडले ते नेमके कशासाठी? योग्य पुरावा नाही. रिमांडचीही मागणी नाही. त्यांनी बिनशर्त सुटकेचा हुकूम दिला आणि बाईंना एकदम तेज आले. बाई घरी आल्या—लाडू आणि मिठाई वाटून त्यांची सुटका साजरी करण्यात आली या असल्या नामी संधीचा फायदा न उठवल्या तर त्या इंदिराजी कसल्या! ज्या दिवशी सुटल्य त्याच दिवशी त्या मुंबईला आल्या आणि लगोलग गुजराथच्या दौऱ्यावर रवाना झाल्या! जनता सरकारच्या एका घोडचुकीमुळे बाईंबद्दलच्या सहानुभूतीची एक मोठी लाट उसळली. चव्हाण-रेड्डी-त्रिपाठी साऱ्यांनीच निषेधाचा सूर लावला. ज्यानी चरणसिंगाचे अभिनंदन केले होते त्याना काय बोलावे हेच सुचेना! बाईंचा नगारा बडविणाऱ्या मंडळींनी आता त्यांना काँग्रेस अध्यक्षपद देण्याची तयारी चालविली आहे आणि चव्हाणांचा आपल्याला पूर्ण पाठिंबा मिळेल अशी या समर्थकांची खात्री आहे. बाईंनी तर पंतप्रधानपदाची वस्त्रे घेऊन कोणी आपल्यासमोर उभा आहे आणि काँग्रेसचे अध्यक्षपद आपल्याकडे चालत येत आहे अशा थाटातच बोलण्यास सुरुवात केली आहे. 'मला तूर्तास पंतप्रधानपद नको आणि मी अध्यक्षपद स्वीकारण्यासही फारशी उत्सुक नाही!' असे त्यांनी सुरतेत सांगितले रायबरेली विशेषांकामध्ये मी म्हटले होते की, 'चारही बाजूनी कोंडी झाली तर बाई जास्त वेगाने उफाळून बाहेर येईल!' आज त्या गोष्टीचा प्रत्यय येत आहे.

जनतापक्षाची या साऱ्या प्रकरणी भरपूर बदनामी झाली. टाइम्स ऑफ इंडियाने, इंदिराजींची कोर्टाने सुटका केल्यावर लिहिलेल्या अग्रलेखात न्यायमूर्तींच्या विधानांचा आधार देऊन असे म्हटले आहे की, His finding that there are no grounds for he beliving that the accusation is well founded and that no evidence oral or documentary has in fact been collected by the CBI, even in respect of those limited charges, creates an altogether new and far more untenable situation. It cannot but lend credence to the claim made by Mrs. Gandhi and other Congress leaders that the Janata government has acted in spirit of political vendetta. इंदिराजींची सुटका झाल्यावर ज्या प्रतिक्रिया देशाच्या सर्व भागामधील विविध प्रादेशिक आणि इंग्रजी दैनिकांतून उमटल्या त्याची ही एक प्रातिनिधिक झलक आहे. बाईंना केल्या पापाची शिक्षा मिळावी असे वाटत असणाऱ्या वृत्तपत्रांनाही काही वेगळे लिहिण्याची संधीच सरकारने ठेवली नाही. या सुटकेचा फुगा एवढा फुगवू नये एवढेच फार तर त्यांना म्हणता आले आणि असे म्हणत असतानाही जनता पक्षाच्या घिसाडघाईवर चार ताशेरे झोडण्याखेरीज अन्य कोणताही पर्याय त्यांच्यासमोर उरला नाही आणि देशभर जनतासरकार विरुद्ध वातावरण तापले.

## न पटणारी सारवासारवी

वेळ आलीच तर इंदिराजींना पुन्हा अटक करू असे गृहमंत्री आज धुरळा जरा निवळल्यावर म्हणतात; पण जी अटक झाली त्याचे काय? खरे सांगायचे तर या नामुष्कीच्या प्रकाराबाबत बुद्धीला पटणारा कोणताही खुलासा जनतासरकारजवळ नाही. असेही सांगितले जाते की, योग्य पुरावा हाती आल्यावर इंदिराजींना पकडण्याची मुभा केंद्रीय मंत्रिमंडळाने गृहखात्याला दिली असली तरी त्याचा इतक्या बेजबाबदार पद्धतीने वापर होईल, असे मात्र कोणालाच वाटले नव्हते. इंदिराजींना पकडण्यासाठी जी मंडळी गेली होती त्याचीच घाबरगुंडी उडाली होती. बाईंची स्वतःच्या अटकेसाठी मानसिक तयारी झालेलीच होती. ही अटक जास्तीत जास्त गाजावी अशीच त्याची इच्छा होती आणि त्या दृष्टीने जेवढा तमाशा करणे शक्य होते तेवढा तमाशा त्यांनी केला. दिल्लीच्या स्टेटस्मनने अटकेचे वृत्त देताना असे म्हटले आहे की एन्. के. सिंग आणि वाय् राजपाल या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना बाईंना त्यांच्या घराच्या ड्रॉइंग रूममधून बाहेर उभ्या असलेल्या पोलिसांच्या गाडीत आणणे हे मोठे त्रासाचेच काम होते. बाईंच्या घराबाहेर पोलिसांची गाडी तब्बल तीन तास उभी होती! भरपूर गर्दी जमा व्हावी अशीच त्याची इच्छा असावी आणि ही गर्दी जमविण्याचे काम यशपाल कपूर, सविता बेन, दिल्ली प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अर्जुन दास यासारखी मंडळी झटून करीत होती. जेव्हा 'इंदिरा गांधी झिंदाबाद आणि देश का नेता इंदिरा गांधी!' हे नारे चौफेर घुमू लागले तेव्हा बाईंचा चेहरा उजळला!' हा सारा तमाशा का होऊ शकला? अजूनही शासनामध्ये पोलिस-खात्यात बाईंबद्दल सहानुभूती बाळगणारे अधिकारी मोठ्या संख्येने आहेत काय? बाईंविरुद्ध केस उभी राहूच शकणार नाही याची तजवीज मुद्दामच केली गेली काय? असे जर झाले असेल तर या गोष्टी गृहमंत्र्यांना माहीत नव्हत्या काय? बाईंच्या अटकेचे वृत्त समाचारने प्रसिद्ध केल्यानंतर मोरारजीभाईंना समजले हे खरे काय? असे किती तरी प्रश्न या संदर्भात निर्माण होतात आणि या प्रश्नांना मिळणारी उत्तरे इतकी फसवी आहेत, की या उत्तरांना न पटणारी सारवासारव असेच म्हणावे लागेल. या साऱ्या दोषाची जबाबदारी प्रामुख्याने गृहमंत्र्यांची असली तरीही संपूर्ण शासन त्यामुळे बदनाम झाले हे नाकारता येणार नाही. चरणसिंग असे आहेत, नि तसे आहेत असल्या अनेक कथा आम्ही ऐकल्या होत्या; पण उत्तर प्रदेशी भोंगळपणा इतका त्यांच्या अंगी भिनलेला असेल असे मात्र कधी वाटले नव्हते. पंतप्रधानांना आणि कायदेखात्याला पूर्ण विश्वासात घेऊन नंतर ही कारवाई करण्यात आली असती तर असे हसे तरी झाले नसते. आता जर गृहमंत्री कायदेमंत्री शांतिभूषण यांच्या-बरोबर दोनदोन तास चर्चा करीत बसतात, तर त्या वेळी काय त्यांना हे करता आले नसते? गृहमंत्री आपल्या साथीदाराबरोबर अकारण फटकून वागतात. त्याचे फाजील ताठपणाचे पुरेपूर माप त्यांच्या पदरात पडले! एक गुलझारीलाल नंदा यांचा अपवाद सोडला तर कोणताही गृहमंत्री केवळ एका प्रकरणाने यापूर्वी इतका बदनाम झालेला नव्हता. जनता पक्षाचे एक सरचिटणीस मधू लिमये आणि आरोग्यमंत्री राजनारायण, बाईंना पूर्ण प्रस्थापित लोकशाहीचा फायदा मिळत आहे असे सांगत आहेत. तो तर मिळणारच आणि मिळालाही पाहिजे आणि बाईंना शासन झाले तर ते या लोकशाही चौकटीतच झाले पाहिजे! त्या दृष्टीने शहा कमिशनचे कामकाज व्यवस्थित चालू होते. टी. एन्. पै, हरिभाऊ गोखले, सी. सुब्रह्मण्यम्, दररोज एक एक मातब्बर साक्षीदार हजेरी लावीत होता आणि साऱ्या गोष्टी अलगद उलगडत होत्या. असे सांगतात की, या शहा

चौकशी आयोगाच्या कामकाजपद्धतीवर आणि त्याच्या रोजच्या कामकाजाला मिळणाऱ्या अमाप प्रसिद्धीवर बाई विलक्षण नाराज होत्या. यासंबंधी कायदेशीररीत्या काही करता येईल काय याचीही चाचपणी त्यांनी सुरू केली होती. त्यांना ज्या दिवशी अटक झाली त्या दिवशी त्या या शहा कमिशनच्या संदर्भातच आपल्या वकिलांबरोबर वातचीत करीत होत्या. शहा आयोगाने त्यांची झोप उडविली होती– आणि नेमका त्याच वेळी हा अटकेचा आणि सुटकेचा पोरकट खेळ खेळला गेला !

न्यायमूर्तींनी बाईंची सुटका केल्यावर जणु काही आपण कायमच्याच सुटलो अशा थाटात बाईंनी आणि त्यांच्या कडव्या साथीदारांनी या साऱ्याच प्रकरणाचे भांडवल चालविले आहे. हार-तुरे काय, मिरवणुका काय, मिठाई काय सगळेच काही अजब आहे. हा विजय असला आणि जनता पक्षाचे हसे झाले असले तरी हा साराच प्रकार तसा क्षणिक आहे आणि म्हणूनच तापल्या तव्यावर पोळी भाजून घेण्याचा बाईंनी प्रयत्न चालविला आहे. आपले भवितव्य फारसे उज्ज्वल नाही हे त्याही ओळखून असाव्यात; पण मुरब्बी राजकारणी असल्याने अचानक मिळालेल्या या छोट्या संधीचाही त्या पुरेपूर लाभ उठवीत आहेत. सुटका झाल्यावर बाई मुंबईला आल्या आणि त्यांना पत्रकार भेटले त्या वेळी झालेली प्रश्नोत्तरे पुरेशी बोलकी आहेत. त्यांना त्यांच्या आगामी हालचालीबद्दल प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या,– 'मी काही बुद्धिबळाचा खेळ खेळत नाही आहे. त्यामुळे चालीचा वगैरे प्रश्नच नाही; परंतु माझे काम मी चालू ठेवणार आहे आणि मला जेथून आमंत्रणे आलेली आहेत त्या सर्व ठिकाणी मी जाणार आहे. अर्थात सरकारची दुसरी काही इच्छा नसली तर !' सरकारच्या इच्छेची ही टांगती तलवार डोक्यावर मिरवीत असताना जणु काही काही झालेच नाही अशा प्रकारे त्या मिळाल्या संधीचा लाभ उठवीत आहेत. बलसाड जिल्ह्यामधील धर्मपूर येथे भाषण करताना त्यांनी स्वच्छच सांगून टाकले की, 'जनतेला भेडसाविणाऱ्या प्रश्नाबाबत मला जनतेचा आवाज उठवायचा आहे आणि म्हणून मी त्यांचे नेतृत्व करणार आहे ' म्हणजेच जनतेच्या पाठिंब्यावर क्रियाशील राजकारणाचे धडे गिरविण्यास बाईंनी पुन्हा प्रारंभ केला आहे.

### जिव्हारी बसलेला घाव

एका बाजूने बाईंची आक्रमक वाटचाल चालू असतानाच जनता सरकार जिव्हारी बसलेला घाव झेलून पुन्हा नेटाने उभे राहत आहे. बाईंच्या मागे लावलेल्या चौकशी समित्यांच्या लचांडाला आता आणखी या नवीन स्वतंत्र खटल्याची जोड मिळाली आहे आणि साऱ्या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा होऊन एक्क्याऐंशी सालच्या निवडणुकांच्या आसपास बाईंना पुरेपूर जाम करणार असल्याचे जनता पक्षाच्या एका खासदाराने अलीकडेच बोलून दाखविले आहे. एक्क्याऐंशी सालच्या निवडणुका ही फार लांबची झेप झाली. त्यापूर्वी विधानसभा निवडणुका आहेत आणि या निवडणुकांच्या संदर्भात जनता पक्षाला अनुकूल असे जे वातावरण जाणवू लागले होते, त्याला या पोरकट प्रकरणाने एक खिंडार जरूर पडले आहे आणि त्याचा फायदा काँग्रेसवाले उठविणार ही गोष्ट स्वच्छ आहे. गुजरातमधील न्यायमूर्ति देसाई यांना सेवा ज्येष्ठता लक्षात न घेता सर्वोच्च न्यायालयात नेऊन बसविले या गोष्टीचेही काँग्रेसवाले राजकीय भांडवल करणारच आणि या दोन्ही बाबतीत जनता पक्षाजवळ मुद्देसूद उत्तरे नाहीत. न्यायमूती देसाई यांच्या संदर्भात तर जनता पक्षाबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या छगलांनीही कठोर टीकेची झोड उठविली आहे. सोईस्कर मंडळींना बढती देण्याचे हे प्रकरण निवडणूक-व्यासपीठावर चांगलेच गाजणार ! अर्थात याच्या जोडीला आर्थिक आघाड्यावरील अपयश, हरिजनांवरील वाढते अत्याचार यासारख्या गुळगुळीत ध्वनिमुद्रिकाही पुन्हापुन्हा वापरण्यात येतील परंतु इंदिराजींची अटक आणि न्यायमूर्तींनी त्यांची केलेली बिनशर्त सुटका याचे जास्तीत जास्त भांडवल केले जाईल. अर्थात या एकाच प्रकरणातून निवडणुकीचा रस्ता सुलभ होईल असे काँग्रेसवाल्यांनी समजण्याचे कारण नाही. कारण इंदिराजीभोवती अजूनही काँग्रेसमधून हाकलून काढलेले बन्सीलाल, पूर्ण बदनाम झालेले यशपाल कपूर, धवल आणि चिरंजीव संजय यांचे वेटोळे आहे हे सर्वांना माहीत आहे. बाईंच्या अटकेच्या वेळी आणि त्यांची सुटका झाल्यावरही हीच मंडळी बाईंच्या घरी ठाण मांडून बसली होती. इंदिराजींना आणीबाणीबद्दल जराही पश्चात्ताप झालेला नाही आणि आजही संधी मिळेल तेव्हा आणि तेथे त्या आणीबाणीचा जोरदार पुरस्कार करीत असतात, हेही जनता विसरलेली नाही. त्यांच्या अटकेनंतर काही फार मोठा उद्रेक उसळला असे झाले नाही. अगदी महाराष्ट्रापुरते बघायचे झाले तरी मुंबई तशी थंडच होती. पुणे सांगली-मिरज येथील उद्वेगामागे उत्स्फूर्ततेपेक्षाही सक्तीचाच प्रभाव जास्त होता. उगाच नसती कटकट नको म्हणून दुकानदारांनी दुकाने बन्द केली. हे सारे जरी खरे असले तरी दिवसेंदिवस मागे मागे हटत चाललेल्या या बाईंना प्रकाशझोताचे चार दिवस या अटक प्रकरणामुळे पहावयास मिळाले हे नाकारता येणार नाही. चार-सहा महिन्यांच्या कारभारात जनता पक्षाने त्यांच्या मतदारांना मोठे प्रभावित केले आहे अशातला मुळीच भाग नाही; पण आजही, म्हणजे हे सारे रामायण झाल्यावरही काँग्रेसला कौल देण्याच्या मनस्थितीमध्ये मतदार नक्कीच नाही.

---

## ☐ दारुबंदीचे खूळ....पुन्हा मूळ धरणार

कोणीही शहाणा मनुष्य निदान भारतात तरी मद्यपानाचा पुरस्कार करणार नाही, पण याचा अर्थ असा नव्हे की, पंतप्रधानांच्या आशीर्वादाने पुन्हा मूळ धरू लागलेले दारुबंदीचे खूळ तो पचवून घेईल. कायदेशीर दारुबंदीच्या संदर्भात ज्या कडवट प्रतिक्रिया देशभर उमटत आहेत त्या पंतप्रधानांपर्यंत पोचतातच; पण पंतप्रधान या प्रश्नावर काहीही ऐकून घेण्यास तयार नाहीत. या धोरणामुळे आपले सरकार सत्तेवरून फेकले गेले तर तो आपला सन्मानच आहे असे आपण समजू, अशी टोकाची भूमिका त्यांनी स्वीकारल्याने बोलणेच खुंटल्यासारखे झाले आहे. घटकाभर असेही मानले की, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे; पण तरीही अग्रहक्क ठरविताना हे खूळ

कुठपर्यंत बर रेटायचे याचाही विचार झाला पाहिजे असे मत ब्लिटझ् साप्ताहिकाने नोंदले आहे खासदाराने बारा मंत्री दारू पितात की सतरा मंत्री दारू पितात, याचा तपशील देत कुचाळक्या काढीत बसण्यातील प्रयोजन समजू शकत नाही. सध्या सुब्रह्मण्यम् स्वामी हा उद्योग अगदी मनोभावे करीत असतात. वाढती महागाई, भेडसाविणारी बेकारी, औद्योगिक क्षेत्रामधील त्रस्त करणारे तटे-बखेडे, प्रांताप्रांतामधील वादविवाद यासारखे असंख्य प्रश्न चौफेर फेर धरून उभे असताना त्या साऱ्याचे मूळ नशाबंदीच्या पुरस्कारामध्ये आहे असे धरून चालून पंतप्रधान जे बोलतात त्यावर लक्ष्मणने एक झकास कार्टून दिले होते. दारुबंदीच्या प्रश्नावर जनता पक्षामध्येही मतैक्य नाही. अध्यक्ष चंद्रशेखर यांनाही कायद्याचा वरवंटा फिरवून नशाबंदीची अंमलबजावणी करणे फारसे पसत नाही. खेरीज या प्रश्नामध्ये उत्पन्न आणि बेकारी या दोन्ही गोष्टी दबा धरून बसलेल्या आहेत. कराच्या रूपाने मिळणारे उत्पन्न गमविण्यास राज्य सरकारे तयार होणार नाहीत. म्हणजेच दारुबदी आणायची असेल तर त्यांना केंद्राने आर्थिक मदत देणे आवश्यक ठरणार आहे. मार्क्सवादी कम्युनिस्टांनाही भलत्याच प्रश्नांना अवाजवी महत्त्व देण्याची ही वृत्ती मान्य नाही. म्हणजे जनता पक्षाचे साथीदारही या धोरणाच्या विरोधातच आहेत. तरीही पंतप्रधानांनी मात्र चार वर्षांमध्ये संपूर्ण दारुबदी करण्याच्या दृष्टीने कंबर कसली आहे. आता त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट एवढीच की, निदान हे धोरण संपूर्ण देशामध्ये राबविले जाणार आहे नाही तर प्यायची खुमखुमी आली की पळा गोव्याला, नाही तर म्हैसूरला असे जे चाले ते तरी चालणार नाही. अर्थात हातभट्टीचा मामला कोणालाही आणि कधीही आवरता येणार नाही हे सांगण्यासाठी ज्योतिष्याची गरज नाही.

पंतप्रधानाच्या पत्रकारपरिषदेमध्ये दारुबदीचा विषय निघाला की ते चिडचिडे होतात. कारण समोरचे सारे दारुबदीचे विरोधक आहेत असाच त्यांचा ग्रह असतो. त्यामुळे सहसा त्यांना कोणी दारुबदीबाबत फारसे काही विचारीत नाही. तरीही एका पत्रकाराने जरा हिय्या करून निदान बिअर तरी चालू ठेवावी असे सुचवून पाहिले त्याच्याकडे एक तिरस्काराचा दृष्टिक्षेप टाकून पतप्रधान म्हणाले, 'बिअर? त्यापेक्षा तुम्ही स्वमूत्र का पीत नाही? ते आरोग्यालाही उत्तम असते!' आता या उत्तरावर विचारणारा काय करणार? गप्प बसला बिचारा! □

## साभार पोच

**१. दीपप्रदर्शन**
ले.—श्री. ल. ग. जोग
सर्ग प्रकाशन, पुणे.
पृष्ठे १०३, मूल्य—१५ रु.

**२. लावण्यवेल**
ले—श्री. ल. ग. जोग,
अद्रीश प्रकाशन, पुणे.
पृष्ठे १०३, मूल्य—१५ रु.

**३. धूम** (काव्य)
श्री. रे. भ. भारस्वाडकर;
पंकज प्रकाशन, परभणी.
पृष्ठे ६८ मूल्य—८ रु.

**४. गीत—ज्ञानेश्वर**
श्री. विठ्ठल नरहरी बरबडे
अजय प्रकाशन, नागपूर
पृष्ठे—१८७, मूल्य—१२ रु. ५० न. पै.

**५. रंगपालवी** (कादंबरी)
ले.—श्री. के. रा. कोळी,
अनिल प्रकाशन, नागपूर
पृष्ठे १९७, मूल्य—१५ रु.

**६. झंझावात**
ले—सौ. कमलिनी फडके,
ह. रा. महाजनी प्रकाशन,
पृष्ठे १२० मूल्य—१० रु.

**७. कळ्यांचे निःश्वास**
दुसरी आवृत्ती
विभावरी शिरूरकर
पॉप्युलर प्रकाशन, मुबई
पृष्ठे ११० किं. ७ रु.

**८. गुणसागर टिळक**
श्री. ह. त्र्यं. देसाई
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
पृष्ठे १३६, किं. ९ रु.

**९. ससे**
कादंबरी
श्री. मनोहर शहाणे,
वाल्मीक प्रकाशन,
पृष्ठे १६०, किं. १६ रु. ५० न. पै.

**१०. समर्थ रामदास**
श्री. द्वा. वा. केळकर,
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन,
पृष्ठे १३२, किं. ९ रु.

# याद–ए–शंकर जयकिशन

## सुरेल आठवणी जगविणारा कार्यक्रम

शिरीष सहस्रबुद्धे

सिंफनी या संस्थेने याद–ए–शकर जयकिशन या वाद्यवृद–कार्यक्रमाचे काही प्रयोग पुण्यात अलीकडेच केले. वाद्यवृद (ऑर्केस्ट्रा) हा कार्यक्रमप्रकार काही नवलविशेष वाटण्या सारखी स्थिती आज नाही. किंबहुना मध्यंतरीच्या काळात नको नको व्हावी अशी वाद्यवृदांची खोगीरभरती होऊन गेलेली आहे. तरीही आजवर मी पाहिलेल्या वाद्यवृद-कार्यक्रमामध्ये हा प्रयोग सर्वोत्तम होता असे निश्चितपणे म्हणता येईल.

शकर व कै. जयकिशन या ज्येष्ठ–श्रेष्ठ जोडीच्या यशदगार सगीताच्या आठवणीना वाहिलेला हा कार्यक्रम श्री. विनोद गीध यांच्या नेतृत्वाखालील वाद्यवृदाने सादर केला. श्री. गीध हे वाद्यवृदाच्या क्षेत्रात गेली तेवीस वर्षे वावरत आहेत आणि त्या निमित्ताने त्यांनी देशभर दौरा केलेला आहे. तथापि या प्रदीर्घ काळामध्ये पुण्यात मात्र त्यांचा एकही जाहीर 'कार्यक्रम झालेला नव्हता ही घटना योगायोगाची असली तरी आश्चर्यकारक म्हणावी लागेल. शकर जयकिशनच्या वैभवकाळातील मधुर स्मृती जागवीत त्यानी व त्याच्या सहकाऱ्यानी पुण्यात केलेले हे प्रथम पदार्पण अतिशय स्वागतार्ह आहे

शकर व जयकिशनची सगीतरचना 'साम्राज्य.' म्हणावे अशी समृद्ध आहे. सगीत कार म्हणून त्यानी गाजविलेल्या प्रदीर्घ कारकीर्दीतली वैशिष्ट्यपूर्ण अशी निवडक गीते याद-ए-शकर-जयकिशनमध्ये सादर करण्यात आली. शकरजयकिशनच्या सगीतरचनातून अशा नेमक्या चागल्या गाण्यांची निवड करणे हे खरोखरच अवघड काम आहे. याबाबतीत काही जुन्या व काही थोड्या नव्या गीताची व काही लोकप्रिय–काही अपेक्षित गीतांची निवड करून संतुलन राखण्याचा चांगला प्रयत्न आहे. अर्थात हा वाद्यवृद मला आवडला तो इतरही अनेक कारणासाठी. उदाहरणार्थ, निर्दोष ऑर्केस्ट्रेशन शकर-जयकिशनच्या सगीतरचनाची नेमकी वादनविषयक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन वाद्यवृदसंयोजन केलेले असल्याने कोणत्याही गाण्याची मूळ वादनविषयक लज्जत कमी होत नाही. शंकर–जयकिशनचे एक जुने सहायक श्री. नदू चवाथे यांनी नियत्रित केलेला व्हायोलिन्सचा संच हे अशा प्रयत्नाचे एक उदाहरण. शंकर-जयकिशनच्या सगीतरचनेतील व्हायोलिन्सवरचा भर सर्वज्ञात आहेच. वाद्ये–वादकाची संख्या बरीच मोठी असूनही सुनियत्रित होती हेही विशेषच. वाद्यवृदाच्या तुलनेत गायकाचा दर्जा आणखीही सुधारायला हरकत नसावी. तथापि मन्ना डे याच्या शैलीत गाणारा गायक अधिक सुखद ठरावा. कोरससौंजबद्दलही हेच म्हणता येईल

कै. जयकिशनच्या आठवणीचे औचित्य ध्यानात घेऊन या प्रयोगात संगीतावरच अधिकाधिक भर देण्यात येतो व इतर भपका टाळला जातो हीही एक अभिनंदनीय बाब आहे.

## लंडन शेक्सपियर ग्रुपचे रोमिओ ॲण्ड ज्युलिएट

शेक्सपियरच्या या अजरामर शोकात्म प्रीतिकथेचा एक दुर्मिळ प्रयोग ब्रिटिश कौन्सिलच्या सौजन्यामुळे पुणेकर रसिकांना व शेक्सपियरच्या चाहत्या अभ्यासकांना नुकताच पाहावयास मिळाला. मध्ययुगीन इटलीच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या सर्वसाधारण प्रेमकहाणीला शेक्सपियरने आपल्या अपूर्व भाषाशैलीच्या, शोकात्म–सुखात्मिकेच्या मिश्रणाच्या आणि तत्कालीन व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनातील प्रेमद्वेषादि भावनाच्या चित्रणाद्वारे असामान्य पुनर्जन्म दिला. या मूळ पाच अकी नाटकाचे दोन अंकात संकलन करून लडन शेक्सपियर ग्रुपच्या कलाकारानी अडीच तासाच्या मर्यादेत तथापि पुरेशा सामर्थ्याने ते प्रेक्षकापर्यंत पोचविले.

ब्रिटिश, अमेरिकन किंवा अन्य प्रगत पाश्चात्य रंगभूमीवरील नाटके व नाट्यवाङ्मय वाचायला मिळत असले तरी प्रत्यक्ष रंगभूमीशी म्हणजे प्रस्तुतीकरणाशी आपला काहीच परिचय नसतो. त्यामुळे या एकाच प्रयोगाचे न्याय्य समीक्षण करणे विशेष योग्य व शक्यही नाही. तथापि ब्रिटिश रगभूमीची, त्यातही शेक्सपियरच्या नाटकाच्या प्रस्तुतीकरणाची, ठळक वैशिष्ट्ये लक्षात आणून देण्यास प्रयोग निश्चितच समर्थ ठरला. बाह्य साधन / आकर्षणांचा अत्यावश्यक तेवढाच व पूरक उपयोग करून अभिनय व सवादफेक याच्या ताकदीवरच भर देण्याची त्यांची तयारी व हिंमत अनुकरणीय ठरावी. केवळ सात कलाकाराद्वारे बारा पात्रे सादर करीत असताना प्रत्येकाने आपापल्या भूमिकेचे / भूमिकाचे वेगवेगळे बेअरिंग साभाळणे व त्याच वेळी सुविहीत रगमचीय हालचालींद्वारे नाटक ही सामूहिक कला असल्याची जाणीव प्रकट करणे ही तारेवरची कसरत या मंडळीनी यशस्वीपणे करून दाखविली.

नाट्यकथानकाला धक्का न लावण्याची दक्षता घेऊन नाटकाचे संपादन करण्यात आले आहे. तथापि मूळ नाट्यसहितेचा सुमारे एकतृतियाश भाग कापला गेल्याची त्रुटी खटकल्यावाचून राहिली नाही. अर्थात शेक्सपियरच्या नाटकाचा संपूर्ण प्रयोग आता ब्रिटिश प्रेक्षकही पाहू शकत व इच्छित नाहीत अशी माहिती दिग्दर्शक श्री जॉन फ्रेझर याच्याकडून मिळाली. त्याच्या नेतृत्वाखाली आशियाई दौऱ्यावर आलेल्या या सघात टेरेन्स वड (रोमिओ) सुझन फार्मर (ज्युलिएट), रिचर्ड हॉवर्ड, डेलेला किड, जॉन मोरेनो, शीला रीड आणि स्वतः जॉन फ्रेझर याचा समावेश आहे. नायक–नायिकेच्या सुखद प्रमुख भूमिकाखेरीज जॉन मोरेनो व डेलेना किड (ज्युलिएटची दाई) यांच्या मार्मिक अभिनयाचाही जरूर उल्लेख करायला हवा.

जमावशाहीचा धोका : पृष्ठ ३ वरून

जनता शासनाच्या या अंतर्गत विस्कळितपणावर, बजबजपुरीवर व दिशाहीनतेवर विदारक प्रकाशझोतच जणू टाकला आहे. किंवा, सरळ सरळ हा घातपाताचा (Sabotage) प्रकार तरी असला पाहिजे आणीबाणी जारी असताना जनसंघाचे खासदार सुब्रह्मण्यम स्वामी लोकसभेत प्रकट झाले आणि अदृश्यही झाले. मिसाची टांगती तलवार डोक्यावर असताना त्यांनी हा पराक्रम केला. पुढे त्यांनीच सांगितले, की शासनयंत्रणेतील काही घटक अनुकूल होते म्हणून हे साहस शेवटपर्यंत यशस्वी झाले. ते परदेशात सुरक्षितपणे पोचू शकले. इंदिरा गांधींना अनुकूल असे काही घटक जनता–शासनात नसतील असे समजून चालायचे काहीच कारण नाही. घातपात म्हणा, निष्काळजीपणा म्हणा, बजबजपुरी म्हणा किंवा लोकशाहीचे फाजील प्रदर्शन म्हणा, कशामुळे का असेना, जनता शासनाची अब्रू या अटक प्रकरणामुळे चांगलीच चव्हाट्यावर आली. चरणसिंग-मोरारजी हे चेष्टेचा विषय ठरले. आता मधू लिमयांनी खुशाल म्हणावे, जनता-शासनाने निर्माण केलेल्या लोकशाही वातावरणाचा इंदिरा गांधींनी दुरुपयोग केला. अजूनही लिमये बाईंना 'गुंगी गुडिया' तर समजून चाललेले नाहीत ना? १९-७० साली असे समजणे क्षम्य ठरले. आता लोक हसत आहेत.

फार महागात जाणार आहे जनता पक्षाला ही घोडचूक. अशी आणखी एक घोडचूक करा आणि पहा बाई जनता-शासनाच्या छाताडावरच नाचू लागतात की नाही ते. या एका घोडचुकीमुळे बाईंच्या हातात काँग्रेस अलगदपणे आली. एक जबरदस्त शत्रू जनता-शासनाला निर्माण झाला. लवकरच हा शत्रू जनता शासनाच्या घरात घुसून पाडापाडी केल्याशिवाय राहणार नाही. या पाडापाडीपासून वाचण्यासाठी केंद्रस्थानी जनता-शासनाला फार झपाट्याने अंतर्गत खिंडारे बुजवून धडाडीने पुढे झेप घ्यायला हवी. मारामाऱ्या कमी करून एकात्मतेची, एकजीव अस्तित्वाची खूण जनमानसाला पटवून द्यायला हवी. अशी खूण पटवता आली नाही तर बाईंना रान फारच मोकळे सापडेल आणि अशा बंदिस्तपणा नसलेल्या मोकळ्या रानाचा त्यांनी ताबा घेतला तर त्यांना दोष तरी कसा द्यायचा?

### जमावतंत्राचा वापर

बाईंची ताकद अर्थात जमाव ही आहे. अलाहाबाद कोर्टाच्या निर्णयानंतर १ सफदरजंग रोडवर सुरू झालेल्या जमाव-पर्वाचे नवीन नवीन आविष्कार आता व्यक्त होत राहणार आहेत. १ सफदरजंग रोडवर रोज येत राहिलेल्या किंवा आणण्यात आलेल्या मोर्चांनी त्या वेळी अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय जनतेला विसरायला लावला होता, इतकेच नव्हे तर त्यांनी बेकायदा बळकावून ठेवलेले पंतप्रधान-पदही जनतेला मनोमन स्वीकारायला लावलेले होते. याच तंत्राचा वापर करून नंतर संजय गांधींना पुढे रेटण्याचे प्रयत्न झाले. पराभवानंतर २–३ महिने गप्प राहून आता याच तंत्राचा अवलंब करून बाई पुन्हा गेलेली सत्ता परत मिळवू पाहत आहेत. 'इंदिरा गांधी झिंदाबाद' न म्हणणाऱ्या चंद्रजित यादवांना धक्काबुक्की–मारहाण होणे ही या नव्या उठावणीची केवळ चुणूक आहे. हे तंत्र यापुढे कोर्टाच्या आवारात, सभांतून, मोर्चा–प्रतिमोर्चांतून वरचेवर वापरले जाणार आहे. या तंत्राचे यश हमखास आणि बिनचूक असते असा आजवरच्या सर्व हुकूमशहांचा अनुभव आहे. कारण सर्वसामान्य माणूस गर्दीला भिणारा असतो. तो शांतताप्रिय व जिवाला जपून वागणारा असतो. थोडी दहशत दाखवली की तो शरण येतो. सर्वसामान्य माणसाच्या या शरणवृत्तीचा शोध मुसोलिनीला इटलीमध्ये लागला होता व पुढे हिटलरने आपल्या आत्मचरित्रात या वृत्तीचा सत्ता काबीज करण्यासाठी कसा वापर केला पाहिजे, याचे प्रत्ययकारक मार्गदर्शन करून ठेवलेले आहे. अर्थात अशा मार्गदर्शनाची इंदिरा गांधींना किंवा संजयला आणि त्यांच्याभोवती आता वाढत्या संख्येने गोळा होणाऱ्या कोंडाळ्याला मुळीच गरज नाही. परवाच्या इंदिरा–अटकेनंतर देशात ठिकठिकाणी ज्या दंगली उसळल्या, युवक काँग्रेसने दहशतीचे जे थैमान माजवले, त्यावरून हे ज्ञान या टोळीजवळ भरपूर प्रमाणात आहे हे सिद्धच झालेले आहे. महाराष्ट्रात नागपूर, सांगली, पुणे येथील 'बंद'ची कार्यवाही वरवर जरी पाहिली तरी उत्स्फूर्तपणाचा त्यातील अभाव चटकन डोळ्यात भरतो. हजार–पाचशेचा जमाव संपूर्ण शहरावर तासाभरात सहज कबजा मिळवू शकतो. घबराट वेगाने पसरते. दुकाने फटाफट बंद होऊ लागतात. मुलांची जबाबदारी नको म्हणून चालक शाळाही सोडून देतात. शासन अशा वेळी दोन प्रकारच्या भूमिका घेऊ शकते. महाराष्ट्रात काँग्रेसचे शासन आहे म्हणून परवाच्या इंदिरा-अटकेच्या निषेधार्थ झालेल्या 'बंद' कार्यक्रमात बहुतेक ठिकाणी महाराष्ट्र शासनाने, म्हणजेच शासनाच्या पोलिसदलाने बघ्याची भूमिका घेऊन परस्पर कार्यभाग साधून घेतला. जेथे शासन इतर पक्षाचे असेल तेथे अधिक कडक कारवाई होईल. म्हणजेच अश्रुधूर–गोळीबारापर्यंतही प्रसंगी मजल जाईल. यामुळे परिस्थिती तंग होते व लोकक्षोभ अनिवार्य ठरतो. म्हणजे जमावतंत्र हाताळणाऱ्या व्यक्तीचा किंवा संघटनेचा हेतू वरील दोन्ही पर्यायात साध्य होतच असतो. शासन स्वस्थ राहिले तरी लोकक्षोभ; कडक उपाययोजना झाली तरी लोकक्षोभ; आणि या लोकक्षोभाच्या होळीवर मग जमावाचे दादा आपली पोळी भाजून घ्यायला सज्जच असतात. हुकूमशाही येण्याची ही अटळ प्रक्रिया आहे व ज्यांना हुकूमशाही नको आहे, लोकशाही स्वातंत्र्याची, शांततेची जपणूक व्हावी असे ज्यांना मनापासून वाटते त्यांनी हे तंत्र प्रथम समजून घेतले पाहिजे, त्याविरुद्ध कशी उपाययोजना करायची याबद्दल गंभीरपणे विचार केला पाहिजे. असा विचार झाला नाही व शांतताप्रिय नागरिकांनी जमावाच्या या आक्रमणाविरुद्ध स्वयंस्फूर्तीने संघटित मोर्चे बांधले नाहीत तर लोकशाहीसाठी वचनबद्ध असणाऱ्या दिल्लीच्या जनता–शासनालाही केवळ टिकून राहण्यासाठी पुन्हा एखादी आणीबाणी पुकारावी लागणारच नाही असे नाही. परवाच्या अटक–बंद–प्रकरणी मुंबई तुलनेने शांत होती; पण बाईंची व शिवसेनाप्रमुखांची विमानतळावर भेट झालीच आहे. डांगे यांनी जनता–शासन उलथविण्याची बांग पुकारली आहेच.

सुटकेनंतर आपल्या निवासस्थानी जमलेल्या जमावाला इंदिरा गाधींनी जो संदेश दिला तोही लक्षात बाळगण्यासारखा आहे. 'पुन्हा अटक झाली तर इथे गर्दी करू नका! आपापल्या मोहल्यात निषेधाच्या सभा घ्या' असे त्यांनी आपल्या चाहत्यांना त्याप्रसंगी सांगितल्याचे प्रसिद्ध झाले आहे. याचा सरळ अर्थ असा, की मोहल्या-मोहल्यात यापुढे जमावाचे उद्रेक घडवून आणून अशातता माजविण्याचा, परिस्थिती तंग करून दिल्लीच्या शासनाला पेचात पकडण्याचा, आणीबाणी पुकारण्याशिवाय या शासनापुढे पर्याय न ठेवण्याचा इंदिरा गाधींचा हा हुकूमशाही डाव आहे बहुसंख्य समाज स्वास्थ्यप्रिय असतो. रोज वणवे पेटलेले, दुकाने लुटलेली, शाळा बंद पडलेल्या तो पाहू शकत नाही जनता-शासन याला लोकशाहीरक्षणाच्या प्रतिज्ञेमुळे आळा घालू शकले नाही तर लोकात ते अप्रिय होईल, बदनाम होईल, आळा घालू शकणाऱ्या हुकूमशहाची मार्गप्रतीक्षा केली जाईल. आळा घालायचा तर कडक धोरणे स्वीकारली पाहिजेत, म्हणजे आणीबाणी किंवा तत्सम काही कठोर उपाययोजनेचा जनता शासनाला विचार करणे भागच पडेल मग 'माझ्यात व यांच्यात फरक काय?' असे म्हणायला इंदिरा गाधी टपून बसलेल्याच आहेत! जमावाला उठवून या अंधाऱ्या कोपऱ्यापर्यंत जनता-शासनाला रेटीत नेण्याचा इंदिरा गाधींचा व त्यांच्या कंपूचा डाव समाजकार्यकर्त्यांनी, राजकीय नेत्यानी, सास्कृतिक क्षेत्रात वावरणाऱ्यानीही वेळीच ओळखून त्याविरुद्ध तळा-गाळातल्या जनतेला, मोहल्या-मोहल्यातून वेळीच सावध केले पाहिजे, संघटित केले पाहिजे जे. पी.च्या दक्षतासमित्या, रा. स्व. संघाच्या शाखा, इतर सास्कृतिक सघटना यांनी ही जबाबदारी मुख्यतः उचलली पाहिजे. नाही तर दुसरी आणीबाणी ओढवून घेण्याचे पाप त्यांचेकडून न कळत घडेल! आणीबाणी कोणता पक्ष लादतो हा गैर मुद्दा आहे. एक तर इंदिरा गांधी व त्यांचा कंपू जनता-शासनाला आणीबाणी लादणे भाग पडावे अशी परिस्थिती उत्पन्न करील, किंवा लोकशाहीच्या प्रतिज्ञेमुळे जनता-शासन आणीबाणी लादायला कचरू लागले व परिस्थिती अधिकच बिकट होत राहिली तर हा कंपू पुढे सरसावून सत्ता काबीज करील. दक्षतासमित्या, जनसघटना वेळीच निघाल्या नाहीत, वस्त्या आणि मोहल्ले आतापासूनच या पद्धतीने सावध व सघटित केले गेले नाहीत तर केवळ दिल्ली काही लोकशाहीला वाचवू शकत नाही कारण दिल्ली नेहमीच लोकापासून दूर असते. तिथ फक्त सत्तावाद चालतो. सत्ताधारी जरी बदलले तरी सत्तेचा मूळ स्वभाव फारसा बदलत नसतो. जिथे लोक सावध आहेत तिथेच लोकशाही आहे. बाकी सगळी वारागनेसारखी नेहमी बदलणारी सत्तेची अनेक रूपे...

जनता शासनाच्या संभाव्य आणीबाणीचे स्वरूप निदान मवाळ तरी असण्याची शक्यता आहे.

पण पुन्हा इंदिरा गाधी किंवा त्यांचा गट सत्तेवर आला तर मात्र.........


नव्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
(तिसरी आवृत्ती)
हंसा वाडकर

□ **टॉलस्टॉय एक माणूस**
(दुसरी आवृत्ती)
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
(दुसरी आवृत्ती)
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
(दुसरी आवृत्ती)
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे



# तंत्रज्ञ साहाय्य योजना

या योजनेतर्फे तंत्रज्ञांना आता २॥ लाख रुपयांऐवजी ५ लाख रुपयांपर्यंत कर्जाची सोय

• बदललेली एकूण परिस्थिती व खर्चातील वाढ लक्षांत घेऊन महावित्तनें आपली तंत्रज्ञ साहाय्य योजना अधिक सवलतीची केली आहे.

या नवीन योजनेनुसार आता तंत्रज्ञांना मिळणाऱ्या आर्थिक साहाय्याची मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यांत आली आहे. इतकेंच नव्हे तर त्यांनी स्वतः उभारावयाचें भांडवल आता ७$\frac{१}{२}$ % एवढें कमी करण्यांत आलें आहे.

हे आम्ही कसें करू शकलो ?

तर...

तंत्रज्ञ साहाय्य योजना व आमची दुसरी एक आकर्षक अशी खास 'बीज भांडवल योजना' यांची आम्ही घातलेली सांगड।

हेंच पहा ना।

समजा तुमच्या प्रकल्पासाठीं लागणाऱ्या स्थावर मालमत्तेची किंमत १०० रुपये आहे तर त्यासाठीं आम्ही ८५ रुपयांचे कर्ज तर देऊच, शिवाय ७॥ रुपये बीज भांडवलहि देऊं. म्हणजेच पहा कीं तुम्हा तंत्रज्ञांना फक्त ७॥ रुपयेच आणावे लागतील.

कर्जावरील व्याजाचा दर १२$\frac{१}{२}$ % (मागास विभागांत ८$\frac{१}{२}$ % ते ९$\frac{१}{२}$ %). तसेंच परत फेडीसाठीं दीर्घ मुदत.

बीज भांडवलावरील व्याजाचा दर अवघा १%

या योजनेविषयी तुम्ही साहजिकच उत्सुक असाल. मग आमच्या कोणत्याहि कार्यालयाशीं संपर्क साधा किंवा लिहा.

महावित्त MSFC

## महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

• राष्ट्राची अग्रेसर प्रादेशिक विकास वित्तसंस्था •

एम्. आर्. कोल्हटकर, कार्यकारी संचालक — भा. दि. गरवारे, अध्यक्ष

मुख्य कार्यालयः न्यू एक्सेलसियर बिल्डिंग, अमृत केशव नायक मार्ग फोर्ट, मुंबई ४०० ००१. दूरध्वनी-२६७७११-१२

विभागीय कार्यालयेः मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पणजी (गोवा)

PADMA-77-3

जयप्रकाश नारायण यांच्या बिहार आंदोलनामुळे रा. स्व. संघ जनप्रवाहात ओढला गेला.

या प्रवाहाबरोबर वाहून जाणे, या प्रवाहापासून अलिप्त राहणे

किंवा

प्रवाहात राहून प्रवाहाला नवे, इष्ट वळण देणे ....



# यापैकी कोणता पर्याय निवडणार ?

प्रवाहात राहून प्रवाहाला नवे, इष्ट वळण द्यायचे असेल तर
हिंदुत्वाच्या मूळ ध्येयवादालाही नवे वळण द्यायला हवे.
कृतीतही बदल हवा.

हे नवीन वळण, बदलाची नवीन दिशा सूचित करणाऱ्या
दिल्लीच्या
'दीनदयाळ उपाध्याय' शोध संस्थेची ओळख.

## पुढील अंकी

दिवाळीपूर्वी निघणारा, रायबरेली, कृष्णा-कोयना ( १-२ ) या विशेषांकानंतरचा शेवटचा विशेषांक

# दीनदयाळ उपाध्याय स्मृती अंक